# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६

किंमत ४ ₹


## पोलीस भरतीदरम्यान तरुणाचा मृत्यू

**बीड :** पोलीस भरतीदरम्यान तरुणाचा मृत्यू झाला आहे. दीपक वाव्हळ असं मृत तरुणाचं नाव असून, तो बीड जिल्ह्यातील परळीचा रहिवासी होता. १६०० मीटर धावताना दीपकला भोवळ आली. अशा स्थितीत त्याला बीडच्या जिल्हा रुग्णालयात करण्यात आलं. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. डिहायड्रेशनमुळे हार्ट अटॅक आला असण्याचा प्राथमिक अंदाज डॉक्टरांनी वर्तवला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलीस होण्याचे स्वप्न अधुरे राहिल्याने सर्व स्तरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

## बनावट पोस्टल स्टॅम्प; टोळीचा पर्दाफाश

**मुंबई :** भारतीय डाक विभागाच्या नावाने बनावट पोस्टल स्टॅम्प तयार करून विविध राज्यांत विक्री करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाण्याने पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी मुंबई, बिहार, दिल्ली व गाझियाबाद येथून आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्या ताब्यातून २७ लाख ८४ हजार २०० रुपयांचे बनावट पोस्टल स्टॅम्प जप्त करण्यात आले आहेत. डाक निरीक्षक आशुतोष जमादारसिंह कुमार (४२) यांच्या तक्रारीवरून १२ सप्टेंबर २०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता. तपासात आरोपी बनावट स्टॅम्प विविध राज्यांत पाठवत असल्याचे उघड झाले.

# आज भारत बंद

## बँका, वाहतूक आणि सरकारी कामकाजावर होणार परिणाम

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

नवीन कामगार संहितांपासून खासगीकरण, वेतन व सामाजिक सुरक्षेच्या मुद्द्यांपर्यंत विविध मागण्यांसाठी केंद्रीय कामगार संघटना आणि शेतकरी संघटनांनी उद्या गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी देशव्यापी 'भारत बंद'ची हाक दिली आहे. या बंदमुळे अनेक राज्यांमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँका, सरकारी कार्यालये, वाहतूक सेवा आणि बाजारपेठांवर अंशतः परिणाम होण्याची शक्यता असून, स्थानिक परिस्थितीनुसार काही ठिकाणी शाळामहाविद्यालयांच्या कामकाजातही अडथळे येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

केंद्रीय कामगार संघटनांच्या नेतृत्वाखाली १० प्रमुख ट्रेड युनियन तसेच शेतकरी संघटनांनी या बंदला पाठिंबा दिला आहे. नव्या चार कामगार संहितांचा निषेध, खासगीकरणाला विरोध, किमान वेतन व सामाजिक सुरक्षेचे प्रश्न, मनरेगा मजबूत करण्याची मागणी आणि काही प्रस्तावित विधेयकांना विरोध या प्रमुख मुद्द्यांवर हा संप पुकारण्यात आला आहे. संघटनांच्या मते, नव्या कामगार कायद्यांमुळे कामगारांचे हक्क कमी होत असून नोकरीची सुरक्षितता धोक्यात येते.

काही भागांत निदर्शने, रस्ते अडथळे किंवा 'चक्का जाम'मुळे सार्वजनिक वाहतूक विस्कळीत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बाजारपेठा, दुकाने आणि सरकारी कार्यालयांमध्ये कर्मचाऱ्यांची उपस्थिती कमी राहू शकते. परिस्थितीनुसार काही कार्यालये अंशतः बंद राहू शकतात.



### आपत्कालीन सेवा सुरूच

रुग्णालये, रुग्णवाहिका, विमानतळे आणि अत्यावश्यक सेवा नेहमीप्रमाणे सुरू राहतील, असे सांगण्यात आले आहे. मात्र, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रवाशांनी लवकर निघण्याचा सल्ला देण्यात आला आहे. एकूणच, 'भारत बंद'चा परिणाम स्थानिक परिस्थिती आणि संघटनांच्या सहभागावर अवलंबून राहणार असून, नागरिकांनी स्थानिक प्रशासनाच्या सूचनेनुसार नियोजन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### काय बंद राहू शकते?

देशभर शाळा आणि महाविद्यालये बंद ठेवण्याचा अधिकृत आदेश नसला, तरी काही राज्यांत वाहतूक विस्कळीत झाल्यास किंवा स्थानिक संघटनांनी पाठिंबा दिल्यास शैक्षणिक संस्था बंद राहू शकतात. विशेषतः केरळ, कर्नाटक आणि ओडिशा येथे परिणाम जाणवण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पालक व विद्यार्थ्यांनी संबंधित संस्थांच्या सूचनांकडे लक्ष ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

### बँकिंग सेवांवर परिणाम

सार्वजनिक क्षेत्रातील बँक कर्मचारी संघटनांनी संपात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी बँक शाखांच्या कामकाजावर परिणाम होऊ शकतो. मात्र, बँका किंवा रिझर्व्ह बँकेकडून अधिकृत सुट्टी जाहीर केलेली नाही. शाखा उघड्या राहण्याची शक्यता असली तरी व्यवहारांमध्ये विलंब होऊ शकतो. ऑनलाइन बँकिंग, एटीएम सेवा सुरू राहतील, परंतु चेक क्लिअरन्स व इतर सेवांमध्ये अडथळे येऊ शकतात.

### देशव्यापी संपात मोठ्या संख्येने सहभागी व्हा!

**पोलादपूर :** कामगार कर्मचारी संघटना संयुक्त कृती समिती, महाराष्ट्र यांच्यावतीने पुकारण्यात आलेल्या देशव्यापी संपात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या उल्काताई महाजन यांनी केले आहे.केंद्र सरकारने लागू केलेल्या चार श्रम संहितांमुळे कामगारांचे हक्क कमी होऊन संघटनांवर मर्यादा येत असल्याचा आरोप त्यांनी केला. कायमस्वरूपी नोकऱ्यांऐवजी फिक्स-टर्म रोजगार, संपावर निर्बंध, कामाचे वाढीव तास, तसेच असंघटित कामगारांसाठी अपुरी सामाजिक सुरक्षा यांसारख्या मुद्द्यांवर त्यांनी नाराजी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयांसमोर धरणे-निदर्शने करण्यात येणार असून, रायगड जिल्ह्यात पान २ वर

# तुम्ही भारतमातेला विकलीय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेत लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बुधवार, दि. ११ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान मोदींसह भाजपला घेरले. अमेरिका भारताचे निर्णय कसे काय घेऊ शकते? देशाचे कृषी क्षेत्र अमेरिकेसाठी खुले केले गेले. सरकारने शेतकऱ्यांचा कुठलाही विचार केला नाही. देश विकताना लाज कशी वाटली नाही? असा हल्लाबोल राहुल गांधी यांनी भारत-अमेरिका व्यापार करारावरून सरकारवर केला. तसेच राहुल गांधी यांनी एपस्टीन फाइल्स आणि अनिल अंबानींचा उल्लेख करताच लोकसभेत मोठा गदारोळ झाला.

राहुल गांधी यांनी लोकसभेत जवळपास ५० मिनिटांचे भाषण केले. या भाषणात राहुल गांधी यांनी केंद्र सरकारला घेरले. राहुल गांधी यांनी एकामागून एक आरोप केले आणि आरोप होताच सभागृहात गदारोळ झाला. आणि राहुल गांधी यांचे भाषण संपल्यानंतर विरोधी पक्षांनी सभात्याग केला. राजकारणावर पकड असते, व्यवसायावर पकड असते. जुझुत्सुमध्ये पकड दिसते. पण, राजकारणावरची पकड दिसत नाही. कुठे कोणी पकड घेतली, कोणी दबाव आणला आहे हे दिसत नाही, हे लपलेले असते, अशा शब्दात राहुल गांधी यांनी भाषणला आक्रमक पान २ वर



- **राहुल गांधींचा मोदी सरकारवर हल्लाबोल**
- **सत्ताधारी-विरोधकांमध्ये लोकसभेत खडाजंगी**

### एआयचे मोठे आव्हान

एआयने भयंकर जग दाखवले आहे. देशातील १४० कोटी जनतेसमोर हे मोठे आव्हान आहे. डॉलरचा आणि ऊर्जा स्त्रोतांचा शस्त्र म्हणून वापर केला जात आहे. पण, अर्थसंकल्पात या मुद्द्यांवर कुठलाही भर देण्यात आलेला नाही. आज डेटा सर्वात मोठे धन आणि एआयसाठीचे इंधन आहे, असा आरोप यावेळी राहुल गांधी यांनी केला.

## वेधक

### बोर्लीत घरात घुसून मारहाण

**रेवदंडा :** हुजरा मोहल्ला बोर्ली येथे शेजारील वादातून तिघांनी घरात घुसून मारहाण केल्याची घटना घडली आहे. फिर्यादीच्या मुलाने शेजारच्या मुलीला दिलेल्या इशाऱ्यावरून वाद निर्माण झाला. त्यानंतर आरोपींनी घरात घुसून शिवीगाळ व मारहाण केली, तसेच बाहेर पडताना दगडफेक करून फिर्यादी व त्यांच्या मुलास किरकोळ दुखापत केली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, याबाबतचा अधिक तपास सहायक फौजदार मिलिंद सुर्वे करीत आहेत.

### मणिपूरमध्ये पुन्हा उसळला हिंसाचार

**नवी दिल्ली :** मणिपूरच्या उखरुल जिल्ह्यात सशस्त्र दहशतवाद्यांनी अनेक घरांना आग लावली आणि गोळीबार केला. तंगखुल नागा समुदायाच्या सदस्यावर झालेल्या हल्ल्यावरून वाढत्या तणावादरम्यान ही घटना घडली. परिस्थितीला प्रतिसाद म्हणून, पुढील हिंसाचार आणि अफवा रोखण्यासाठी राज्य सरकारने जिल्ह्यातील इंटरनेट सेवा पाच दिवसांसाठी बंद केली आहे. लिटन सारीखोंग गावात काही सशस्त्र बदमाशांनी अनेक घरांना आग लावल्याचे माहिती मिळत आहे. या घटनेनंतर परिस्थिती आणखी बिकट होण्याची भीती असल्याने, प्रशासनाने संपूर्ण जिल्ह्यात कर्फ्यू लागू केला असून, अफवा रोखण्यासाठी पाच दिवसांसाठी इंटरनेट सेवा बंद ठेवल्या आहेत.

### नांदेडमध्ये भूकंपाचे धक्के

**नांदेड :** मुंबईजवळील पालघरमध्ये भूकंपाचे धक्के जाणवण्याच्या घटना ताजी असताना मराठवाड्यात नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात सात ते आठ गावांना भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ३.० नोंदवली गेली आहे. या घटनेमुळे गावांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं आहे. दुपारी ३ वाजून १५ मिनिटाला भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. मुखेड तालुक्यातील हिबट, कोळगाव, धामणगाव, मोटरगा, जामखेड, धनज गावांमध्ये हे धक्के जाणवले. दुपारी अचानक जमिनीतून गूढ आवाज आला. काही वेळाने जमीन हादरल्याचे गावकऱ्यांनी अनुभवले. या घटनेमुळे गावांमध्ये एकच खळबळ उडाली. लोकांनी घरातून बाहेर येऊन मोकळ्या मैदानात धाव घेतली.

## २४ आठवड्यांपलीकडील गर्भपात निर्णयासाठी वैद्यकीय मंडळ स्थापन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

गर्भातील बाळामध्ये गंभीर व्यंग किंवा वैद्यकीय गुंतागुंत आढळल्यास गर्भवती महिलांना २४ आठवड्यांपलीकडे वैद्यकीय गर्भपाताची कायदेशीर परवानगी देण्याची प्रक्रिया सुलभ व्हावी, यासाठी रायगड जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग येथे वैद्यकीय मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.



या मंडळात अध्यक्ष म्हणून जिल्हा शल्यचिकित्सक यांच्यासह स्त्रीरोगतज्ज्ञ, क्ष-किरण तज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, हृदयविकार तज्ज्ञ, श्वसनविकार तज्ज्ञ, अनुवंशतज्ज्ञ, मेंदूविकार तज्ज्ञ आणि मानसोपचार तज्ज्ञ अशा एकूण नऊ तज्ज्ञांचा समावेश आहे. संबंधित प्रकरणांमध्ये सर्व बाजूंचा वैद्यकीय आढावा घेऊन आवश्यकतेनुसार निर्णय घेतला जाणार आहे. रायगड जिल्ह्यातील अशा प्रकरणांमध्ये संबंधितांनी या वैद्यकीय मंडळाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांनी केले आहे. या वैद्यकीय मंडळाच्या स्थापनेमुळे गर्भवती महिलांना कायदेशीर, तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली आणि वेळेवर निर्णय घेण्यास मदत होणार आहे.

## रायगडात पोलीस भरतीला सुरुवात



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा पोलीस दलामार्फत आयोजित पोलीस भरती प्रक्रिया अनेक तरुण-तरुणींसाठी आयुष्याला नवे वळण देणारी ठरत आहे. दि. ११ ते १६ फेब्रुवारी या कालावधीत पोलीस मुख्यालय, अलिबाग येथे होणाऱ्या या भरतीकडे जिल्ह्यासह राज्यभरातील उमेदवारांचे लक्ष लागले आहे. पोलीस वर्दी परिधान करण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या तरुणाईत या भरतीमुळे प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



(छायाचित्र : समीर मालोदे)

- **शिपाई, चालकाच्या ९७ पदांसाठी ५३७३ अर्ज**
- **११ ते १६ फेब्रुवारीदरम्यान अलिबाग येथे भरती प्रक्रिया**

या भरतीत पोलीस शिपाई ९४ पदे आणि चालक पोलीस शिपाई ३ पदे अशी एकूण ९७ पदे पान २ वर

> **उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला बळी पडू नये, कोणीही पैशांची मागणी करत असल्यास किंवा संशयास्पद प्रकार आढळल्यास त्वरित पोलीस अधीक्षक कार्यालय, रायगड येथे ०२१४१-२२८४७३/२२२०२८ या क्रमांकावर संपर्क साधावा. ही भरती प्रक्रिया केवळ नोकरीची संधी नसून, अनेक तरुण-तरुणींसाठी देशसेवेच्या मार्गावर पहिले पाऊल ठरणार आहे. रायगड जिल्हा पोलीस दलाकडून सर्व भावी पोलिसांना मन:पूर्वक शुभेच्छा.**
>
> **- आंचल दलाल, पोलीस अधीक्षक, रायगड**

## एसटीची इर्टिगाला जोरदार धडक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत-चौक राज्यमार्गावर बुधवारी (दि. ११) सकाळी पावणे बारा वाजण्याच्या सुमारास एसटी बस आणि इर्टिगा कार यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दोघेजण गंभीर जखमी झाले. या अपघातामुळे सुमारे तासभर वाहतूक कोंडी झाली होती.

वांगणी (ठाणे) येथील रिंकू सिंग हे एमएच ०५ ईए ५७१३ क्रमांकाची इर्टिगा कार घेऊन चौककडे जात होते. त्याच वेळी पनवेलहून कर्जतकडे येणारी कर्जत आगाराची एमएच २० बीएल ३६२५ क्रमांकाची एसटी बस समोरील वाहनाला ओव्हरटेक करत असताना इर्टिगाला जोरदार धडक दिल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे.



धडक इतकी जबरदस्त होती की कारमधील चालक रक्तबंबाळ अवस्थेत अडकून पडला होता. त्याच्यासोबत असलेली दुसरी व्यक्तीही गंभीर जखमी झाली. स्थानिकांच्या मदतीने दोघांना बाहेर काढून तातडीने डिकसल येथील रायगड रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले. याप्रकरणी एसटी चालकाविरुद्ध कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कार्यरत शिक्षकांना टीईटीत सवलत द्यावी

### राज्य परीक्षा परिषदेकडे राजेश सुर्वेंची मागणी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक) यांच्या वतीने राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणेचे अध्यक्ष नंदकुमार बेडसे यांची भेट घेण्यात आली. कार्यरत व सेवाजेष्ठ शिक्षकांना टीईटी/सीटीईटी परीक्षेत गुण सवलत देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार, प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना दोन वर्षांत शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. तसेच पदोन्नती प्रक्रियेतही टीईटी/सीटीईटी उत्तीर्ण असणे आवश्यक ठरविण्यात आले आहे. त्यामुळे पहिली ते आठवीला अध्यापन करणारे अनेक सेवाज्येष्ठ शिक्षक अडचणीत येत असल्याचे परिषदेकडून नमूद करण्यात आले.



सध्या अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त-भटक्या, इतर मागासवर्गीय व दिव्यांगांना ५ टक्के गुण सवलत, तर माजी सैनिक व शहीद कुटुंबियांना १५ टक्के गुण सवलत आहे. त्याच धर्तीवर १५ वर्षांपेक्षा जास्त सेवा असलेल्या शिक्षकांना किमान उत्तीर्णतेसाठी ४५ टक्के गुणांची सवलत द्यावी, अशी मागणी करण्यात आली. या मागणीवर सकारात्मक विचार करून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन बेडसे यांनी दिले. शिष्टमंडळात मनोज मराठे, निलेश साळवी, हेमकांत गोयजी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## शाळा बॉम्बनं उडवण्याची धमकी

**नवी दिल्ली :** मोहाली शहर, झिरकपूर आणि बानूर येथील १६ हून अधिक खासगी आणि सरकारी शाळांना बुधवारी (दि.११) बॉम्बनं उडवण्याच्या धमक्या मिळाल्यामुळं प्रशासनात खळबळ उडाली. या घटनेमुळं पोलीस आणि जिल्हा प्रशासनानं तात्काळ सतर्क झाले आणि खबरदारीचा उपाय म्हणून शाळा रिकामी केल्या. मिळालेल्या माहितीनुसार, धमकीचा मेसेज ईमेलद्वारे पाठवण्यात आला होता. पोलीस पथकं, बॉम्बशोधक पथकं आणि श्वान पथकं घटनास्थळी पोहोचली आणि त्यांनी शाळेची झडती घेतली. शाळेतील विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आलं. तसंच त्यांच्या पालकांना माहिती पान २ वर

## सरकारी बेपर्वाईवर न्यायालयाचे ताशेरे

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

सार्वजनिक नोंदी जतन करण्यात झालेल्या गंभीर हलगर्जीपणाबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने महसूल विभागाच्या भू-संपादन कार्यालयांवर कडक शब्दांत ताशेरे ओढले आहेत. 'सार्वजनिक नोंदी योग्य रीतीने जतन न करणे, ही सरकारची निष्काळजीपणाची निशाणी आहे,' असे स्पष्ट निरीक्षण नोंदवत न्यायालयाने हरवलेला 'अवार्ड' पुन्हा तयार करण्याचे आदेश दिले. त्याचबरोबर, अवार्ड उपलब्ध नसतानाही इतर कागदोपत्री पुराव्यांच्या आधारे शेतकरी चेतन कांती कुडवकर यांचा अर्ज सहा आठवड्यांत निकाली काढण्याचे निर्देश सिडकोला दिले.

उरण, पनवेल आणि नवी मुंबई परिसरात सिडकोने हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या. मात्र, मोबदला आणि १२.५ टक्के विकसित भूखंड देताना सातत्याने चालढकल होत असल्याच्या तक्रारी आहेत. अनेक शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे पाठपुरावा करूनही भू-संपादन कार्यालयातून 'अवार्ड कॉपी' मिळालेली नाही. ''रेकॉर्ड सापडत नाही'' अशा तकलादू कारणांमुळे शेतकरी हक्कापासून वंचित राहत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

- **३८ वर्षांनंतर शेतकऱ्याला मिळाला न्याय**
- **सिडकोला सहा आठवड्यांत अर्ज निकाली काढण्याचे दिले निर्देश**

> **राज्य शासनाच्या दुर्लक्षामुळे एका सामान्य शेतकऱ्याला त्याचा कायदेशीर हक्क मिळवण्यासाठी तब्बल ३८ वर्षे प्रतीक्षा करावी लागल्याचे हे प्रकरण ठळक उदाहरण ठरले आहे. न्यायालयाच्या या आदेशामुळे उरण, पनवेल, नवी मुंबईतील अवार्ड प्रतीक्षेत असलेल्या हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. तर, कामचुकारपणावर पडदा टाकणाऱ्या शासकीय पद्धतींवर न्यायालयाने दिलेला हा चाबूक आहे.**
>
> **- ॲड. कुणाल नवाळे**

याच पार्श्वभूमीवर दापोली-पनवेल येथील सर्व्हे नं. ९९/४ मधील ०-१५-० हेक्टर जमीन १९८६ मध्ये सिडकोसाठी संपादित झालेल्या कुडवकर यांना पान २ वर

## पॅलीएटिव्ह केअर सेवा आता गावपातळीपर्यंत | जिल्हा रुग्णालयासह सर्व आरोग्य केंद्रांत राखीव बेड

# गंभीर आजारांतील वेदनांना दिलासा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

गंभीर व असाध्य आजारांनी त्रस्त रुग्णांना सर्वसमावेशक, सुलभ आणि वेदनामुक्त आरोग्य सेवा मिळावी यासाठी महाराष्ट्र शासनाने पॅलीएटिव्ह केअर सेवा गावपातळीपर्यंत सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या योजनेंतर्गत जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरी आरोग्य केंद्र तसेच आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये पॅलीएटिव्ह केअर सेवा टप्प्या-टप्प्याने उपलब्ध होणार आहे. जिल्हा रुग्णालयात किमान चार ते सहा बेड उपशामक काळजीसाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत.



कर्करोग, हृदयरोग, मूत्रपिंड निकामी होणे, मेंदू विकार, श्वसन विकार, मधुमेह आणि वृद्धापकाळातील गुंतागुंतीचे आजार अशा अनेक दीर्घकालीन आजारांनी ग्रस्त रुग्णांना सतत उपचार, वेदनाशमन आणि निगा आवश्यक असते. ग्रामीण भागातील रुग्णांना अशा उपचारांसाठी मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागत असे. मात्र, आता सार्वत्रिक राज्य पॅलीएटिव्ह केअर कार्यक्रमामुळे ही सेवा स्थानिक पातळीवरच उपलब्ध होणार आहे.

### रुग्णांना मिळणार सेवा

शासन निर्णयानुसार पॅलीएटिव्ह केअर सेवा राज्य, जिल्हा, तालुका, प्राथमिक व समुदाय स्तरावर विकसित केली जाणार आहे. प्रशिक्षित आणि बहुविषयीक मनुष्यबळ तयार करणे, वेदनाशामक औषधांचा अखंड पुरवठा ठेवणे, जनजागृती करणे, रुग्णांची काळजी घेणाऱ्यांना प्रशिक्षण देणे आणि घरगुती सेवांना बळकटी देणे या बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

> **गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांसाठी पॅलीएटिव्ह केअर सेवा ही दिलासादायक ठरणारी आहे. यामुळे अशा रुग्णांना ग्रामीण स्तरावरदेखील वेळेत व योग्य उपचार मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक स्तरावरल शासकीय रुग्णालयांना तशा सूचना देण्यात आल्या आहेत.**
>
> **- नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप**

सार्वजनिक आरोग्य विभागाने २ फेब्रुवारी रोजी याबाबत शासन निर्णय जारी केला असून, पॅलीएटिव्ह केअरला पान २ वर

## राष्ट्रगीतापूर्वी वाजणार 'वंदे मातरम्'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

'वंदे मातरम्'ला ७ नोव्हेंबर २०२५मध्ये १५० वर्षे पूर्ण झाली. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला असून, प्रत्येक अधिकृत कार्यक्रमांमध्ये राष्ट्रगीतापूर्वी 'वंदे मातरम्'च्या संपूर्ण सहा कडव्यांचं गायन किंवा वादन बंधनकारक केले आहे. त्यामुळे आता आता 'जन गण मन' या ५२ सेकंदांच्या राष्ट्रगीतासह आता ३ मिनिटं १० सेकंदांचं वंदे मातरम् सादर करणंही अनिवार्य आहे. याबद्दल गृह मंत्रालयाने आदेश जाहीर करून हे सर्व नियम स्पष्ट केले आहेत.

या नियमावलीत काही महत्त्वाचे नियम जारी केले आहेत. वंदे मातरम्चे सर्व सहा कडवे कोणत्याही सरकारी कार्यक्रमावेळे गाणे किंवा वाजवणे अनिवार्य आहे. तसेच हे गीत ३ मिनिटे १० सेकंदांचं असेल. शिवाय, सर्व पान २ वर

- **केंद्र सरकारची नियमावली जाहीर**
- **गाणं वाजताच ३ मिनिटं उभे राहणे सर्वांना अनिवार्य**

### वंदे मातारम्ला १५० वर्षे पूर्ण

वंदे मातारम् १८७५ मध्ये बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी ७ नोव्हेंबर रोजी या गीताची रचना केली. त्यामुळे ७ नोव्हेंबर २०२५मध्ये या गीताला १५० वर्षे पूर्ण झाली. या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांकडून ७ नोव्हेंबर २०२५ ते ७ नोव्हेंबर २०२६ या संपूर्ण वर्षासाठी देशव्यापी मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेचाच भाग म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

# वेठबिगारमुक्तीचे दावे फोल

## रायगडमध्ये कातकरींची वेदना कायम

। पेण । प्रतिनिधी ।

**रायगड वेठबिगार प्रतिबंधक कायदा, १९७६ लागू होऊन ५० वर्षे पूर्ण होत असताना शासन स्तरावर वेठबिगार प्रथा संपुष्टात आल्याचे दावे केले जात आहेत. मात्र, रायगड जिल्ह्यासह कोकण पट्ट्यातील कातकरी आदिवासींची वास्तव स्थिती या दाव्यांना छेद देणारी आहे. आयजेएम या संस्थेच्या सर्वेक्षणात वेठबिगारसदृश्य परिस्थितीचे चिंताजनक चित्र पुढे आले आहे.**




महाराष्ट्र शासनाच्या उपलब्ध आकडेवारीनुसार, सन २०१० पर्यंत राज्यात केवळ १,४०४ वेठबिगार मजुरांची कायदेशीर मुक्तता झाली आहे. या मुक्त झालेल्यांमध्ये कातकरी समाजाचा मोठा वाटा आहे. तरीही आजही अनेक कातकरी कुटुंबे कोळसा भट्ट्या, वीटभट्ट्या, बांधकाम क्षेत्र आणि इतर असंघटित कामांसाठी स्थलांतर करत असून, काही कुटुंबे वर्षानुवर्षे गावाकडे परत न आल्याची गंभीर बाब समोर येत आहे.

या कुटुंबांचा शोध, त्यांची ओळख पटवणे, वेठबिगार म्हणून अधिकृत नोंद करणे आणि पुनर्वसन करणे अत्यावश्यक असल्याची मागणी होत आहे. या पार्श्वभूमीवर अंकुर ट्रस्टच्या माध्यमातून कातकरी समाजाचे प्रतिनिधी आणि सामूहिक वनहक्क समूह साधन गटांच्या प्रतिनिधींचे प्रशिक्षण घेण्यात आले. त्यानंतर उपविभागीय अधिकारी, पेण प्रवीण पवार, नायब तहसीलदार श्री. परदेशी आणि गटविकास अधिकारी गजानन लेंडी यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करत लेखी निवेदन सादर करण्यात आले.

कातकरी युवा कार्यकर्ते संजय नाईक, रघुनाथ रामा पवार, विठ्ठल पवार यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या निवेदनावर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार यांनी दिले. वनहक्क समित्यांच्या कामकाजात कर्तव्यदक्ष राहण्यासह विकासाच्या योजना कातकरी समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गटविकास अधिकारी गजानन लेंडी यांनी ग्रामपंचायत स्तरावर स्थलांतरित कामगारांचा स्वतंत्र नोंदवही ठेवण्याबाबत निश्चितपणे विचार करण्यात येईल, असे सांगितले. वेठबिगार प्रतिबंधक कायद्याच्या ५० वर्षांच्या टप्प्यावरही कातकरी आदिवासी समाजाला वेठबिगारमुक्तीचा पूर्ण लाभ मिळत नसल्याची बाब शासन, प्रशासन आणि समाजासाठी गंभीर आत्मपरीक्षणाची ठरत आहे. रायगडमध्ये सुरू झालेला हा पुढाकार कातकरी समाजाच्या सन्मानपूर्ण, सुरक्षित आणि वेठबिगारमुक्त जीवनाच्या लढ्याला नवी दिशा देईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

> **महाराष्ट्रात २०१० पर्यंत केवळ १,४०४ वेठबिगारांचीच कायदेशीर मुक्तता झाल्याची शासकीय आकडेवारी सांगते. प्रत्यक्षात अनेक कातकरी कुटुंबे आजही वेठबिगारसदृश्य परिस्थितीत अडकलेली आहेत. विशेषतः कोळसा भट्ट्यांवर गेलेली कुटुंबे अनेक वर्षांपासून बेपत्ता आहेत. त्यांचा शोध, मुक्तता आणि पुनर्वसन हा केवळ कायद्याचा नव्हे तर, मानवी हक्कांचा प्रश्न आहे.**
>
> **– डॉ. वैशाली पाटील, सामाजिक कार्यकर्त्या**

## परळी येथील युवती बेपत्ता

। पाली । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील परळी येथील आर्या सुरेश पवार (२१) ही युवती १० फेब्रुवारी रोजी दुपारी परळी बाजारपेठेतील मॉन्जिनीज केक शॉप येथे कामासाठी गेल्यानंतर घरी परतली नाही. बराच शोध घेतल्यानंतरही तिचा काही मागमूस न लागल्याने तिचे वडील सुरेश पवार यांनी पाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. याप्रकरणी मनुष्य मिसिंगची नोंद करण्यात आली आहे.

आर्या हिची उंची ४ फूट ७ इंच, गव्हाळ वर्ण, सडपातळ बांधा, गोल चेहरा व काळे मध्यम केस आहेत. ती अंगात स्काय ब्ल्यू टी-शर्ट, काळी जीन्स आणि काळी सँडल परिधान करून होती. या प्रकरणाचा पाली पोलीस अधिक तपास करत असून, संबंधित युवतीबाबत कोणाला माहिती मिळाल्यास त्वरित पाली पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## बँक ऑफ महाराष्ट्र शाखा खांबचे नवीन जागेत स्थलांतर




। कोलाड । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील खांब येथील असणाऱ्या खांब येथील बँक ऑफ महाराष्ट्र बँकेचे स्थलांतर नवीन जागेत करण्यात आले असुन या बँकेच्या स्थलांतरामुळे ग्राहकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. कारण ही बँक भगवान दिगंबर पोपटशेठ यांच्या इमारती मधील पहिल्या मजल्यावर होती.या बँकेत जाण्यासाठी ग्राहकांना विशेषतः जेष्ठ नागरिकांना जिन्यावरून चढ उतार करावा लागत होता.

यामुळे नागरिक त्रस्त झाले होते.आता जिन्यावरून चढ उतार करण्याचा प्रश्न सुटला आहे.बँकेच्या या निर्णयामुळे जेष्ठ नागरिक ग्राहकांकडून बँकेचे आभार व्यक्त करण्यात येत आहे.

सोमवार, दि. ९ फेब्रुवारी रोजी या बँकेचे नवीन जागेत म्हणजे भगवान दिगंबर पोपटशेठ यांच्याच इमारतीमध्ये मुंबई-गोवा रस्त्याच्या बाजूला डॉ. अंबाजी म्हात्रे यांच्या शेजारी स्थलांतर करण्यात आले. सकाळी ९.३० वाजता जगन्नाथ भोईर व जागृती भोईर यांच्या हस्ते गणेश पूजन करून बँकेच्या कामगाजाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बँक मॅनेजर झा सर, कॅशिअर हेमंत सानप, ऑफिसर अभिषेक सिंग, जनार्दन कांबळे, शिपाई जगन्नाथ भोईर, सेवानिवृत्त बँक अधिकारी नंदकुमार पवार, त्यांचे सर्व सहकारी, वैजनाथ येथील राकेश महाबळे तसेच असंख्य नागरिक उपस्थित होते.

पान १ वरून

## देशव्यापी संपात मोठ्या संख्येने सहभागी व्हा

अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयासह सर्व तालुक्यांत आंदोलन होणार आहे. या आंदोलनाला राज्यातील कर्मचारी, शिक्षक तसेच संघटित व असंघटित कामगारांचा पाठिंबा असल्याचे सांगण्यात आले.आंदोलन यशस्वी करण्याचे आवाहन विविध कामगार व कर्मचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## गंभीर आजारांतील वेदनांना दिलासा

ऐच्छिक नव्हे तर, अत्यावश्यक सेवा म्हणून मान्यता देण्यात आली आहे. या सेवेचा मुख्य उद्देश रुग्णांना आजाराच्या शेवटच्या टप्प्यातच नव्हे, तर आजाराचे निदान झाल्यापासून उपचाराच्या संपूर्ण कालावधीत शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आधार देणे हा आहे. रुग्णांना घरपोच सेवा, सन्मानपूर्वक जीवनाची हमी आणि कुटुंबियांना योग्य मार्गदर्शन देणे यावर या योजनेत भर देण्यात आला आहे.

**गाव पातळीवर पोहोचणार सेवा**

या कार्यक्रमातील सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे मॉर्फिनसारखी प्रभावी वेदनाशामक औषधे थेट प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध करून देणे. प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी आता प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर ही औषधे लिहून देऊ शकतील. त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना वेदना नियंत्रणासाठी जिल्हा रुग्णालयात जाण्याची गरज भासणार नाही.

**जिल्हा पॅलीएटिव्ह केअर समितीची भूमिका**

नॅशनल प्रोग्रॅम फॉर पॅलीएटिव्ह केअर अंतर्गत जिल्हा पॅलीएटिव्ह केअर समिती स्थापन केली जाणार आहे. ही समिती कर्करोग, अवयव निकामी होणे यांसारख्या जीवघेण्या किंवा असाध्य आजारांनी ग्रस्त रुग्णांना वेदनामुक्त आणि सन्मानजनक जीवन जगण्यासाठी आवश्यक सेवा घरी किंवा आरोग्य केंद्रावर उपलब्ध करून देण्यास मदत करणार आहे.

पॅलीएटिव्ह केअर सेवा अंतिम अवस्थेपुरती मर्यादित न ठेवता आजाराच्या सुरुवातीपासून उपलब्ध होणार असल्याने ग्रामीण भागातील रुग्णांना मोठ्या शहरांमध्ये जाण्याची गरज कमी होईल. यामुळे रुग्णांचा वेळ, प्रवासाचा खर्च वाचेल आणि वेळेत उपचार मिळण्यास मोठी मदत होईल. गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांनी केले आहे.

## तुम्ही भारतमातेला विकलीय

सुरुवात केली. एआयने भयंकर जग दाखवले आहे. देशातील १४० कोटी जनतेसमोर हे मोठे आव्हान आहे. डॉलरचा आणि ऊर्जा स्त्रोतांचा शस्त्र म्हणून वापर केला जात आहे. पण, अर्थसंकल्पात या मुद्द्यांवर कुठलाही भर देण्यात आलेला नाही. आज डेटा सर्वात मोठे धन आणि एआयसाठीचे इंधन आहे. अमेरिकेला महासत्ता राहायचे असेल आणि डॉलरचे वर्चस्व टिकवून ठेवायचे असेल, तर भारताचा डेटा त्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. ही आमची ताकद आहे आणि म्हणून डेटा महत्त्वाचा आहे. देशाच्या बौद्धिकता आणि विचारांवर कब्जा करण्याचा प्रयत्न होत आहे. अमेरिका आणि चीनची वक्रदृष्टी भारताच्या डेटावर आहे. यामुळे या डेटाची सुरक्षा महत्त्वाची आहे, असे राहुल गांधी म्हणाले.

बांगलादेशच्या कापड आयातीवर अमेरिकेने शून्य शुल्क आकारले आहे. यामुळे आपला कापड उद्योग कोसळू शकतो. अमेरिकन निर्यात वाढली आहे, पण आपल्याला काय मिळाले? ट्रम्प यांनी टॅरीफ वाढवले आहे. आता अमेरिका ठरवेल की आपण तेल कुठून खरेदी करायचे? असे कुठल्या पंतप्रधानांनी केले नाही. अमेरिका म्हणत असेल की तुम्ही येथून तेल खरेदी करू शकत नाही तर, याचा अर्थ ऊर्जा क्षेत्राचा शस्त्र म्हणून वापर केला जात आहे. अमेरिका टॅरीफ वाढवत असेल तर याचा अर्थ वित्त क्षेत्राचे शस्त्र बनवले जात आहे. सरकारला याची लाज वाटली पाहिजे, असा हल्लाबोल राहुल गांधी यांनी भारत-अमेरिका व्यापार करारावरून सरकारवर केला.

पंतप्रधानांच्या डोळ्यात भीती दिसते. याची दोन कारणे आहेत. त्यापैकी एक आहे एपस्टीन फाइल्स प्रकरण. सरकारच्या संरक्षण बजेटमध्ये अडथळा आणणारी व्यक्ती म्हणजे अदानी. अदानी हे सामान्य उद्योगपती नाहीत आणि त्यांची कंपनीही नाही. अदानींच्यावर कंपनीवर अमेरिकेत खटला सुरू आहे. ज्यामध्ये अदानी नव्हे तर पंतप्रधानांना लक्ष्य केले जात आहे. ही कंपनी भाजपची आर्थिक रचना आहे, असे राहुल गांधी म्हणताच भाजपचे माजी मंत्री रविशंकर प्रसाद यांनी आक्षेप घेतला. तसेच संसदीय कार्यमंत्री किरेन रिजीजू यांनीही आपक्षेप नोंदवला. यामुळे सभागृहात सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या खासदारांमध्ये गदारोळ झाला.

एपस्टीन फाइलमध्ये उद्योगपती अनिल अंबानींचे नाव आहे. पण अद्याप त्यांना तुरुंगवासाची शिक्षा झालेली नाही. त्यांच्यावर गुन्हेगारी स्वरुपाचे आरोप आहेत, असे राहुल गांधी यांनी म्हणताच त्यावर रिजीजू यांनी आक्षेप घेतला. गळ्यापर्यंत येत नाही तोपर्यंत पंतप्रधान मोदींसह भारताच्या कोणत्याही पंतप्रधानांनी या करारावर स्वाक्षरी केली नसती, असे म्हणत राहुल गांधी यांनी निशाणा साधला. अमेरिकेत ज्या फाइल्स (एपस्टीन) जाहीर करण्यात आल्यात त्यात हरदीप सिंग पुरी आणि अनिल अंबानींची नावे आली आहेत, असे राहुल गांधी पुन्हा म्हणाले. हे होलसेल सरेंडर आहे, देश विकला गेला आहे. देश अशांततेच्या दिशेने जात आहे. देश विकला गेला आहे, देशाचा डेटा विकला गेला आहे, शेतकरी विकला गेला आहे, सॉफ्टवेअर इंजिनीअर विकेले गेले, लघु-मध्यम उद्योग विकले गेले आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे आपले सैन्य आणि ऊर्जा सुरक्षाही विकली गेली आहे, असे राहुल गांधी म्हणाले.

## रायगडात पोलीस भरतीला सुरुवात

भरण्यात येणार आहेत. पोलीस शिपाई पदासाठी ३५६३ अर्ज, तर चालक पोलीस शिपाई पदासाठी १८१० अर्ज प्राप्त झाले आहेत. मोठ्या प्रतिसादामुळे भरती प्रक्रियेचे नियोजन अधिक काटेकोरपणे करण्यात आले आहे. भरती प्रक्रिया पूर्णपणे निष्पक्ष, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित पद्धतीने पार पडणार आहे. उमेदवारांची बायोमेट्रिक व फोटो पडताळणी, चिप रजिस्ट्रेशन, संपूर्ण मैदानावर कॅमेऱ्यांची नजर, प्रत्येक इव्हेंटचे व्हिडिओ रेकॉर्डिंग, तसेच १६०० मी., ८०० मी. व १०० मी. धावांसाठी चिप तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. प्रत्येक स्पर्धा प्रकारासाठी स्वतंत्र अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

या भरतीसाठी ४२ पोलीस अधिकारी, ३२९ पोलीस अंमलदार आणि ३६ मंत्रालयीन कर्मचारी तैनात असून, दि. १० फेब्रुवारी रोजी बंदोबस्ताची रंगीत तालीमही पार पडली. भरती प्रक्रियेत कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकाराला थारा दिला जाणार नाही. बाहेरगावाहून येणाऱ्या उमेदवारांच्या सोयीसाठी हॉटेल, लॉजेस, निवास व्यवस्था पुरवठादार व मंगल कार्यालयांनी अल्पदरात सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी केले आहे.

## सरकारी बेपर्वाईवर न्यायालयाचे ताशेरे

अवार्ड न मिळाल्याने १२.५ टक्के विकसित प्लॉटचा लाभ मिळू शकला नाही. अवार्ड कॉपीसाठी २५ वर्षांहून अधिक काळ पायपीट करूनही यश न आल्याने त्यांनी २०२३ मध्ये उच्च न्यायालयात धाव घेतली.

न्यायालयात सादर शपथपत्रात उपजिल्हाधिकारी (भू-संपादन) कार्यालयाने अवार्डची मूळ प्रत सापडत नसल्याची कबुली दिली. जुने कागद खोक्यांत ठेवले होते, कोर्टाच्या आदेशाने ते खोके जप्त झाल्याने कागद विखुरले, तसेच स्कॅनिंगसाठी अर्थसाहाय्य नव्हते, अशी कारणे नमूद करण्यात आली. या स्पष्टीकरणावर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. न्यायमूर्ती मनीष पितळे आणि श्रीराम व्ही. शिरसाट यांनी जबाबदार अधिकाऱ्यांना न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले. सिडकोकडेही अवार्डची प्रत पाठवली असल्याने ती शोधण्याचे निर्देश दिले.

'महाराष्ट्र सार्वजनिक नोंदी कायदा, २००५'चे उल्लंघन झाल्याचे नमूद करत अवार्ड पुनर्बांधण्याचे आदेश देण्यात आले असून, १६ मार्च २०२६ पर्यंत अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. यापूर्वी २०२५ मध्ये न्यायमूर्ती रेवती मोहिते-दरे आणि डॉ. नीला गोखले यांनी

'स्कॅनिंगसाठी निधी नाही' या युक्तिवादावर आश्चर्य व्यक्त केले होते, याचाही न्यायालयाने उल्लेख केला.

## राष्ट्रगीतापूर्वी वाजणार 'वंदे मातरम्'

नागरिकांना राष्ट्रगीताप्रमाणेच यादरम्यानसुद्धा सावधान स्थितीत उभं राहणं गरजेचं आहे. प्रत्येक अधिकृत कार्यक्रमाची वंदे मातारम्ने सुरुवात होईल, त्यानंतर राष्ट्रगीत जन गण मन आणि मग कार्यक्रम सुरू होणार असल्याचे आदेशात म्हटले आहे.

**कोणत्या प्रसंगी बंधनकारक?**

नागरी सत्कार समारंभात वंदे मातरम्ची ३ मिनिटे १० सेकंदांची आवृत्ती वाजवणे बंधनकारक आहे. राष्ट्रपतींच्या अधिकृत सरकारी कार्यक्रमांची सुरुवात आणि शेवटही या गीताने होईल. तसेच, राष्ट्रपती जेव्हा टिव्ही किंवा आकाशवाणीवरून देशाला संबोधित करतील, त्याच्याही सुरुवातीस आणि शेवटी हे गीत गाणं अनिवार्य आहे. तसेच, राज्यपाल आणि उपराज्यपाल यांच्या अधिकृत सरकारी कार्यक्रमांमध्ये, परेडमध्ये, जेव्हा राष्ट्रध्वज परेडमध्ये आणला जाईल, त्याप्रसंगी हे गीत वाजवण्यात येणार आहे.

**शाळांमध्येही होणार सादरीकरण**

नागरी सन्मान सोहळ्यांमध्ये पद्म पुरस्कार वितरण करण्याच्या कार्यक्रमाचाही समावेश आहे. चित्रपट गृहात किंवा मनोरंजनाच्या कार्यक्रमांना हा नियम लागू होत नाही. जर या ठिकाणांवर वंदे मातरम् सादर करण्यात आलं, तर नागरिकांना उभं राहणं गरजेचं नाही. त्याशिवाय सर्व शाळांमध्ये दिवसाच्या सुरुवातीला हे गीत सादर करण्याची शिफारसदेखील या नियमावलीत केली गेली. प्रशासनाला याबद्दल निर्देश दिले गेले आहेत.

## शाळा बॉम्बनं उडवण्याची धमकी

देण्यात आली. याशिवाय, पोलिसांनी शाळांच्या परिसरात सुरक्षा वाढवली आहे आणि धमकी देणाऱ्याची ओळख पटविण्यासाठी तपास सुरू आहे. यासंदर्भात मोहालीचे एसएसपी हरमनदीप सिंग हंस यांनी लोकांना अफवांपासून दूर राहण्याचं आणि फक्त सरकारी माहितीवर विश्वास ठेवण्याचं आवाहन केलं आहे.


### जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाच्या जमिन मिळकती आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्याप्रमाणे आमचे अशिल व मिळकतीचे विद्यमान मालक यांच्यामध्ये बोलणी करण्यात आलेली आहेत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे | विद्यमान मालक |
|---|---|---|---|---|
| म्हात्रोळी ता.अलिबाग, | ३२६ | ०-५७-९० पो.ख. ०-०६-५० एकुण क्षेत्र ०-६४-४० | १६.१९ | नरेंद्र शंकर बोरकर |

वर वर्णन केलेल्या मिळकती पैकी क्षेत्र ०-३२-२० हे. आर. ही मिळकत या नोटीसचा विषय आहे.

संदर्भित मिळकत पुर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सुचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासुन १५ दिवसांचे कालावधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी हरकत देऊन माझी खात्री पटवुन द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : १२/०२/२०२६

**ॲड. किशोर म.हजारे**
बी. कॉम. एल. एल. बी.
००१, वैद्यबाग को. ऑप
हौ. सो. कामत आळी,
ता.अलिबाग, जि.रायगड.

### सार्वजनिक सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी भूखंड मालक विनित जे केडिया आणि क्षितीज आर सुरेका यांच्याकडून खालील वर्णनाच्या भूखंडाचे हक्क कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर भूखंड मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**भूखंडाचे वर्णन**

| Village | Khata No. | Gat No. | Hissa No. | क्षेत्र हे.आर.पॉ. | पो.ख. | आकार |
|---|---|---|---|---|---|---|
| बोनशेत | २० | ३ | १ | ०.९९.४० | ०.१५.२० | १४.१५ |
| एकूण | | | | | ०१.१४.६० | |

सदर वर नमूद भूखंडातील हक्क हे आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर वर नमूद मिळकतीवर, वा मिळकतीबाबत मिळणाऱ्या भूखंडावर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, ली वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल, याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १२/०२/२०२६

सही/-
**पॉल लीगल असोसिएट**
ऑफिस नंबर ३०१, तिसरा मजला,
ओम साई बिल्डिंग, प्लॉट नंबर १०१/३
स्वामी नित्यानंद रोड, गार्डन हॉटेल जवळ,
पनवेल, रायगड, ४१०२०६
Email: info@paullegalassociates.com

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिल १) अनिता कैलास गांधी, रा.द्वारा संगिता पुरुषोत्तम शहा, बिल्डिंग नं.२२, रूम नं. ६३८, विद्यादर्शन को.ऑप.हा. सोसायटी लिमिटेड, पंतनगर, घाटकोपर (पुर्व) मुंबई ४०० ०७५, २) अलका अनिल पाटील, रा. ३३/१०६९, अंजली को.ऑप.हा.सो. लिमिटेड, टागोर नगर विक्रोळी (पुर्व) मुंबई ४०० ०८३, ३) संगिता पुरुषोत्तम शहा, रा.बिल्डिंग नं.२२, रूम नं.६३८, विद्यादर्शन को. ऑप.हा.सोसायटी लिमिटेड, पंतनगर, घाटकोपर (पुर्व) मुंबई ४०० ०७५, ४) हेमांगी हेमंत साखळे, रा.११०६/बी, व्हिस्परींग हाईटस्, माइंड स्पेस, चिंचोली बंदर, मालाड (पश्चिम), मुंबई ४०० ०६४,५) सरिता संतोष ओसवाल, रा. १०५/अे, रणधिर विहार, को.ऑप.हा. सोसायटी लिमिटेड, लालाशेठ कंपाऊंड, टीपी रोड, भांडूप (पश्चिम), मुंबई ४०० ०७८, ६) संतोष पुरुषोत्तम शहा, रा. बिल्डिंग नं.२२, रूम नं.६३८, विद्यादर्शन को.ऑप. हा.सोसायटी लिमिटेड, पंतनगर, घाटकोपर (पुर्व) मुंबई ४०० ०७५, यांनी खालील परिशिष्टात सविस्तरपणे वर्णन केलेल्या मिळकतींचे संदर्भात श्री. रोहन अजित ताम्हाणे, पॅन : अेआयझेडपीटी६०२१बी, आधार ८६३१ १६०५ ८५७२, रा.१३०१/१३०२, तेरावा मजला, शिवशक्ती हाईटस्, जनता कॉलनी, पटेल चौक, हिंगवाला लेन, आर.बी.मेहता रोड, घाटकोपर (पुर्व) मुंबई ४०० ०७५ यांचे बरोबर स्वाक्षरीत केलेले १) ता. १०/०८/२०२४ रोजीचे संमतीज्ञापन (एम.ओ.यू.), २) ता. १२/०८/२०२४ रोजीचे अखत्यारपत्र तसेच ३) ता.१२/०८/२०२४ रोजीचे पत्र त्याच प्रमाणे ४) मे.ताम्हाणे ॲण्ड कंपनी यांचे लाभात दिलेले ता.१०/०८/२०२४ रोजीचे संमतीपत्र हे दस्तऐवज कायम स्वरूपी रद्द केले आहेत.

तरी परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींसंदर्भात श्री.रोहन अजित ताम्हाणे अथवा मे.ताम्हाणे ॲण्ड कंपनी यांचेबरोबर कुणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. तसा कोणताही व्यवहार केल्यास तो वर नमूद केलेल्या आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही व संबंधितांवर आमचे अशिल योग्य ती कायदेशीर कारवाई करतील, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकती.**

| मौजे | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मांडवेतर्फे झिराड | २/१क३, | ०-२३-३० पो.ख.०-०३-३० ०-२६-६० | ७.०२ |
| मांडवेतर्फे झिराड | ९/१अ१ब२, | ०-१२-९० पो.ख. ०-०२-६० ०-१५-५० | ३.६८ |
| मांडवेतर्फे झिराड | ९/१अ१अ४, | ०-२३-७० पो.ख. ०-०५-१० ०-२८-८० | ७.११ |
| मांडवेतर्फे झिराड | ९/१अ१अ३, | १-०९-९० पो.ख. ०-०१-८० १-११-७० | २.८९ |
| मांडवेतर्फे झिराड | ५/२, | २-२६-९० पो.ख. ०-६८-१० २-९५-०० | २.९९ |
| मांडवेतर्फे झिराड | ४अ/१, | ०-२२-०० पो.ख. ०-०६-०० ०-२८-०० | ०.४७ |
| **मौजे** | **गट नं.** | **क्षेत्र (हे.आर)** | **आकार (रु.पै.)** |
| धोकवडे | ३५१ | ०-२३-९० पो.ख. ०-०१-०० ०-२४-९० | ४.१४ |
| धोकवडे | २१४अ | २-७०-४८ | ३.६६ |
| धोकवडे | २६२ | ३-०६-०० पो.ख.०-०८-०० ३-१४-०० | ५.६२ |
| धोकवडे | ४९१ | ०-६२-०० | १.१२ |

अलिबाग
तारीख : १२/२/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### पनवेल महानगरपालिका
**शहर अभियंता विभाग**
**फेर ई-निविदा सुचना**

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/२३२५/प्र.क्र.०८/३०८/२०२६ दिनांक : ११/०२/२०२६

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Central Government/State Government / Government under taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार फेर ई-निविदा (२nd Call ) मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/२५९/ २०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क कामोठे येथील सेक्टर-१९, प्लॉट नं.१४ येथे शाळा बांधणे. (२nd Call ) | ५७,६३,५७,६५३/- |

या कामाच्या ई- निविदे बाबतची माहिती शासनाच्या ''http://mahatenders.gov.in. या संकेतस्थळावर दि.१२/०२/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**अतिरिक्त आयुक्त -I**
**पनवेल महानगरपालिका**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकती त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-नांगुर्ले, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| चिंधु बंडु कदम | ३९ | ८/ब | ०-२७-७५ | १-२९ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान बक्षीस, फरोक्त साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. १२/०२/२०२६

खरेदीदारा तर्फ वकील
**ॲड. स्वप्निल बाबूराव देशमूख**
पत्ता. सदनिका नं.५०४, ५ वा मजला, गजवक्र रेसिडेन्सी, कचेरी रोड, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो.८८३०५६०९६२/९२७३२२४६८०

# माथेरानमध्ये वन कायदा धाब्यावर

## बंगले धारकांकडून दगडी कुंपण; वन्यप्राण्यांचे रस्ते बंद होण्याच्या मार्गावर






**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहर हे वन जमिनीवर वसले असून या ठिकाणी असलेली वन संपदा वन्य प्राण्यांचे आदिवास समजला जातो. याच माथेरानमध्ये वन नियम आणि कायदे राज्याच्या अन्य भागापेक्षा वेगळे आहेत. मात्र, सर्व नियम आणि कायदे धाब्यावर बसवण्याची परंपरा मागील काही वर्षात सुरू झाली आहे. दरम्यान, शहराच्या जंगल भागात सध्या दगडी कुंपण घातली जात आहेत. त्यामुळे वन्यप्राण्यांचा मार्ग बंद होत असल्याबद्दल आक्षेप घेऊन असे बांधकाम तत्काळ हटवावे आणि संबंधित लोकांवर कारवाई करावी, अशी मागणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांकडून केली जात आहे.

ब्रिटिशांनी वसवलेल्या माथेरानमध्ये वन संपदा लक्षात घेऊन कडक कायदे बनवले आहेत. याठिकाणी जंगल भाग मोठ्या प्रमाणात असल्याने जंगली प्राण्यांची संख्या देखील मोठी आहे. त्यामुळे त्या जंगली प्राण्यांना जंगलात कुठेही फिरताना कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी माथेरानमध्ये वन कायदे आहेत. त्यात कुठेही दगडी बांधकाम करून कुंपण घातले जाऊ नये; तसेच, आपल्या मालकीच्या भुखंडात कुंपण घालून बंदिस्त करू नये, असे सूचित केलेले आहे. मात्र, माथेरानच्या जंगलात सध्या अनधिकृत बांधकाम आणि झाडे तोडून काँक्रीटचे जंगल निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. तसेच, या ठिकाणची झाडे दररोज तोडली जात असून मालकी जागेत दगडी कुंपणे घातली जात आहेत. या बंदिस्त कार्यपद्धतीमुळे प्राण्यांना जंगलात सैर करणे देखील कठीण होऊन बसले आहे. त्यामुळे येथील जंगलासह प्राणी देखील संकटात आले आहेत.

माथेरान मधील एल्फिन्स्टन रोड भागातील एल्फिस्टन बंगला हा येथील ३६ एकर जमिनीच्या क्षेत्रात वसलेला आहे. एवढ्या मोठ्या परिसरात विस्तीर्ण पसरलेली जमीन आणि परिसराला जुन्या झाडांचा विळखा असल्यामुळे हा परिसर प्राण्यांसाठी हक्काचे ठिकाण आहे. मात्र, हाच एलफिस्टन बंगला माथेरान नगरपरिषद आणि माथेरान वन विभागाच्या नजरेच्या बाहेर असल्याचे दिसून येत आहे. या ३६ एकर जमिनीमध्ये व्यापलेल्या बंगल्यात बहुसंख्य जमीन झाडांनी व्यापली आहे. मंकी पॉईंट रोड ते दरीपर्यंत आणि पुढे टोपीवाला बंगला ते मंकी पॉईंटपर्यंत व्यापला आहे. याच एलफिस्टन बंगल्याचे मालक या ठिकाणी दगडी कुंपण करून हे जंगल बंद करत आहेत. त्यामुळे वन्यजीव व प्राण्यांची वहिवाट बंद होणार आहे. माथेरान हे इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये असून देखील जंगल हे बंदिस्त झाले तर वन्यजीव प्राण्यांचे काय होणार? असा प्रश्न निर्माण झाला आहे. परिणामी काही प्राणी माथेरान जंगलातून स्थलांतरित होण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

त्यामुळे वन नियम धाब्यावर बसवून सुरू असलेले बांधकाम तत्काळ थांबवावे आणि संबंधितांवर मुंबई वन जमीन कायद्यात असलेल्या तरतुदी नुसार ही जमीन शासन जमा करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संतोष शिंदे यांनी महसूल अधीक्षक आणि माथेरान नगरपरिषदकडे केली आहे.

# फेसबुकवरील मैत्री महागात; पोलिसाला १९ लाखांचा गंडा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

डिजिटल युगात सायबर गुन्हेगार आता थेट पोलिसांनाही आपले लक्ष बनवू लागले आहेत. नुकतेच सायबर गुन्हेगाराने नवी मुंबई पोलिसाला डिजिटल गोल्ड मधील गुंतवणुकीच्या बहाण्याने तब्बल १८ लाख ९८ हजारांना गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी कळंबोली पोलिसांनी एका महिलेवर गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कळंबोलीतील ३४ वर्षीय पोलीस शिपाई हे नवी मुंबई पोलीस मुख्यालयात नेमणुकीस आहेत. त्यांना फेसबुकवर १ डिसेंबर २०२५ रोजी गौरी मुखर्जी नावाच्या महिलेची फ्रेंड रिक्वेस्ट आली होती. त्यानंतर तिच्याशी मैत्री झाली. त्यानंतर आपण कोलकाता येथे राहून डिजिटल गोल्डमध्ये गुंतवणूक करत असल्याचे सांगितले. अमेरिकेतील आपल्या काकांमार्फत या व्यवसायात गुंतवणूक केल्यास पैसे दुप्पट होतात, असे आमिष तिने या पोलिसाला दाखवले. सुरुवातीला या पोलिसाने टाळाटाळ केली; मात्र, त्या महिलेने आपला फोन खराब झाल्याचे सांगून आईचा मोबाईल क्रमांक संपर्कासाठी दिला. त्यामुळे पोलिसाचा तिच्यावर विश्वास बसला. त्यानंतर त्याने गुंतवणुकीची तयारी दर्शवली. त्यानंतर या महिलेने या पोलिसाला एका लिंकद्वारे डीजीएम नावाच्या आयडीवर नोंदणी करण्यास सांगितले. सुरुवातीला ४० हजार रुपये भरल्यानंतर पोलिसाला त्याच्या खात्यात ३० हजारांचा नफा झाल्याचे दिसू लागले. त्यानंतर अधिक नफ्याच्या आमिषाने या पोलिसाने वेळोवेळी आरटीजीएस द्वारे २ लाख १० हजार रुपये आणि इतर रक्कम भरली. त्यानंतर त्याच्या खात्यात तब्बल ३७ लाख १८ हजार रुपये नफा झाल्याचे दिसत असल्याने पोलिसाने त्यातील २० लाख रुपये काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याला कधी विड्रॉल चार्जेस तर कधी जीएसटी आणि टॅक्स भरण्याच्या नावाखाली पुन्हा पैसे भरण्यास भाग पाडण्यात आले. अशा प्रकारे या पोलिसाने १८ डिसेंबर २०२५ ते १४ जानेवारी २०२६ या दीड महिन्यांच्या कालावधीत तब्बल १८ लाख ९८ हजार रुपये वेगवेगळ्या बँक खात्यांवर जमा केले. त्यानंतर देखील या पोलिसाला आणखी रक्कम भरण्याबाबत सांगण्यात येऊ लागले. या पोलिसाने अधिक पैसे भरण्यास नकार दिला असता, आरोपी महिलेने पैसे भरल्याशिवाय मूळ रक्कम आणि परतावा मिळणार नाही, अशी धमकी दिली. त्यानंतर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच या पोलिसाने प्रथम सायबर पोर्टलवर आणि त्यानंतर कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करुन पुढील तपास सुरु केला आहे.

# अनधिकृत बांधकामांवर कारवाई

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सिडकोच्या अनधिकृत बांधकाम विभागातर्फे विविध ठिकाणच्या अनधिकृत बांधकामांवर सध्या कारवाईची मोहिम तीव्र करण्यात आली आहे. नुकतेच नोड येथे निष्कासन मोहिम राबवून सिडको अधिसूचित, संपादित जागेवरील अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाई करण्यात आली.

पुष्पकनगर नोड येथे सिडकोच्या जागेवरील से-१ ते ५ येथील अंदाजे क्षेत्रफळ ६००० चौ.मी. क्षेत्रफळामधील जागेवर सिडको महामंडळाकडून कोणत्याही प्रकारची अधिकृत परवानगी न घेता ढाबे, भाजी मार्केट, भंगार दुकाने थाटण्यात आली होती. त्यामुळे सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार व मुख्य नियंत्रक अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली सिडकोच्या अनधिकृत बांधकामे नवी मुंबई विभागातर्फे कारवाईची मोहिम राबवून ही अनधिकृत बांधकामे निष्कासित केली आहेत. कारवाईची ही मोहिम सिडको पुष्पकनगर अतिक्रमण विभागाचे अधिकारी, स्थानिक पोलीस अधिकारी व सिडको पोलीस पथक, महावितरण विभागाचे अधिकारी, सिडको आणि महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षारक्षक यांच्या सहभागाने यशस्वीपणे राबविण्यात आली.



## आरोग्य केंद्राला राज्यस्तरीय प्रमाणपत्र प्राप्त

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

लोहप येथील प्राथमिक आरोग्य केंद्र सर्वसामान्य नागरिकांसाठी अविरतपणे सुरू असून त्यांच्याकडून विविध उपक्रम हाती घेतले जात आहेत. तसेच, रुग्णांमध्ये जनजागृती करण्याचे काम देखील आरोग्य केंद्र करीत आहे. त्यामुळे लोहप प्राथमिक आरोग्य केंद्रला राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानके राज्यस्तरीय प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

विशेष म्हणजे जिल्ह्यात सर्वाधिक ८८.३१ टक्के गुण मिळवणारे हे पहिलेच प्राथमिक आरोग्य केंद्र ठरले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांनी कौतुक केले. तसेच, जिल्हा सार्वजनिक आरोग्य परिचर्या उषा वावरे, जिल्हा समन्वयक चित्रा गुरव व जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी रेश्मा संकपाळ यांचे महत्वाचे सहकार्य लाभले.

# स्थानकातील निवारा शेडचे काम सुरु

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



नेरळ रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक दोनवर निवारा शेड बांधण्याचे काम सुरू असल्यामुळे प्रवाशांचे आता उन्हापासून संरक्षण होणार आहे. यापूर्वी या स्थानकातील फलाट दोनवर कोणतीही निवारा शेड नव्हती. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय लक्षात घेता मध्य रेल्वे प्रशासनाने नेरळ स्थानकात प्रवासी निवडा शेड बांधण्यास सुरुवात केली आहे.

ब्रिटिश काळात बनलेल्या नेरळ स्थानकातील फलाट क्रमांक दोनवर केवळ दोन प्रवासी डब्ब्यांसाठी निवारा शेड होती. त्यानंतर अनेक वर्षे त्या ठिकाणी नवीन निवारा शेड उभारण्यात आली नव्हती. त्यात आता नेरळ स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या हजारोमध्ये आहे.

त्यामुळे या स्थानकात ये-जा करणाऱ्या प्रवाशांना निवारा शेड अभावी उन पावसात ताटकळत उभे राहावे लागत होते. त्यामुळे प्रवासी वर्गातून नाराजी व्यक्त होत होती. दरम्यान, मुंबई रेल कॉर्पोरेशन यांच्याकडून नेरळ स्थानकाचा कायापालट करण्याचे घेण्यात आलेले धोरण लक्षात घेता नेरळ स्थानकाला नवीन रूप दिले जात आहे.

त्यात फलाट एक वरील संपूर्ण परिसर स्काय वॉकमुळे बंदिस्त करण्यात आला आहे. त्यामुळे त्या ठिकाणी चांगल्या पद्धतीने निवारा शेड निर्माण झाली. त्यानंतर आता नेरळ स्थानकाच्या फलाट दोनवरील अपुर्णावस्थेत असलेल्या निवारा शेडचे काम देखीलसुरू झाले आहे. या निवारा शेडमुळे प्रवासी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

भविष्यात १५ डब्यांची लोकल कर्जतपर्यंत येणार असल्याने त्या दृष्टीने नेरळ स्थानकाची लांबी देखील वाढवली गेली आहे. त्या सर्व भागाला निवारा शेड उभे केले जात असल्याने प्रवासी वर्गात आनंदाचे वातावरण आहे.

# राजपुरी-खोकरी रस्ता मृत्यूचा सापळा

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**



मुरुड तालुक्यातील राजपुरी-खोकरी रस्त्याच्या समुद्र किनाऱ्यालगतचा संरक्षक कठडा पावसाळ्यात कोसळल्याने हा रस्ता धोकादायक बनला आहे. त्यामुळे या ठिकाणी तातडीने योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी वाहनचालक व प्रवासी वर्गातून केली जात आहे.

गतवर्षी मोठ्या प्रमाणात पडलेल्या पावसामुळे राजपुरी-खोकरी रस्त्यादरम्यान समुद्र किनाऱ्यालगतचा संरक्षक कठडा कोसळला आहे. हा संरक्षक कठडा दुरूस्त करून योग्य ती उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी राजपूरी ग्रामपंचायतीतर्फे मुरुडच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे देण्यात आली होते; मात्र, अद्यापही या ठिकाणी कोणतीही उपाययोजना करण्यात न आल्याने वेळप्रसंगी अपघाताची शक्यता भिती व्यक्त केली जात आहे. याबाबत कृषीवलच्या प्रतिनिधीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उप अभियंता यांच्याशी संपर्क साधला. यावेळी त्यांनी, समुद्र किनाऱ्यालगतच्या संरक्षक कठडा बांधण्याचे वरीष्ठ अधिकाऱ्यांना कळविण्यात आले असल्याचे सांगिले. परंतु, या कामासाठी अद्यापही निधी प्राप्त झाला नसल्याची माहिती समोर येत आहे. तरी संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी, वाहनचालक व प्रवासी वर्गातून केली जात आहे.

## खारघरमधून तरुणी बेपत्ता

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



खारघर वसाहतीमधील स्वप्नपुर्ती सोसायटीमधून एक १९ वर्षीय तरूणी बेपत्ता झाल्याने ती हरवल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. काजल यादव वाघमारे असे या तरुणीचे नाव असून तिची उंची ४.२ फुट, रंग सावळा, केस मध्यम, नाक बसके, डोळे काळे, बांधा सळपातळ, चेहरा उभट, अंगात नेसुन सिल्व्हर रंगाचा फुल शर्ट व निळसर रंगाची जीन्स पॅन्ट घातलेली आहे. या तरुणीबाबत कोणाला माहिती असल्यास खारघर पोलीस ठाणे किंवा पोलीस नाईक शशिकांत पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# निवडक



## हरवलेले मोबाईल हस्तगत करण्यात यश

**महाड** : येथील एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील हरवलेल्या मोबाईल प्रकरणांचा प्रभावी तपास करत पोलिसांनी एकूण ६ मोबाईल हस्तगत करण्यात यश मिळवले आहे. हस्तगत करण्यात आलेल्या मोबाईलची एकूण किंमत २ लाख ४० हजार रुपये असून संबंधित तक्रारदारांना ते परत करण्यात आले आहेत. गेल्या काही महिन्यांमध्ये विविध नागरिकांचे मोबाईल हरवल्याच्या तक्रारी पोलीस ठाण्यात दाखल झाल्या होत्या. या प्रकरणांचा तपास सहायक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. बल्लाळ यांनी केला. सीईआयआर पोर्टलच्या माध्यमातून तांत्रिक विश्लेषण करत हरवलेले मोबाईल शोधून काढण्यात आले. यातील प्रत्येक मोबाईलची अंदाजे किंमत ४० हजार रुपये असून एकूण २ लाख ४० हजार रुपयांचे मोबाईल संबंधित तक्रारदारांच्या ताब्यात देण्यात आले. मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी पोलिसांचे आभार व्यक्त केले.



## ई-रिक्षा बंदला तूर्तास स्थगिती

**माथेरान** : येथील ई-रिक्षा वाढीसाठी रिक्षा संघटनेने शासनाच्या धोरणाचा निषेध म्हणून जाहीर बेमुदत ई-रिक्षा बंदचे आंदोलन पुकारले होते. मात्र, हे आंदोलन तूर्तास मागे घेण्याचा निर्णय घेतला असून मंगळवारी (दि.१०) ई-रिक्षा पुन्हा सुरू करण्यात आल्या आहेत. माथेरानमधील ९४ परवाना धारक हात रिक्षाचालकांना सरसकट ई-रिक्षा चालविण्याचा परवाना मिळावा याकरिता श्रमिक हातरिक्षा चालक-मालक संघटनेने मंगळवारपासूनबेमुदत रिक्षा बंदचा इशारा दिला होता. त्यानुसार सकाळपासून ई-रिक्षा बंद ठेवण्यात आल्या होत्या. परंतु; नगरपालिकेमध्ये माथेरानचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी एक विशेष बैठक रिक्षा संघटनेबरोबर घेतली. यावेळी त्यांनी सांगितले की, गुरूवारी (दि.१२)सनियंत्रण समितीची बैठक होत असून त्यामध्ये ई-रिक्षावाढी संदर्भात निर्णय घेण्यात येणार आहे. त्यामुळे हा बंद तूर्तास मागे घेण्याची विनंती त्यांनी केली होती. त्यांच्या विनंतीला मान देताना रिक्षा संघटनेने १२ तारखेपर्यंत निर्णय होईपर्यंत हा बंद मागे घेतला असून मंगळवारी संध्याकाळी ई-रिक्षा पुर्ववत सुरू करण्यात आल्या आहेत.

## नवीन पनवेलमधील पाईपलाईन जीर्णावस्थेत

**पनवेल** : नवीन पनवेल सेक्टर-१३ ए टाईप येथील जीर्ण झालेली पाणीपुरवठा पाईपलाईन बदलून नवीन पाईपलाईन टाकावी, तसेच अत्यंत जुनी व जीर्ण अवस्थेत असलेली ड्रेनेज लाइन दुरुस्त करण्याची मागणी नगरसेवक मनोज भुजबळ यांनी आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. मनोज भुजबळ यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नवीन पनवेल सेक्टर १३ ए टाईप परिसरातील अंतर्गत ड्रेनेज सिव्हरेज लाईन ही अत्यंत जुनी व जीर्ण अवस्थेत असून अनेक ठिकाणी तुटलेली व चोकअप झालेली आहे. त्यामुळे सांडपाणी रस्त्यावर येत असून दुर्गंधी व विविध आजार पसरत आहे. या समस्येमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून डासांचा प्रादुर्भाव वाढत आहे. पावसाळ्याच्या काळात परिस्थिती अधिकच गंभीर होते व नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. तरी सेक्टर १३ ए टाईप येथील अंतर्गत ड्रेनेज सिव्हरेज लाईनची तातडीने पाहणी करून, ती योग्य पद्धतीने दुरुस्त करून चांगल्या दर्जाची नवीन लाईन टाकून देण्यात यावी. तसेच, या परिसरात असलेली पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन ही अत्यंत जीर्ण व जुनी झालेली आहे. या पाईपलाईनमधून वारंवार गळती होत असल्यामुळे बाहेरील गटाराचे व पावसाचे खराब पाणी त्या पाईपमधून पिण्याच्या पाण्यात मिसळते. त्यामुळे नागरिक वारंवार विविध आजारांनी ग्रस्त होतात. तसेच, पाण्याच्या दाबामध्ये देखील मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना अत्यल्प प्रमाणात पाणी मिळत असून अनेक घरांपर्यंत पाणी वेळेवर व पुरेशा प्रमाणात पोहोचत नाही, याबाबत वारंवार तक्रारी करूनही अद्याप कायमस्वरूपी उपाययोजना झालेली नाही. तरी ही जीर्ण झालेली पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन तातडीने काढून त्या ठिकाणी नवीन व क्षमतेची पाईपलाईन टाकून देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

**वरद गावंड यांची जलरंग कलाकृती | सिंगापूर येथील प्रदर्शनासाठी निवड**

# उरणमधील युवा चित्रकाराची आंतरराष्ट्रीय भरारी

**। उरण । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील उरण येथील युवा चित्रकार वरद गावंड यांच्या जलरंग कलाकृतीची सिंगापूर इंटरनॅशनल वॉटरकलर सोसायटी येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा व प्रदर्शनासाठी निवड झाली आहे. या यशामुळे जिल्ह्यातील कला क्षेत्रात गौरवाची भावना निर्माण झाली आहे.

ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा व प्रदर्शन दि. ७ ते १० जून दरम्यान सिंगापूर येथील मॅकफर्सन आर्ट स्टुडिओ येथे होणार असून, कार्यक्रमाचे शीर्षक 'शालोम पीस (शांती)' असे आहे. स्पर्धेचा विषय अनिर्बंध असून, १८ वर्षांवरील कलाकारांसाठी गट ३ (उत्कृष्ट समूह) अंतर्गत ही निवड झाली आहे. या स्पर्धेसाठी



अतनूर डोगान (तुर्की/कॅनडा), हाँग शान (चीन), सुसाना सुन लियान (सिंगापूर) यांच्यासह जगभरातील नामवंत कलाकार व क्युरेटर परीक्षक म्हणून लाभले आहेत.

वरद गावंड हे सध्या देवरुख कॉलेज ऑफ फाईन आर्ट येथे बॅचलर ऑफ फाईन आर्ट (प्रथम वर्ष) शिक्षण घेत आहेत. त्यांनी साकारलेली 'द एज ऑफ द स्टॉर्म' ही कलाकृती ३री आयडब्ल्यूएस सिंगापूर आंतरराष्ट्रीय जलरंग स्पर्धा व प्रदर्शनासाठी निवडण्यात आली आहे. या चित्रात आकाश आणि पृथ्वी यांच्यातील नाट्यमय क्षण प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. सोनेरी पिवळा, मऊ निळा आणि अग्निमय केशरी रंगांनी सजलेले आकाश जांभळ्या व राखाडी छटांमध्ये विरघळताना दिसते. प्रकाश आणि सावलीचा खेळ चित्राला सखोल भावनिक परिणाम देतो. खालील भागात मातीचा तपकिरी रंग, पाण्यातील शांत प्रतिबिंब, लहान शिडाच्या बोटी आणि विखुरलेले पक्षी जीवन आणि हालचालीचे प्रतीक ठरतात. ही कलाकृती कागदावर जलरंग माध्यमात साकारण्यात आली आहे. वरद गावंड हे प्रामुख्याने निसर्गचित्रे, व्यक्तिचित्रे आणि लाईव्ह पेंटिंगसाठी ओळखले जातात. त्यांच्या कलाकृतींमधून निसर्गाची भव्यता आणि मानवी भावना यांचा सुरेख संगम दिसून येतो. सामाजिक जागरूकता, समानता आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांसारख्या विषयांवर ते आपल्या कलेतून भाष्य करतात. त्यांच्या या यशामागे देवरुख कॉलेज ऑफ फाईन आर्टचे प्राचार्य रणजीत मराठे, संस्थापक अजय पित्रे तसेच प्राध्यापक वर्गाचे मार्गदर्शन व प्रोत्साहन महत्त्वाचे ठरले आहे. कॉलेज प्रशासनाने वरद यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. यापूर्वीही वरद यांच्या कलाकृतींना राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून, कर्नाटक चित्रकला परिषद, बेंगळुरू येथे झालेल्या राष्ट्रीय प्रदर्शनात तसेच पुणे आर्ट फिएस्टा २०२५ या सामूहिक प्रदर्शनात त्यांच्या कलाकृतींची निवड होऊन विशेष सन्मान मिळाला आहे.



# चंद्रपुरातील हाराकिरी

हा महाराष्ट्र आता पुरोगामी आणि नैतिकतेचा आग्रह धरणारा उरलेला नाही. महानगरपालिका आणि कालपरवाच्या जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये जे घडले त्यावरून तरी असाच निष्कर्ष काढावा लागेल. सगळीकडे पीछेहाट झाल्याने विरोधकांना ही द्राक्षे आंबट झाली आहेत असे कोणी म्हणेल. पण ते पूर्णतः चूक आहे. कारण, सत्तेची दादागिरी, पैशांचे तुफान वाटप आणि विरोधकांमध्ये फूट पाडणे यामुळेच युतीचे ठिकठिकाणी विजय झाले आहेत. या राज्याने गेल्या ७० वर्षांमध्ये कधीही निवडणुकीत पैशांचा असा महापूर पाहिलेला नाही. प्रत्येक मतामागे दोन ते पाच हजार रुपयांचा दर चालल्याच्या बातम्या खुलेआम प्रसिध्द होत आहेत किंवा, नेतेमंडळीही पैसे वाटण्याच्या कार्यक्रमाचे उघड समर्थन करीत आहेत असे पूर्वी कधीही दिसले नव्हते. ते आता सर्रास दिसते आहे. अजितदादांच्या निधनामुळे देवेंद्र फडणवीसांनी जिल्हा परिषदेच्या प्रचारामध्ये सभा घेतल्या नाहीत. पण शिंदे यांच्या सभा झाल्याच. फडणवीस, शिंदे जितके फिरतात किंवा मेहनत करतात तितके विरोधक करीत नाहीत अशी टीका माध्यमांमधून केली जाते. पण आमच्या मते महायुतीच्या नेत्यांचे दौरे ही निव्वळ रंगसफेदी आहे. या झंझावाती प्रचारामुळेच आम्हाला यश मिळाले असे दाखवण्यासाठी बहुदा या सभा घेतल्या जातात. तसे नसते तर महायुतीला खाली बाकीचे मार्ग वापरावे लागले नसते. पैसे वाटण्यामध्ये महायुतीने सर्व विक्रम पार केले आहेत असे सर्व वृत्तपत्रांच्या बातम्या व लेखांमध्ये वारंवार उल्लेख आहेत. रायगडातील आम जनतेचाही हाच अनुभव आहे. नेत्यांच्या सभांच्या आधारे निवडणुका जिंकल्या जात असत्या तर हे सर्व केले गेले नसते. यात पैसे घेऊन मते विकणाऱ्यांचा दोष आहेच. पण त्यांना ही सवय किंवा चटक लावत आहेत ते महादोषी आहेत. हा प्रवास राज्याला खड्ड्यात घालणारा आहे. अशा रीतीने निवडून येणारे काय दर्जाचा कारभार करतील हे कोणालाही कळण्यासारखे आहे. येत्या काळात सर्व पालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमध्ये पैसे वसुलीच्या मोहिमा सुरू झाल्या तर आश्चर्य वाटायला नको. जनता त्याकडे केविलवाणेपणाने पाहत बसण्याखेरीज काहीही करू शकणार नाही.

## धनशक्ती आणि सत्ता

राजकीय पक्षांचा जाहीरनामा, त्यांचे पूर्वीचे काम, उमेदवारांचे चारित्र्य या गोष्टी आता गौण झाल्या. मतदारांना पैसे दिले की या गोष्टी विसरल्या जाण्याची व्यवस्था करता येते अशी स्थिती महायुतीने निर्माण केली आहे. शिवाय पैसे घेऊन मते विकण्यामध्ये गैर काही नाही असे वातावरणही महायुतीच्या गेल्या चार वर्षातील राजकारणामुळेच निर्माण झाले आहे. भाजपने शिवसेना व राष्ट्रवादी फोडली व सत्तेसाठी काहीही केले तरी योग्यच ठरते असे वातावरण तयार केले. तसे करणाऱ्या फडणवीस आणि कंपनीला मिडियाने धुरंधर, मुत्सदी, चाणक्य इत्यादी म्हणून रंगवले व त्यांचे सतत कौतुक केले. त्यामुळे लोकांची भ्रष्टाचाराबाबतची लाज आता मेली. कालच्या निवडणुकीचे निकाल हा त्यांचाच परिपाक आहे. या स्थितीत विरोधकांपुढे लोकांची ही सवय बदलणे आणि त्यांचा विश्वास पुन्हा जिंकणे असे दुहेरी आव्हान उभे ठाकले आहे. त्यासाठी आपण वेगळे आहोत व भाजप युतीविरोधात एक ठाम भूमिका घेऊन लढत आहोत हे त्यांना दाखवून द्यावे लागेल. दुर्दैवाने राज्यात अनेक ठिकाणी विरोधकांना ही भूमिका टिकवता आलेली नाही. चंद्रपूर हे त्यातले सर्वात भयंकर उदाहरण आहे. त्या पालिकेत काँग्रेसला सर्वाधिक जागा होत्या. तरीही अखेर तिथे भाजपच्या महापौर स्थानापन्न झाल्या आहेत. काँग्रेसच्या खासदार प्रतिभा धानोरकर आणि विजय वडेट्टीवार यांच्या दोन गटांमध्ये असलेले वाद इतके टोकाला गेले की ना तुला, ना मला अशी स्थिती त्यांच्या बाबतीत झाली. ठाकरे सेना तिथे महापौरपद मागत होती. पण काँग्रेसने आपला हेका सोडला नाही. आता भाजपने सव्वा वर्षानंतर ठाकरे सेनेचा महापौर करण्याचे लेखी आश्वासन दिले आहे. पण भाजपचा आजवरचा इतिहास पाहता मधल्या काळात ठाकरे सेनेचा हा गटच फोडण्याचा प्रयत्न भाजप करू शकेल. दुसरीकडे भाजपवाले काँग्रेसच्याही एखाद्या गटाला सोबत घेऊ शकतील. त्यामुळे काँग्रेस व ठाकरे सेनेने थोडे चातुर्य व संयम दाखवला असता तर त्यांना एकत्रितपणे सत्ता मिळाली असती व भाजपलाही सत्तेपासून दूर ठेवता आले असते. पण ते त्यांना जमले नाही.

## शिंगावर घ्यावे लागेल

चंद्रपुरातील काँग्रेसचा वाद दिल्लीपर्यंत गेला होता. पण दिल्लीवाल्यांचा शब्दही खालच्या नेत्यांनी मानलेला दिसत नाही. दुसरीकडे ठाकरे सेनेचे जिल्हाध्यक्ष आपण वरिष्ठांच्या संपर्कात होतो असे सांगत आहेत. कोणत्याही स्थितीत भाजपशी तडजोड नाही अशी भूमिका या दोन्ही पक्षांच्या वरिष्ठांना किंवा खालच्या नेत्यांना पुरेशा जोरकसपणे घेता आली नाही असा याचा अर्थ होतो. भाजपसोबतची लढाई का चालू आहे व तिचे गांभीर्य किती आहे हे पक्षाच्या कार्यकर्त्यांनाच पटवून देता येत नसेल तर हा संदेश जनतेपर्यंत पोचावा तरी कसा? ज्या भाजपने शिवसेना फोडून आज ठाकरे यांच्यावर वनवासाची वेळ आणली व अगदी मुंबई पालिकाही गमवावी लागली, त्या भाजपशीच इतरत्र मैत्री होत असेल तर कठीण आहे. काँग्रेसच्या नेत्यांची तर दिल्लीतली सत्ता भाजपने घालवली आहे व सगळे सामर्थ्य खच्ची केले आहे. तरीही खालच्या काँग्रेसी नेते अशी भांडणे करीत राहतात हे धक्कादायक आहे. दरम्यान, चंद्रपुरात वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक गैरहजर राहिले व एमआयएमचे नगरसेवक मतदानादरम्यान तटस्थ राहिले. त्याचा फायदा भाजपला झाला. अकोल्यामध्ये भाजपला सत्तेपासून रोखण्यासाठी वंचितच्या प्रकाश आंबेडकरांनी पुढाकार घेतला होता. पण तिथेही शेवटी फाटाफूट झाली होती. एमआयएमची भूमिका तर कायमच संशयास्पद असून भाजपला मदत करण्यासाठीच जणू त्यांचे राजकारण चालू असते. त्यामुळे या पक्षांवर विसंबून न राहता काँग्रेस, ठाकरे सेना किंवा महाविकास आघाडीतील इतर पक्षांना आपली ताकद वाढवण्याखेरीज पर्याय नाही. महापौरपदाला तसेही फार अधिकार नसतात. त्यामुळे त्यासाठीची लढाई हरणे म्हणजे खूप मोठा पराभव नव्हे. पण हातात सर्व पत्ते असूनही केवळ गटबाजी आणि कुरघोड्यांच्या राजकारणामुळे हमखास मिळणाऱ्या विजयाचे पराभवात रुपांतर करणे हे भयंकर आहे. काँग्रेस व इतर पक्षांनी यापासून तात्काळ धडा घ्यायला हवा व कृती करायला हवी. मुंबई महापालिकेत भाजपचा महापौर बिनविरोध होऊन देऊन ठाकरे सेनेने एका अर्थी शहाणपणा केला आहे. कारण, भाजप युतीकडे अगदीच काठावरचे बहुमत आहे. हे लक्षात घेता निवडणूक सेफ करण्यासाठी भाजपने सेनेमध्येच फोडाफोडी करण्याचा नक्कीच प्रयत्न केला असता. मात्र इथून पुढे भाजपच्या या राजकारणाला शिंगावर घेण्याची तयारी ठेवावी लागेल. तरच ठाकरे सेना व काँग्रेस व इतर विरोधी पक्षांचा निभाव लागू शकेल. सततच्या पराभवानंतर त्यांच्यावरची जबाबदारी आता अधिक वाढली आहे.

---

**विचार**

# वाद पद्म पुरस्कारांचा

***केंद्रीय गृहमंत्रालय पद्म पुरस्कारांची घोषणा करत असले, तरी त्यावर पंतप्रधान कार्यालयाचा वरचष्मा असतो. काहींना पद्म सन्मान दिल्याने पुरस्कारांचा मान वाढतो, तर काहींमुळे या सन्मानाचे महत्त्व कमी होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी कडव्या टीकाकारांचा तसेच विरोधी पक्षातील काहीजणांचा सन्मान करून आपण किती वेगळे आहोत, हे दाखवत असले तरी काही अपात्रांची नावे पुरस्कारांच्या यादीत येऊन वाद होतात, हे ही वास्तव आहे.***



**प्रा. अशोक ढगे**

पद्म पुरस्कार हे फक्त सन्मान असतात. ते नावापुढे लावता येत नाहीत. नावापुढे पद्म पुरस्कार लावून लेटरपॅडही छापून घेता येत नाहीत. कुणाला शिफारसही करता येत नाही. त्यामुळे हे सन्मान संबंधितांच्या निष्पक्षपातीपणाचा किती खोलवर विचार केला आहे, हे स्पष्ट होते; परंतु देशात सरकार असलेल्यांना पद्म सन्मान म्हणजे खिरापत वाटते. देशातील अनेकांनी पद्म पुरस्कार विनम्रपणे नाकारले आहेत, तर काहींची ते मिळवण्यासाठी मोर्चेबांधणी सुरू असते. पूर्वी तर हे सन्मान निवडण्यासाठी समितीच नव्हती. गृह मंत्रालयाचे अधिकारीच अशा नावांची निवड करायचे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर समिती नेमण्यात आली; परंतु अजूनही या समितीच्या पद्म सन्मान निवडण्यावरून अनेकदा वाद होतात. दर वर्षी असेच होते. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला जाहीर झालेले पद्म पुरस्कार संदेश देतात, की मोदी सरकार त्यांच्या वैचारिक विरोधकांनाही सन्मानित करण्यास कचरत नाही. त्याच वेळी राज्यघटना, उच्च न्यायालयाचे आदेश न पाळता मनाला येईल, तसा कारभार करणाऱ्यांनाही पद्म देऊन सन्मानित करण्यात आले. यंदा जाहीर झालेल्या पद्म पुरस्कार यादीतील दोन नावे विशेषतः चर्चेत होती. केरळचे माजी मुख्यमंत्री आणि ज्येष्ठ मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते व्ही.एस. अच्युतानंदन आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन. सरकारने या दोन्ही दिवंगत नेत्यांना पद्म पुरस्कारांनी सन्मानित केले. त्यांच्या राजकीय संदेशावर आणि संभाव्य रणनीतीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

अच्युतानंदन हे भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कट्टर टीकाकार राहिले आहेत. त्यांनी या संघटनांना सांप्रदायिक म्हटले आणि भाजपवर संवैधानिक संस्थांचा गैरवापर केल्याचा आरोप केला. त्यांनी धर्मनिरपेक्ष शक्तींना भाजपाविरुद्ध एकत्र येण्याचे वारंवार आवाहन केले. ते काँग्रेस आणि राहुल गांधी यांच्यावर वारंवार 'हल्ला बोल' करत 'अपरिपक्व' अशी टीका करत होते. महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी राज्यपाल असताना घेतलेले अनेक निर्णय वादग्रस्त ठरले होते. कोश्यारी यांना हा सन्मान जाहीर झाल्यानंतर त्यांच्या कार्यकाळातील जुन्या वादांना पुन्हा तोंड फुटले आहे. राज्यपाल असताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्याबद्दल केलेली विधाने वादग्रस्त ठरली होती. अशा परिस्थितीत त्यांना दिलेल्या पद्म पुरस्कारावरून त्यावर टीका होणे स्वाभावीक आहे. पद्म पुरस्काराची घोषणा झाली असली, तरी यावरून पुढील काही दिवस राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे आहेत. अच्युतानंदन यांना पद्मविभूषण देण्याचा निर्णय केरळ विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात राजकीयदृष्ट्या पाहिला जात आहे. केरळमध्ये आपला पाया वाढवण्याचा प्रयत्न करणाऱ्या भाजपला आशा आहे की या निर्णयामुळे डाव्या समर्थकांमध्ये पश्चिम बंगालप्रमाणेच सकारात्मक संदेश जाईल. झारखंडमध्ये पद्म पुरस्काराचे राजकीय अर्थ लावले जात आहेत. आदिवासी राजकारणातील सर्वात प्रभावशाली व्यक्तींपैकी एक असलेल्या शिबू सोरेन यांना पद्मभूषण देण्याचा निर्णय अशा वेळी घेण्यात आला आहे, जेव्हा राज्यात भाजप आणि झारखंड मुक्ती मोर्चा यांच्यात संभाव्य संबंध निर्माण झाली आहे.

बिहार निवडणुकीत 'एनडीए'च्या प्रचंड विजयानंतर हेमंत सोरेन यांचा झारखंड मुक्ती मोर्चा काँग्रेसपासून दूर जाऊन भाजपमध्ये सामील होऊ शकतो, अशी अटकळ सुरू झाली. हेमंत सोरेन आणि त्यांच्या पत्नी कल्पना सोरेन एका वरिष्ठ केंद्रीय मंत्र्याला भेटल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. त्यामुळे केंद्र सरकार शिबू सोरेन यांना भारतरत्न किंवा पद्म पुरस्कार देऊन झारखंड मुक्ती मोर्चाला काही संकेत देऊ शकते, अशी अटकळ बांधली जात होती. सोरेन यांना हा सन्मान जाहीर झाल्यामुळे राजकीय वर्तुळात या अटकळींना आणखी बळकटी मिळाली आहे. असे मानले जाते, की भाजप आदिवासी मतपेढीत प्रवेश करण्यासाठी शिबू सोरेन यांच्या प्रभावाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करत आहे, कारण त्यांच्या सर्वोत्तम प्रयत्नांनंतरही, ही मतपेढी मजबूत करण्यात त्यांना अपयश आले आहे. मोदी सरकारच्या विरोधकांना सन्मानित करण्याची भूतकाळातील उदाहरणे पाहता मोदी सरकारने वैचारिक आणि राजकीय विरोधकांना सन्मानित करण्याची ही पहिलीच घटना नाही. अनेक वेळा सरकारने महत्त्वाच्या निवडणूक परिस्थितीत प्रमुख राजकीय व्यक्तींना पद्म पुरस्कार किंवा भारतरत्न देऊन सन्मानित केले आहे. दर वर्षी देशातील सर्वात प्रतिष्ठित नागरी सन्मानांपैकी पद्म पुरस्कारांची घोषणा केली जाते. ही घोषणा स्वतःच एक संदेश देते, की राष्ट्र अशा लोकांचा सन्मान करत आहे, ज्यांनी कोणत्याही राजकीय पदाशिवाय किंवा सत्तेशिवाय त्यांच्या कार्याद्वारे समाज आणि देशाची प्रगती केली आहे. पद्म पुरस्कार नेहमीच राजकारणाच्या वर राहिले पाहिजेत, अशी अपेक्षा असते; परंतु ती पूर्ण होतेच असे नाही.

कला, साहित्य, क्रीडा, वैद्यक, विज्ञान, समाजसेवा आणि इतर क्षेत्रात अपवादात्मक योगदान देणाऱ्यांची निवड त्यांच्या कठोर परिश्रम आणि कामगिरीच्या आधारे करावी अशी अपेक्षा असते. काहींची निवड या निकषांच्या आधारे केली जाते; परंतु त्यात काही नावे आपल्याला हवी तशी घुसडली जातात आणि त्यावरून वाद होत असतो. पद्म पुरस्कार खरोखरच निष्पक्ष आहेत का, की ते सत्तेत असलेल्या सरकारच्या प्राधान्यक्रमांना प्रतिबिंबित करतात याबद्दल वेळोवेळी प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. काँग्रेसचे नेते प्रवीण चक्रवर्ती यांच्या 'सोशल मीडिया' पोस्टमुळे पद्म पुरस्कारांबद्दल एक नवीन वाद निर्माण झाला आहे. या वादामुळे केवळ पुरस्कार प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले नाही, तर लोकशाही व्यवस्थेत सन्मान आणि राजकारण पूर्णपणे वेगळे करता येते का, याचा विचार करण्यास भाग पाडले आहे. या वर्षी पद्म पुरस्कार जाहीर झालेल्यांपैकी ३७ टक्के पुरस्कार २०२६ मध्ये विधानसभा निवडणुका होणाऱ्या राज्यांमधून आले आहेत. यामध्ये आसाम, केरळ, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या राज्यांचा समावेश आहे. त्यांनी असे निदर्शनास आणून दिले, की या राज्यांची एकूण लोकसंख्या देशाच्या फक्त १८ टक्के आहे, तरीही त्यांना पुरस्कारांमध्ये खूप जास्त प्रतिनिधित्व मिळाले आहे. त्यांच्या मते, हा एक-वेळचा योगायोग नाही, तर वारंवार होणारा प्रकार आहे. त्यांनी याला 'पद्म पुरस्कारांचे निवडणुकीकरण' म्हटले आणि दावा केला, की सरकार या पुरस्कारांचा वापर जनतेला सकारात्मक संदेश देण्यासाठी आणि निवडणुकीच्या वातावरणावर प्रभाव पाडण्यासाठी करत आहे.

कार्ती चिदंबरम यांनीही पद्म पुरस्कारांबद्दल प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांची पोस्ट शेअर होताच 'सोशल मीडिया'वर प्रतिक्रियांचा पाऊस पडला. काही तासांमध्येच त्याला शेकडो लाईक्स आणि कॉमेंट्स मिळाल्या. काहींनी याला तथ्यांवर आधारित धाडसी प्रश्न म्हटले, तर टीकाकारांनी याला विरोधकांच्या 'निराशेची अभिव्यक्ती' असे म्हटले. सरकारी समर्थकांनी म्हटले आहे, की पद्म पुरस्कार पूर्वीपेक्षा अधिक पारदर्शक आणि आदरणीय झाले आहेत. त्यांच्या मते, या पुरस्कारांवर पूर्वी 'दिल्ली दरबार' संस्कृतीचे वर्चस्व होते, तर आता गावे आणि शहरांमधील अज्ञात नायकांनाही मान्यता मिळत आहे. या तर्कानुसार, एखाद्या राज्यात अधिक पात्र व्यक्ती निर्माण होत असल्यास अधिक पुरस्कार दिले जाणे स्वाभाविक आहे. तथापि, दुसरीकडे निवडणुकीच्या तोंडावर असलेल्या राज्यांमधून सतत अधिक नावे समोर येतात तेव्हा संशय निर्माण होणे स्वाभाविक आहे. महाराष्ट्राने या वर्षी आघाडी घेत १५ पद्म पुरस्कार मिळवले.

गेल्या वर्षीपेक्षा ही संख्या थोडी जास्त आहे. महत्त्वाचे म्हणजे, महाराष्ट्राला केवळ संख्येच्या बाबतीतच नव्हे तर उच्चस्तरीय पुरस्कारांच्या संख्येतही लक्षणीय वाटा मिळाला आहे. तामिळनाडूला या वर्षी १३ पद्म पुरस्कार मिळाले आहेत. गेल्या वर्षी ही संख्या तेवढीच होती. उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालला प्रत्येकी ११ पुरस्कार मिळाले. उत्तर प्रदेशला पद्मविभूषणदेखील मिळाले तर पश्चिम बंगालला पद्मश्री श्रेणीतील सर्व पुरस्कार मिळाले. पश्चिम बंगालला गेल्या वर्षीपेक्षा या वर्षी जास्त पुरस्कार मिळाले. केरळला एकूण आठ पद्म पुरस्कार मिळाले.


तथापि, या वर्षी पद्मविभूषणसारख्या सर्वोच्च स्तरावरील पुरस्कारांमध्ये केरळची उपस्थिती मजबूत आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी उत्तर भारताला कमी पुरस्कार मिळाले. त्याचप्रमाणे पूर्व आणि ईशान्य भारताचा वाटाही किंचित कमी झाला. या आकडेवारीमुळे वाद आणखी गुंतागुंतीचा झाला, कारण काही राज्यांमध्ये वाढ दिसून येते, तर काहींमध्ये घट दिसून येते. केरळ वगळता पश्चिम बंगाल, आसाम, पुद्दुचेरी आणि तामिळनाडूमध्ये मार्च-एप्रिलमध्ये विधानसभा निवडणुका होण्याची अपेक्षा आहे. केरळमध्ये मे महिन्यात निवडणुका होण्याची अपेक्षा आहे. येत्या काही महिन्यांमध्ये निवडणुका होऊ घातलेल्या राज्यांना जादा पद्म पुरस्कार देताना काही वादग्रस्त नावे दिसत आहेत. त्यामुळे हा वादाचा विषय झाला.

---

# अजित दादांचा अप'घात'?

**संतोष राऊळ**

दिवंगत नेते अजित पवार यांचा विमान दुर्घटनेत दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या अपघाती मृत्यूनंतर अनेकांकडून धक्कादायक मुद्दे मांडले गेले. ही दुर्घटना साधा अपघात नसून त्यामागे घातपात असल्याचे देखील बोलले जात आहे. त्यात नुकतीच आमदार रोहित पवार यांनी मंगळवारी (दि.१०) पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी अनेक धक्कादायक मुद्दे मांडले. त्यामुळे सर्वांच्या भुवया उंचावल्या असून अजित दादांचा अपघात झाला की कोणी घात केला, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे.



रोहित पवार यांनी मंगळवारी पत्रकार परिषद घेतली. त्यात त्यांनी अजित पवार यांच्या २७ जानेवारीच्या प्रवास वेळापत्रकापासून ते विमानाच्या तांत्रिक बाबींपर्यंत अनेक मुद्यांवर सविस्तर भाष्य केले. त्यांनी सांगितले की, अपघाताच्या आदल्या दिवशी अजित पवार हे मुंबईहून गाडीने पुण्याकडे जाणार होते. त्यासाठी ताफ्याचीही तयारी झाली होती. मात्र, एका महत्त्वाच्या नेत्याच्या उशिरा भेटीमुळे वेळापत्रक ढासळले आणि अखेर त्यांना विमानाने जावे लागले, असा दावा रोहित पवार यांनी केला. पुढे बोलताना त्यांनी, ''व्यक्तीला लक्ष्य करायचे असेल तर त्याच्या चालकावर हल्ला करणे हा सोपा मार्ग असतो'', असा एका पुस्तकातील उल्लेख सांगत त्यांनी या दुर्घटनेमागे घातपात असू शकतो, अशी शंका व्यक्त केली. मात्र, त्यांनी कोणावर थेट आरोप नसल्याचे स्पष्ट केले. रोहित पवार यांनी व्हिएसआर विमान कंपनी, 'ॲरो' कंपनी आणि कपूर नावाच्या पायलटबाबत संशय व्यक्त केला. ॲरो कंपनीने व्हिएसआरचे विमान भाड्याने घेतले होते. व्हिजिबिलिटी क्लिअर असल्याचे सांगण्यात आले होते. परंतु, प्रत्यक्ष परिस्थिती काय होती, याची चौकशी व्हावी, असे त्यांनी म्हटले. या कंपन्यांचे राजकीय नेत्यांशी संबंध असल्याचाही त्यांनी उल्लेख केला.

रोहित पवार यांच्या मते, व्हिजिबिलिटी कमी असतानाही विमान उतरवण्याचा प्रयत्न झाला. विमान अन्य विमानतळावर वळवले असते तर कंपनीचे आर्थिक नुकसान झाले असते. त्यामुळे घाई करण्यात आली असावी, असा त्यांचा दावा आहे. तसेच, विमानातील स्टॉल वॉर्निंग सिस्टिम बंद होती, पीटीटी सिस्टिममध्ये आवाज नव्हता, देखभाल प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह आहे, असेही त्यांनी नमूद केले. ब्लॅक बॉक्समधून अनेक गोष्टी स्पष्ट होतील, असे ते म्हणाले. या सर्व पार्श्वभूमीवर, हा अपघात होता की घात होता? हा प्रश्न उपस्थित करत रोहित पवार यांनी या संपूर्ण प्रकरणाची सखोल, तांत्रिक आणि निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी जोरदार मागणी केली.

त्यानंतर या विमान अपघातात निधन पावलेल्या फ्लाईट अटेन्डंट पिंकी मालीच्या कुटुंबियांनी वृत्तवाहिनीशी बोलताना रोहित पवारांच्या दाव्यावर आपले मत व्यक्त केले आहे. पिंकी मालीचे वडील म्हणाले की, रोहित पवार यांच्या मताशी मी सहमत आहे. कारण घातपात झाल्याची शंका घ्यायला जागा आहे. कारण माझी मुलगी पिंकीने पाच वेळा अजित पवार यांच्याबरोबर प्रवास केला. त्यापैकी चार वेळा काळ्या रंगाचे विमान होते. परंतु, पाचव्यांदा पांढऱ्या रंगाचे चार्टड विमान का निवडले गेले? ते पुढे म्हणाले की, रोहित पवारांनी सांगितले त्याप्रमाणे सकाळच्या वेळेस ट्राफिक नसते. तरीही वैमानिक बदलला गेला. याची चौकशी व्हायला हवी. पिंकीने आदल्या दिवशी मला फोन करून अजित पवारांबरोबर प्रवास करणार असल्याचे म्हटले होते. बारामतीला पोहोचल्यानंतर हॉटेलमध्ये गेल्यानंतर तुमच्याशी फोनवर बोलेन, असे पिंकीने सांगितले होते. तुला काय बोलायचे आहे? असे विचारले असता तिने सांगितले की, मला खूप काही बोलायचे आहे. पण दुर्दैवाने लँडिंगवेळी अपघात झाला, असेही शिवकुमार माली यांनी सांगितले.

त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, कोणाच्याही मनात काही शंका असेल तर त्याचं निरसन झालं पाहिजे. आपल्याकडे अनेक तासयंत्रणा उपलब्ध आहेत. या तपासयंत्रणांकडून सखोल तपास होणं अपेक्षित आहे. त्या पद्धतीने चौकशी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, आमदार अमोल मिटकरी यांनी देखील याबाबत चौकशी करण्याचे लेखी निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केले आहे. त्यात त्यांनी, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातामध्ये दुर्दैवी निधनानंतर या घटनेत तर्कसंगत शंका असल्याचे सांगत उच्चस्तरीय, निष्पक्ष चौकशी करण्याचे नमुद केले आहे. तसेच, हा अपघात होता की नियोजित घात? अशी शंका देखील त्यांनी उपस्थित केली आहे. त्यामुळे रहिवाशी आणि राजकीय मंडळांमध्येही चर्चा आणि संभ्रम वाढल्याच्या पार्श्वभूमीवर सर्व स्तरातून चौकशीची मागणी करण्यात येत आहे.

या सर्व आरोपांमुळे सर्वसामान्यांमध्ये आणि अजित पवार यांच्या समर्थकांमध्ये शंकेची पाल चुकचुकू लागली आहे. त्यामुळे हा खरच अपघात होता की घात, अशी चर्चा सर्वस्तरातून होत आहे.

---

**लोकसंसद**

## 'एआय'च्या आक्षेपार्ह गैरवापरावर कठोर कारवाई




आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात आपल्या दैनंदिन जीवनात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञान हे जितके सुखदायक आणि उपकारक ठरले आहे तितकेच 'एआय'च्या आक्षेपार्ह गैरवापरामुळे नवनवीन सामाजिक समस्यांना तोंड फुटले आहे. 'एआय'चा वापर करून सोशल मीडियावरून अश्लील आणि आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केला जातो. विशेषतः अशा मजकुराद्वारे महिला आणि लहान मुले यांना लक्ष्य केले जाते. यावर प्रतिबंध आणण्यासाठी केंद्र सरकारने कडक पावले उचलली असून माहिती तंत्रज्ञान नियम, २०२१ यामध्ये सुधारणा केली आहे आणि माहिती तंत्रज्ञान (मध्यस्थ मार्गदर्शक तत्त्वे आणि डिजिटल मीडिया नीतिमत्ता संहिता) सुधारणा नियम, २०२६ जारी केले आहेत. येत्या २० फेब्रुवारी २०२६ पासून ते अंमलात येणार आहेत. या नव्या नियमांनुसार आक्षेपार्ह मजकूर काढून टाकण्यासाठी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सना आता केवळ ३ तासांची मुदत दिली जाणार आहे. 'एआय' निर्मित प्रत्येक छायाचित्र, ऑडिओ किंवा व्हिडिओवर स्पष्ट लेबल असणे अनिवार्य केले आहे. कोणताही आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध झाल्यास त्यासाठी संबंधित सोशल मीडिया प्लॅटफॉर्मला जबाबदार धरले जाईल. डिजिटल व्यवहारातील सुरक्षितता आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी तसेच 'एआय'चा होणारा गैरवापर टाळण्यासाठी केंद्र सरकारने घेतलेला निर्णय योग्य असून स्वागतार्ह आहे.


**-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

---

**दिनविशेष**

# उत्क्रांतीवादाचा जनक : चार्ल्स डार्विन

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज जन्मदिन. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला. त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते. शालेय जीवनात त्यांना



रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत. त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले. या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली. डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

**- श्याम बसप्पा ठाणेदार,**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१२ फेब्रुवारी

१)श्री.दिलीपकुमार भगवंत म्हात्रे चेंढरे-अअलिबाग १२-०२-१९५५

२)श्रीम.अनुया मधुकर देवळे मु.नागाव, अलिबाग १२-०२-१९५७

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन





अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. गोपीनाथ जगन्नाथ पाटील स्मरणार्थ, झिराड, अलिबाग**

**डॉ. सौ अर्चना व डॉ श्री संदेश पाटील, लग्नदिनानिमित्त, अलिबाग**

# शून्य अपघातावर 'सुरक्षा मंत्र' प्रभावी

## • तांत्रिक कर्मचारी घेताहेत सुरक्षेची शपथ

**| रायगड | प्रतिनिधी |**

विद्युत सुरक्षेला सर्वोच्च प्राथमिकता देत 'शून्य विद्युत अपघात' उदिद्ष्टासाठी महावितरणने प्रत्येक सोमवारी किंवा आठवड्याच्या पहिल्या दिवशी कामाची सुरूवात विद्युत सुरक्षा शपथेने करण्याचे निर्देश दिले आहेत.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी शून्य विद्युत अपघात उद्दिष्टाची प्रभावी व सातत्याने अंमलबजावणी करण्याची सूचना केली. त्याप्रमाणे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी विद्युत सुरक्षेबाबत उपाययोजना व लोकसहभागातील उपक्रमांना वेग दिला आहे. अभियंते व कर्मचाऱ्यांसाठी विद्युत सुरक्षा ही केवळ नियमावली नसून दैनंदिन कामाचा एक भाग आहे. प्रत्येक जीव मौल्यवान असल्याने शून्य विद्युत अपघात हेच महावितरणचे ध्येय आहे. त्यामुळे विद्युत सुरक्षेचे कायम तंतोतंत पालन करावे, असे आवाहन लोकेश चंद्र यांनी केले आहे.



### अंमलबजावणी अधिकाऱ्यांवर

तांत्रिक कर्मचाऱ्यांसोबत आयोजित सर्व बैठकींची सुरूवात देखील विद्युत सुरक्षा शपथेनेच करण्यात येणार आहे. या सर्व उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सुरक्षा अधिकारी म्हणून मंडलस्तरावर कार्यकारी अभियंता (प्रशासन) आणि विभागस्तरावर अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांच्यावर देण्यात आली आहे.

विद्युत सुरक्षेबाबत सजग व सतर्क राहावे यासाठी महावितरणच्या ६६४ उपविभाग व ३२९१ शाखा कार्यालयांमध्ये प्रत्येक सोमवार हा सुरक्षा दिवस ठरविण्यात आला आहे. प्रत्येक सोमवारी किंवा आठवड्यातील कामाच्या पहिल्या दिवशी या दोन्ही कार्यालयातील अभियंते व तांत्रिक कर्मचारी सकाळी कामाची सुरुवात सुरक्षा शपथेने करीत आहे. त्यानंतर सर्व तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक सुरक्षा उपकरणे व तांत्रिक साधनांची तपासणी करण्यात येत आहे.

केंद्रीय विद्युत प्राधीकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार महावितरणने कर्मचाऱ्यांसह नागरिकांच्या विद्युत सुरक्षेसाठी विविध उपाययोजना व उपक्रमांना मोठी गती दिली आहे. जून २०२५ मध्ये महावितरणच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त विद्युत सुरक्षेच्या जनजागृतीसाठी राज्यभरात विविध उपक्रमांचे आयोजन केले होते.

यामध्ये तब्बल २ लाख ११ हजारांवर नागरिक, शालेय विद्यार्थी, अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. यासह २ कोटी ८५ लाख वीजग्राहकांना विद्युत सुरक्षेचा थेट वैयक्तिक संदेश देण्यात आला. या अभियानाची जागतिकस्तरावर नोंद घेण्यात आली.

तसेच सुरक्षितपणे देखभाल व दुरूस्तीचे कामे करण्यासाठी तांत्रिक कर्मचाऱ्यांना महावितरणकडून २० ते २५ प्रकारचे वैयक्तिक व कॉमन सुरक्षा साधने देण्यात येतात. ही सुरक्षा साधने आवश्यकतेनुसार व मागणीप्रमाणे संबंधित कर्मचाऱ्यांना तात्काळ देण्यासाठी स्वतंत्र 'टी ॲण्ड पी रजिस्टर मॉड्यूल' कार्यान्वित करण्यात आले आहे.

# हवामान बदलाचा हापूसला मोठा फटका

**| सावंतवाडी | प्रतिनिधी |**

कोकणच्या हापूस आंब्यावर यावर्षी निसर्गाची वक्रदृष्टी पडली आहे. देवगड तालुक्यात मोठ्या प्रमाणात मोहोर येऊनही बदलत्या हवामानामुळे फळधारणा अत्यंत अल्प झाली असून, आलेला मोहोर करपून काळा पडल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत महाराष्ट्र शासन कृषी विभाग आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ यांच्या संयुक्त पथकाने तालुक्यातील बागांची क्षेत्रीय पाहणी करून बागायतदारांना मार्गदर्शन केले.

### तज्ज्ञांनी सुचवलेल्या उपाययोजना

बागायतदारांनी खचून न जाता शास्त्रोक्त व्यवस्थापन करावे, असे आवाहन करत पथकाने उपाय सुचवले आहेत. नवीन मोहोर येण्यासाठी झाडावरील जुने, वाळलेले आणि करपलेले मोहोराचे दांडे कापून टाकावेत.मोहोराची गुणवत्ता वाढवण्यासाठी ०:५२:३४ + बोरॉन (२०%) ची फवारणी करावी. फळधारणेनंतर १३:००:४५ आणि प्लॅनोफिक्सचा वापर करावा. झाडाला साधारणतः १५ दिवसांतून एकदा १५० ते २०० लिटर पाणी द्यावे. ओलावा टिकवण्यासाठी झाडाच्या बुंध्याशी गवताचे आच्छादन करावे.

### तापमान बदल आणि वांझ मोहोराचे संकट

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाग्यश्री नाईकनवरे आणि शास्त्रज्ञ डॉ. वैभव शिंदे यांनी मिठबाव, कातवण, कुणकेश्वर आणि इळये येथील बागांची पाहणी केली. जानेवारीत तापमानात झालेल्या अचानक घसरणीमुळे परागीभवन प्रक्रियेत अडथळे आले. अनेक ठिकाणी मोहोरात संयुक्त फुलांचे प्रमाण कमी असल्याने तो वांझ ठरला आहे.

# रेल्वे प्रवाशावर मद्यपींकडून ब्लेडने वार

**| ठाणे | प्रतिनिधी |**

मुंब्रा रेल्वे स्थानकाच्या पादचारी पूलावर दोघांनी डोंबिवलीतील प्रवाशावर ब्लेडने वार करुन मारहाण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

डोंबिवली येथील गांधीनगर कॉलनी परिसरात जखमी ३० वर्षीय तरुण राहतो. तो डोंबिवली येथील एका शाळेच्या उपाहारगृहामध्ये काम करतो. मंगळवारी सकाळी तो मुंब्रा येथे त्याच्या मित्राला भेटण्यासाठी आला होता. त्यामुळे तो मुंब्रा स्थानकातील कल्याण दिशेकडील पादचारी पूलावर उभा राहून मित्राची वाट पाहत होता. त्याचवेळी दोन तरुण त्याच्या दिशेने आले. मुंब्रा स्थानकात मोबाईल चोरी झाला आहे, तो मोबाईल आम्हाला दे अशी मागणी त्यांनी तरुणाकडे केली. त्यानंतर त्यांनी तरुणाला मारहाण करण्यास सुरुवात केली. दोघांपैकी एकाच्या हातामध्ये ब्लेड होती. त्याने तरुणाच्या हातावर ब्लेडने वार केले. मुंब्रा स्थानकातील पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर त्यांनी तरुणाला वाचविले.

# पालघर जिल्ह्यात उन्हाळ्याची चाहूल

**वाणगाव :** पालघर जिल्ह्यात कमाल तापमान सरासरीपेक्षा तीन ते चार अंश सेल्सिअसने जास्त राहण्याची शक्यता आहे. ११ ते १५ फेब्रुवारीदरम्यान कमाल तापमान अनुक्रमे ३३, ३४, ३५,३५ व ३६ अंश सेल्सिअस आणि किमान तापमान पुढील दोन तीन दिवस कमी राहील, १४ फेब्रुवारी रोजी वातावरण ढगाळ राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. ११ ते १५ फेब्रुवारीदरम्यान १४, १५, १७, १८ व १८ अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज आहे.

# लाडक्या बहिणींना ई-केवायसी सुधारणेसाठी नवीन मुदत

**| पालघर | प्रतिनिधी |**

पालघर जिल्ह्यातून सुमारे सव्वा सहा लाख महिला शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत पात्र झाल्या असल्या तरीही त्यापैकी ६२ हजार लाडक्या बहिणींनी या योजनेमध्ये अर्ज करताना शासकीय किंवा निमशासकीय सेवेत आपले नातेवाईक असल्याचे नमूद केले होते. अशा बहिणींना अपात्र होण्यापासून रोखण्यासाठी चुकून अथवा अनावधानाने नमूद केलेली माहिती बदलण्यासाठी राज्य सरकारने ३१ मार्चपर्यंत सुधारणा करण्याची संधी दिली आहे.



लाडकी बहीण योजना सुरू झाल्यानंतर पहिल्या टप्प्यात नारी शक्ती दूत या मोबाईल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून पालघर जिल्ह्यातून दोन लाख ९६ हजार ५५० प्राप्त झालेल्या अर्जांपैकी दोन लाख ८५ हजार ८५७ अर्ज प्राप्त ठरले होते.

तर योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात नवीन पोर्टल द्वारे झालेल्या नोंदणीमध्ये तीन लाख ४६ हजार ७८८ प्राप्त झालेल्या अर्जांपैकी तीन लाख ३८ हजार ८०२ अर्ज पात्र ठरले होते.

अशाप्रकारे पालघर जिल्ह्यात दोन्ही योजनेअंतर्गत लाडकी बहीण योजनेसाठी प्राप्त झालेल्या सहा लाख ४३ हजार अर्जांपैकी सहा लाख २४ हजार ६५९ अर्ज पात्र ठरले असून एकूण १८ हजार ६४६ अर्ज नामंजूर करण्यात आले होते.

६ फेब्रुवारी रोजी निर्गमित केलेल्या एका शासन निर्णयात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेच्या लाभार्थी महिलांनी ईकेवायसी प्रक्रिया पूर्ण करताना लाभार्थ्यांची कुटुंबातील सदस्य नियमित, कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम मंडळ तसेच भारत सरकार अथवा राज्य सरकारच्या स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कार्यरत नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्ती वेतन घेत आहे यासंदर्भात चुकीचा पर्याय निवडला आहे, अशा व्यक्तींना ३१ मार्चपर्यंत ऑनलाईन ई- केवायसी मध्ये सुधारणा करण्याची संधी देण्यात आलेली आहे.

### हेल्पलाईन नंबर व्यस्तच

बँका व ई सेवा केंद्र यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव असल्याने ईकेवायसी यशस्वी झाली किंवा नाही याबद्दल महिलांना खात्री पटत नसते. आधार लिंक आणि बँक खाते सक्रिय असताना देखील केवळ इ'-केवायसीच्या चुकीच्या माहितीमुळे सन्मान निधी थांबल्याबाबत महिलांच्या तक्रारी प्रलंबित आहेत. या संदर्भात स्वतंत्र हेल्पलाइन नंबर १८१ हा नेहमीच व्यस्त असल्याने यामार्फत महिलांना मदत मिळत नसून जिल्ह्यासाठी स्वतंत्र हेल्पलाईन निर्माण करण्याची मागणी पुढे येत आहे.

# हवामान कृती आराखडा तयार

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

हवामान बदलाचे संकट आणि निसर्गसंपन्न कोकण किनारपट्टीला बसणारा त्याचा फटका लक्षात घेऊन रत्नागिरी जिल्ह्यासाठी विशेष विकास आणि हवामान कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. या महत्त्वाकांक्षी आराखड्याचे सादरीकरण आणि त्यावर चर्चा करण्यासाठी १८ फेब्रुवारीला विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

**"जिल्ह्याच्या भविष्यातील नियोजनासाठी या आराखड्यातील तरतुदी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या प्रक्रियेत स्थानिक घटकांचा सहभाग आणि त्यांची मते निर्णायक ठरणार आहेत. तरी जास्तीत जास्त प्रतिनिधींनी या चर्चासत्राला उपस्थित राहावे.**

**– सुनीता निंबाळकर, वातावरण फाउंडेशन."**

रत्नागिरी जिल्ह्याच्या पर्यावरणाचे रक्षण कसे करता येईल यासाठी आयफॉरेस्ट या संस्थेने हा आराखडा तयार केला आहे. जिल्ह्याचा विकास, हवामान बदलाशी जुळवून घेणे, कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करणे, पर्यावरण व्यवस्थापन आणि नैसर्गिक आपत्तींचा धोका कमी करणे यावर या आराखड्यात प्रामुख्याने भर देण्यात आला आहे.

# शाळेच्या वर्गखोलीतून जगाशी संवाद

**| बदलापूर | प्रतिनिधी |**

नेहमीच सुविधांच्या अभावामुळे चर्चेत राहणाऱ्या जिल्हा परिषद शाळा आता कात टाकत आहेत. ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यातील इंदगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने तर थेट सातासमुद्रापारची भाषा आत्मसात करत एक नवा आदर्श घालून दिला आहे. येथील दुर्गम भागातील आदिवासी मुले आता मराठी आणि इंग्रजीसोबतच चक्क जर्मन भाषेत संवाद साधू लागली आहेत.

स्पर्धेच्या युगात आपली ग्रामीण मुले मागे पडू नयेत, या जिद्दीतून मुख्याध्यापक अमोल पेन्सलवार यांनी लेट्स कनेक्ट द वर्ल्ड थ्रू द जर्मन लँग्वेज हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे.

### आदिवासी मुलांच्या ओठांवर जर्मन शब्द



### पालकांमध्ये अभिमानाचे वातावरण

दुर्गम भागात राहणाऱ्या पालकांसाठी आपली मुले परदेशी भाषा बोलतात, ही बाब कुतूहलाची आणि प्रचंड अभिमानाची ठरली आहे. खासगी महागड्या शाळांमध्ये जे शिक्षण मिळते, तेच शिक्षण शाळेत मिळत असल्याने पालकांचा शाळेवरचा विश्वास अधिक वाढला आहे.

### एआयचा वापर

ठाणे जिल्हा परिषदेच्या दिशा उपक्रमांतर्गत या प्रयोगात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शिक्षण अधिक रंजक बनवण्यात आले आहे. आदिवासी मुलांसाठी संधींची कवाडे खुली शाळेत जवळजवळ ७० टक्के विद्यार्थी कातकरी समाजातील आहेत. महाराष्ट्र शासन आणि जर्मनी यांच्यातील शैक्षणिक कराराचा फायदा या ग्रामीण मुलांना मिळावा, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. जर्मन भाषा शिकल्यामुळे भविष्यात या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या आणि शिक्षणाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

**चित्ररथाचा जत्रोत्सवातील उपक्रम | एलईडी स्क्रीनद्वारे जनजागृती**

# अंगणेवाडीत रस्ता सुरक्षेबाबत प्रबोधन

**| सिंधुदुर्गनगरी | प्रतिनिधी |**

श्री भराडी देवी जत्रोत्सवात उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सिंधुदुर्ग यांच्यावतीने उपस्थित लाखो भाविकांसमोर रस्ता सुरक्षाबाबत जनजागृती करत सुरक्षित प्रवासाचा संदेश दिला. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री भराडी देवीच्या जत्रोत्सवानिमित्त उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सिंधुदुर्ग यांच्या वतीने रस्ता सुरक्षा विषयक जनजागृती उपक्रम राबविण्यात आला.



जत्रोत्सवासाठी आलेल्या लाखो भाविकांमध्ये सुरक्षित प्रवासाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमांतर्गत उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून विशेष चित्ररथ व एलईडी स्क्रीनची व्यवस्था केली होती. या माध्यमातून रस्ता सुरक्षा नियम, हेल्मेट व सीटबेल्टचा वापर, वेगमर्यादा पाळणे, मद्यपान करून वाहन न चालवणे आदी विषयांवर माहिती देण्यात आली. तसेच भाविकांना रस्ता सुरक्षा विषयक माहितीपत्रिकांचे वाटप करून सुरक्षित वाहनचालना संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले.यावेळी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काळे यांनी उपस्थित भाविकांना संबोधित करत सुरक्षित व शिस्तबद्ध प्रवासासाठी रस्ता सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले.

सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिष लोकरे, मोटार वाहन निरीक्षक रत्नकांत ढोबळे, संकेत सोमणाचे, अमित पाटील, अमित नायकवाडी आदींसह चालक लहू वाळके, सचिन सावंत, रामदास पाखरे यांनी उपक्रमासाठी सहकार्य केले.

## निवडक

### तिलारीत दिसले वाघिणीसह बछडे

**सावंतवाडी :** सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये वन्यजीवप्रेमींसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. तिलारी वनक्षेत्रातील दोडामार्ग परिसरात एका वाघिणीसह तिच्या दोन बछड्यांच्या पाऊलखुणा आढळून आल्या आहेत. यामुळे या भागात वाघांचे वास्तव्य केवळ तात्पुरते नसून, तिथे वाघांचे नैसर्गिक प्रजनन होत असल्याचे सकारात्मक चित्र स्पष्ट झाले आहे. सिंधुदुर्गात वाघांचे अस्तित्व सिद्ध झाले आहे. अखिल भारतीय व्याघ्रगणनेच्या पहिल्या टप्प्यातील सर्वेक्षणात सिंधुदुर्ग जिल्ह्यात वाघांच्या वास्तव्याचे भक्कम पुरावे मिळाले आहेत. वन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात यापूर्वी केवळ वाघांचे दर्शन होत होते, मात्र आता बछड्यांच्या खुणा मिळाल्याने या क्षेत्रात वाघांचा अधिवास स्थिरावत असल्याचे मानले जात आहे. सावंतवाडी आणि दोडामार्ग तालुक्यातील जंगल पट्ट्यात कॅमेरा ट्रॅपद्वारे करण्यात आलेल्या सर्वेक्षणात ही माहिती समोर आली आहे. सावंतवाडी तालुक्यातील केंब्रिज कोअर परिसरात काही दिवसांपूर्वीच वाघाचे दर्शन झाले होते. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी या भागात गस्त वाढवली असून, विविध ठिकाणी लावण्यात आलेल्या कॅमेरा ट्रॅपमध्ये वाघांच्या हालचाली टिपल्या गेल्या आहेत. विशेष म्हणजे, २०१४ पासून या परिसरात सातत्याने वाघांचे अस्तित्व दिसून येत आहे.

### जिल्हा नियोजनची बारा फेब्रुवारीला बैठक

**रत्नागिरी :** जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाची दिशा ठरवणाऱ्या जिल्हा नियोजन समितीची महत्त्वाची बैठक गुरुवारी (दि.१२) होणार आहे. पालकमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी साडेअकरा वाजता जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात ही बैठक होईल. प्रभारी जिल्हा नियोजन अधिकारी अमर पाटील यांनी बैठकीचे अधिकृत नियोजन जाहीर केले असून, सर्व संबंधित यंत्रणांना त्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. व्या वर्षातील ही पहिलीच मोठी बैठक असल्याने या बैठकीत जिल्ह्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या निधीचा विनियोग आणि पुढील आर्थिक वर्षाचा विकास आराखडा यावर सविस्तर चर्चा होण्याची शक्यता आहे. विशेषतः ग्रामीण भागातील रस्ते, आरोग्य सुविधा, पाणीपुरवठा योजना आणि पर्यटन विकासाशी संबंधित असलेल्या महत्त्वाच्या कामांचा पालकमंत्री आढावा घेणार आहेत. या बैठकीला जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलिस अधीक्षक आणि सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांनंतर ही बैठक होत असल्याने महत्त्व प्राप्त झाले आहे. नवीन लोकप्रतिनिधींच्या निवडीनंतर जिल्ह्याच्या नियोजनात कोणकोणते नवे बदल सुचवले जातात आणि पालकमंत्र्यांनी दिलेल्या विकास शब्दाची पूर्ततेसाठी निधीचे वाटप कसे केले जाते, याकडे लक्ष लागले आहे.

### हेलिकॉप्टरचं आपत्कालीन लँडिंग

**पालघर :** जुहू येथून सुरतच्या दिशेने निघालेले एक हेलिकॉप्टर उड्डाणादरम्यान तांत्रिक बिघाड झाल्याने केळवे रोड परिसरात आपत्कालीनरीत्या उतरवावे लागले. या हेलिकॉप्टरमध्ये झालेला तांत्रिक बिघाड (एरर) दूर झाल्यानंतर या हेलिकॉप्टरने ४५ मिनिटांनंतर पुन्हा भरारी घेतली. या घटनेत हेलिकॉप्टरमधील कोणालाही दुखापत झाली नाही. दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास एक हेलिकॉप्टर केळवे रोड परिसरात घिरट्या मारत होते. आपत्कालीन लँडिंगनंतर तांत्रिक पथकाशी संपर्क साधून त्यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक दुरुस्ती करण्यात आली. दुरुस्ती प्रक्रियेस सुमारे ४५ मिनिटांनी सव्वा वाजल्याच्या सुमारास या हेलिकॉप्टरने नियोजित सुरत कडील प्रवास रद्द करून सुरक्षिततेच्या दृष्टीने हेलिकॉप्टरनंतर जुहू येथील मुख्य कार्यालयाच्या दिशेने रवाना झाले. हेलिकॉप्टरचा आवाज आल्यानंतर केळवे रोड पोलीस चौकी वरील कर्मचारी तातडीने शाळेजवळ पोहोचले. बघणार यांची गर्दी झाल्याने पोलिसांनी आवश्यक उपाय योजना आखल्या व सफाळे येथून अतिरिक्त बंदोबस मागून घेण्यात आला होता. या संदर्भात सफाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्ता शेळके यांनी सांगितले की तांत्रिक बिघाड झाल्याने हेलिकॉप्टर आपत्कालीनरीत्या खाली उतरवण्यात आले. या हेलिकॉप्टरमधील चारही व्यक्ती हेलिकॉप्टरच्या जवळ उभी होती व इतरत्र कुठेही गेली नसल्याची माहिती पुढे आली आहे. दुरुस्ती करून ते सुरक्षितपणे जुहूकडे रवाना झाले असून कोणतीही जीवितहानी झालेली नाही असे सांगितले.

### खारघरमध्ये हिंद दी चादर शहिदी समागम

**नवी मुंबई :** हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर जी यांच्या ३५०व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त येत्या २८ फेब्रुवारी आणि १ मार्च २०२६ला खारघरमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. अल्पसंख्याक विकास विभाग, राज्य समन्वय समिती आणि शीख, सिकलगार, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन तसेच भगत नामदेव (वारकरी) संप्रदाय अशा नऊ विविध समाजांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रसह देशभरातून लाखो भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. याप्रसंगी कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी माहिती दिली, की नागपूर आणि नांदेड येथील यशस्वी आयोजनानंतर आता खारघरमधील कार्यक्रमासाठी प्रशासनाने महिनाभरापूर्वीच तयारी सुरू केली आहे. रायगड आणि ठाणे जिल्हा प्रशासनाने विविध जबाबदाऱ्यांसाठी २५ विशेष समित्या नेमल्या आहेत. पोलीस, महापालिका आणि सिडको प्रशासन समन्वयाने काम करीत असून, भाविकांसाठी सर्व आवश्यक सुविधा पुरवल्या जाणार आहेत. या वेळी राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक यांनी विविध समाजांचा गुरू तेग बहादूरजींशी असलेला ऐतिहासिक वारसा सांगितला आणि सर्वांना सेवाभावाने सहभागी होण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाच्या नियोजन बैठकीला सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि विविध समाजांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांचा वन्य पशू-पक्ष्यांशी संवाद

**कुडाळ :** कर्नाटक राज्यातील सर्वात मोठ्या वन्यजीव अभयारण्यात हुमरमळा येथील श्री पुष्पसेन सावंत फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षेत्र भेट पार पडली. दांडेली अभयारण्य दुर्मीळ प्राणी, पक्षी व वनसंपदेसाठी प्रसिद्ध आहे. पश्चिम घाटातील हे एक निसर्गरम्य पर्यटन केंद्रही आहे. विशेषत: रिव्हर राफ्टिंग व जंगल सफारीसाठी ते ओळखले जाते. काळ्या पाण्याची झाक असलेली येथील काली नदी गूढ तितकीच रम्य आहे. शैक्षणिक क्षेत्र भेटीच्या दृष्टीने फार्मसी विद्यार्थ्यांसाठी हे ठिकाण उत्तम असल्याचा विद्यार्थ्यांना तिथे अनुभव आला.डिप्लोमा प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. या दोन दिवसीय क्षेत्र भेटीत विद्यार्थ्यांनी जंगल सफारीत वैविध्यपूर्ण वन, प्राणी व जलसंपदेचे निरीक्षण व अभ्यास केला. तेथील ख्यातनाम ङ्गकालीफ नदीवरील जलक्रीडा प्रकारांचा विद्यार्थ्यांनी आनंद लुटला. बोटींग, राफ्टिंग, कायकिंग, झिपलाईन आदी थरारक प्रकारांचा यात समावेश होता.दांडेली अभयारण्यात एका रिसॉर्टवर विद्यार्थ्यांचा मुक्काम होता. तिथे नाचगाण्यांनी व विविध इनडोअर खेळांनी आपली कला सादर करीत या भेटीला रंगत आणली. परतीच्या प्रवासात येल्लूर येथील प्रसिद्ध राजहंस गडावर फेरफटका मारला. या क्षेत्रभेट व सहलीचे नियोजन व संचालन अधिव्याख्याता गणू गावडे यांनी सहाय्यक प्राध्यापिका सेलेना फर्नांडिस व प्रयोगशाळा तंत्रज्ञ प्रकाश चव्हाण यांच्या सोबतीने केले.

# निवडक

## महडच्या श्री वरदविनायकाला दीड किलो चांदीचा मुकुट

**खोपोली :** अष्टविनायक तीर्थक्षेत्र पैकी असलेला महड येथील इच्छापूर्ती करणारा श्री वरदविनायक गणपती बाप्पा चरणी दररोज असंख्य भक्तगण येत मनोभावे पूजाअर्चा करत असतात. श्री वरदविनायक गणपती बाप्पा भक्तांच्या नवसाला पावत असल्याने असाच श्री वरदविनायक गणपती बाप्पा उरण तालुक्यातील चिर्ले येथील समीर पाटील व भाग्यश्री पाटील यांना पावल्याने या दाम्पत्याने गणपती बाप्पाला १० फेब्रुवारी रोजी दीड किलोचा चांदीचा मुकुट अर्पण केला आहे. हा चांदीचा मुकुट समीर पाटील यांनी महड देवस्थानकडे सुपूर्द केल्याने महड देवस्थानच्या वतीने त्यांचा सन्मान केला. यावेळी रवि शेळके, पंकज मढवी, विराज कोळी, जयेश पाटील, अक्षय पाटील, नितेश पाटील, विजय सोनी, महड देवस्थानचे अतुल बडगुजर, अशोक बागुल, राजेश झानपुरे आदी उपस्थित होते. भक्तांच्या नवसाला पावणारा ओळख असलेल्या महड हे श्री वरदविनायक गणपती बापाच्या खजिन्यात चांदीच्या दागिन्यांची भर पडली असून उरण तालुक्यातील चिर्ले येथील नक्ष लॉजिटिकचे समीर पाटील व भाग्यश्री पाटील या दाम्पत्य भाविकाकडून श्री वरदविनायकाचरणी दीड किलो चांदीचा मुकुट अर्पण केला आहे. ज्याची किंमत ४ लाख २५ हजार रूपये किंमत आहे. समीर पाटील व भाग्यश्री पाटील हे श्री वरदविनायकाचे निस्सिम भक्त आहेत. अनेक दिवसांपासून देवाला चांदीचा मुकुट अर्पण करण्याची त्यांची इच्छा होती. १० फेब्रुवारी रोजी अखेर त्यांची ही इच्छा पूर्ण झाली आहे.

## महाशिवरात्र महोत्सवाचे आयोजन

**आगरदांडा :** श्री गुरु सावर्डेकर संस्थापित रुद्रेवा सेवा प्रतिष्ठान आळंदी देवाची अंतर्गत श्री गुरुमाता सेवाश्रम विनामूल्य वृद्धाश्रम अनाथाश्रम नांदगाव येथे १४ ते १७ फेबुवारी या कालावधीत भव्य दिव्य महाशिवरात्र महोत्सवाचे आयोजन श्रीगुरू सावर्डेकर यांच्या मार्गदर्शनाने विविध आध्यात्मिक संत महंत व राजकीय सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या म ान्यवरांच्या उपास्थितीत श्री गुरूमाता सेवाश्रम नांदगाव येथे संपन्न होणार आहे. श्री सिद्धिविनायक मंदिर,नांदगाव येथे सेवाश्रम परिवारातील मान्यवरांच्या हस्ते पत्रिका पूजनाने महाशिवरात्र महोत्सवास प्रारंभ झाला. महाशिवरात्र महोत्सवात आगमोक्त यज्ञ, शिवपूजन, भजन, प्रवचन, कीर्तन, व्याख्यान असे धार्मिक कार्यक्रम होतील. १५ फेब्रुवारी महाशिवरात्र या दिवशी सकाळी १० वाजता श्री गुरुमाता सेवाश्रम येथून भव्य दिव्य पालखी सोहळा श्री अमृतेश्वर मंदिर येथे जाईल. रात्री कीर्तनानंतर निशीथकालीन आगमोक्त शिवपूजन कार्यक्रमा नंतर उपास्थित शिवभक्तांना वाराणसी येथील काशी विश्वनाथ ज्योतिर्लिंग येथे सिद्ध केलेले रुद्राक्ष प्रसाद भेट देण्यात येतील. या महोत्सवात दिलीप ठाकूर, अंकेश पाटील, संजय ठाकूर या मान्यवरांची प्रवचने व्याख्याने व अनंत मेंदाडकर, श्रीगुरू बाबा ढवळीकर, मदन नेवरेकर व श्रीगुरु माऊली सावर्डेकर आळंदी देवाची यांची कीर्तने होतील. १६ फेब्रुवारी २०२६ या दिवशी सायंकाळी ५ वा भव्य मशाल महोत्सव व दिपोत्सव हे कार्यक्रम होतील. १७ फेब्रुवारी रोजी सकाळी श्रीगुरू सावर्डेकर यांच्या गोपाळ काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसाद होईल. या महोत्सवाचे सर्व सज्जनांना प्रेमपूर्वक आमंत्रणदेण्यात आले आहे. या महोत्सवात सर्व शिवभक्तांनी सहकार्य करावे असे आवाहन शिष्य परिवाराने केले आहे.

## गावठी वालांच्या शेंगांना पसंती

**तळा :** तळा तालुक्यात सध्या वालाच्या शेंगांचा हंगाम सुरू झाला असून गावठी वालाच्या शेंगा बाजारात येऊ लागल्याने ग्राहकांकडून खरेदीसाठी गर्दी होत आहे. वालाच्या शेंगा व चवळीच्या शेंगांसाठी थंडीचा हंगाम खूप उपयुक्त आहे. थंडीत पडणाऱ्या दवावर हे पीक तयार होते. जेवढी जास्त थंडी, तेवढे हे पीक मोठ्या प्रमाणावर येते. दरम्यान, सदरील पिके तयार होण्यासाठी चार महिन्यांचा कालावधी लागतो. तळा तालुक्यातील ग्रामीण भागातील गिरणे,नानवल ी,निगुडशेत,वावे,राणेची वाडी या परिसरातील गावात हे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. या पिकासाठी जास्त मेहनत नाही. परंतु, या पिकाचा सुगंध वन्य प्राण्यांना आकर्षित करत असतो. वालाची झुडपे हे जंगली वानरे आणि रानटी डुकरे तसेच गुरे यांचे आवडते खाद्य असल्यामुळे या प्राण्यांपासून पिकांचे रक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना खूप मेहनत घेऊन शेताची राखण करावी लागते. वाल व चवळीच्या शेंगांचा फायदा किमान ४० ते ५० हजार रुपयांच्यावर मिळतो. परंतु, तळा परिसरात जंगली वानरे व उनाड गुरे यांनी येथील शेतकऱ्यांना हैराण केले आहे. त्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांनी वाल, चवळीची पिकती शेती असून देखील ती ओसाड ठेवली आहे. जे काही शेतकरी वाल, चवळीची शेती पिकवित आहेत, त्यांना या पिकांचे संरक्षण करण्यासाठी रात्रंदिवस शेतावरच मुक्काम ठोकावा लागत असल्याचे येथील शेतकरी सांगतात. सध्या पोपटी करण्याचा हंगाम सुरू झाला असून, लोक गावठी हिरव्यागार वालाच्या शेंगांची खरेदी करण्यासाठी तळा बाजारपेठेसह परिसरातील गावागावात येत आहेत. सध्या वालाच्या व चवळीच्या गावठी शेंगांना प्रचंड प्रमाणावर मागणी आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- फर्निचर पॅकींगसाठी मुले पाहिजेत. शिक्षणाची अट नाही. ठिकाण– बामणसुरे, चोंढी, पगार– १२००० महिना, संपर्क : ९८२३५८५३२१
- कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रेस्टॉरंट मॅनेजर,रिसेप्शनिस्ट,कॉन्टिनेंटल,मेन्टेनन्स,वेटर, हाऊसकिपींग, रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२
- मेघा टॉकीजसमोर स्वामी समर्थ बंगला १५०० SF. Reputed Bank Back office साठी उत्तम.
- Vintage दगडी सागवानी बंगलो मांडवा–सारळ समुद्रापासून २ मिनीट स्वीमिंग पूल गार्डन वगैरे सोयीसह. भाड्याने देणे आहे Contact- 9373747354
- मुले/मुली पाहिजेत. जय संतोषी मां. पंप, वाडगाव फाटा, सीएनजी पंप, मो. ९१३०५४४१२८, ८४११००९९९९
- नामांकित FM.GG कंपनीसाठी PSR आणि सेल्समन पाहिजे, आकर्षक पगार+ इंन्सेटीव्ह संपर्क :९८८१४१८४४८/०२१४१२२३०६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# आता ग्रामपंचायत निवडणुकीची तयारी

## २४० ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासकाच्या हाती; स्थानिक नेते पुन्हा सक्रिय

**। रायगड । प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषदेच्या निवडणुका संपताच आता ग्रामपंचायत निवडणुकीचे वेध लागले आहेत. वर्षभरात मुदत संपलेल्या तब्बल २४० ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची तयारी तहसील कार्यालय स्तरावर सुरू झाली आहे. त्यामुळे आता ग्रामपंचायत निवडणुकांचे वारे वाहण्यास सुरुवात होत आहे.

लोकसभा आणि नंतर विधानसभा निवडणुकांमुळे ग्रामपंचायतींच्या निवडणुका मागे पडल्या होत्या. जिल्ह्यात ८०९ ग्रामपंचायतींपैकी तब्बल २४० ग्रामपंचायतींच्या निवडणुका एकाचवेळी घेतल्या जाणार आहेत. याची पायाभरणी नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निमित्ताने करण्यात आली आहे.

जिल्हा परिषदेच्या प्रचारात ग्रामपंचायतींचा प्रचारही काही नेत्यांनी सुरू केला आहे. ग्रामपंचायत निवडणुकीसाठी पोषक वातावरण असल्याने या निवडणुका लवकरात लवकर घ्याव्यात, अशी मागणी येथील इच्छुक लोकप्रतिनिधी करू लागले आहेत. प्रशासकीय स्तरावर या निवडणुकांची तयारी सुरू झाली आहे. पुढील काही महिन्यांत निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आतापासूनच इच्छुकांची निवडणूक लढविण्यासाठी लागणारे कागदपत्रे जमवण्याची तयारी सुरू झाली आहे. रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींचा यात समावेश असून, सरपंच पदाच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागून राहिलेले आहे.



### प्रशासकांची कमतरता

दीड वर्षापूर्वी मुदत संपलेल्या या ग्रामपंचायती आहेत. तेव्हापासून या ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासकाद्वारे हाकला जात आहे. एक प्रशासक दोन ते तीन ग्रामपंचायतींचा कारभार हाकत असल्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कामाचा ताण वाढत चालला आहे. याचा परिणाम ग्रामपंचायत हद्दीतील विकासकामांवरही पडत असल्याचे दिसून येत आहे.

| | |
|---|---|
| अलिबाग | ३४ |
| मुरुड | ४ |
| पेण | १८ |
| पनवेल | १५ |
| उरण | ८ |
| कर्जत | ३० |
| खालापूर | ३ |
| रोहा | २६ |
| सुधागड | ६ |
| माणगांव | २१ |
| तळा | १८ |
| महाड | ३० |
| श्रीवर्धन | १६ |
| म्हसळा | ११ |

### थेट सरपंचपदाचे पुढाऱ्यांना आकर्षण

सरपंचपदाची निवडणूक थेट मतदारांमधून होणार असल्याने ग्रामपंचायत निवडणुकांनाही आमदारकीच्या निवडणुकीसारखे ग्लॅमर येत चालले आहेत. अलिबागमधील चेंढरे, थळ, पनवेल तालुक्यातील गव्हाण, पोयंजे, वावंजे, कर्जतमधील शेलू, कशेळे, नेरळ यांसारख्या ग्रामपंचायतींचा महसूल जिल्ह्यातील काही नगरपंचायतींपेक्षा जास्त आहे. त्यामुळे येथील सरपंचपदाची निवडणूक जिंकून ग्राम पंचायतीवर एकहाती सत्ता मिळवण्याचा मोठ्या राजकीय व्यक्तींचा प्रयत्न असतो. त्यामुळे या ग्रामपंचायतींचा निवडणुका कार्यक्रम कधी जाहीर होणार याची सर्वांना प्रतीक्षा आहे.

# बॅरिस्टर ए. आर. अंतुले सामान्य जनतेचा नेता

## ॲड इस्माईल घोले यांचे प्रतिपादन!

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

बॅरिस्टर ए. आर. अंतुले साहेबांनी नेहमीच तळागाळातील माणसाचा विचार करुन अनेक योजना राबविल्या त्यामधील संजय गांधी निराधार योजना या योजनेमधुन आज ही गरीब असह्य महिलांना त्यांच्या लाभ मिळत आहे. पोलीस दलाला हा नवीन गणवेश मिळवून दिला. त्याचे श्रेय अंतुले साहेबांना जाते. अंतुले हे केवळ नेते नव्हते तर ते इंदिरा गांधी यांचे अत्यंत विश्वासू आणि निकटवर्ती सहकारी होते. तसेच सामान्य जनतेचा नेते होते असे प्रतिपादन ॲड. इस्माईल घोले यांनी केले.

कोकण उन्नती मित्रमंडळाचे वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय, मुरुड-जंजिरा येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन सोहळा कार्यक्रमावेळी बोलत होते. ते पुढे म्हणाले की साहेबांची पक्षाप्रती त्यांची निष्ठा इतकी अढळ होती की, कठीण प्रसंगात त्यांनी दिलेला राजीनामा त्यांच्या तत्त्वनिष्ठ राजकारणाचे प्रतीक ठरला गेला होता.



यावेळी मान्यवरांच्या शुभहस्ते अंतुले साहेबांच्या प्रतिमेला अभिवादन केले. तद्रंतर मुरुड आदिवासी वाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र मुरुड आणि संजीवनी डायलिसिस सेंटर येथे रुग्णांना व गरजूंना फळांचे वाटप करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे, ॲड. इस्माईल घोले, डॉ. विश्वास चव्हाण, डॉ. श्रीशैल भैरगुंडे, डॉ.सुभाष म्हात्रे, डॉ.गजानन मुनेश्वर. वासंती उमरोटकर, संदेश दांडेकर, मोहित हसवारे , डॉ. नारायण बागुल, गणेश लाड,प्रा. प्रवेश पाटील, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविद्यालय विकास समितीचे सदस्य वासंती उमरोटकर यांनी अंतुले साहेबांच्या शिस्तीबद्दल आणि त्यांच्या कार्याप्रती असलेल्या निष्ठेबद्दल सांगितले. त्या म्हणाल्या की, साहेब केवळ नेते नव्हते, तर ते एक द्रष्टे व्यक्तिमत्त्व होते. महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि शिक्षणासाठी त्यांनी नेहमीच प्रोत्साहन दिले.


# वाढत्या उन्हामुळे आंबा फळगळीचे संकट

**। पाली । वार्ताहर ।**

फेब्रुवारी महिना सुरू होताच वातावरणातील तापमानाचा पारा वाढू लागला आहे. याचा थेट फटका आंबा पिकाला बसण्याची शक्यता निर्माण झाली असून, अनेक ठिकाणी लहान फळांची गळ सुरू झाली आहे. आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी हे नुकसान टाळण्यासाठी आतापासूनच तज्ज्ञांच्या सल्ल्याने बागेचे व्यवस्थापन करणे गरजेचे असल्याचे मत कृषितज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

आंब्याच्या एका मोहोराच्या दांडीवर ७५ ते ९५ टक्के नर फुले आणि ५ ते २५ टक्के द्विलिंगी फुले असतात. मोठ्या प्रमाणावर होणारी फळधारणा झाडाला पेलवत नाही. त्यामुळे नैसर्गिकरीत्या काही प्रमाणात फळगळ होतेच. मात्र याव्यतिरिक्त भुरी आणि करपा यांसारख्या रोगांचा प्रादुर्भाव, तुडतुड्यांचा वाढता अटॅक आणि अन्नद्रव्यांची कमतरता यामुळे ही गळ अधिक तीव्र होते. फेब्रुवारीपासून कोरडे आणि उष्ण वारे वाहू लागतात. यामुळे लहान फळांमधील ऑक्झी या संजीवकाचे प्रमाण कमी होते. परिणामी कोवळी फळे गळून पडतात. ज्या जमिनी हलक्या आहेत तिथे पाण्याचा ताण पडल्यास झाडावर नगण्य फळे शिल्लक राहण्याची भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

वेळेवर केलेली कीड आणि रोग नियंत्रण फवारणी आणि संजीवकांचा वापर यंदाच्या हंगामातील आंब्याचे उत्पादन शाबूत ठेवण्यास मदत करेल, असे मत कृषितज्ज्ञांनी व्यक्त केले.



**बागायतदारांना वेळीच उपाययोजना करण्याचे कृषी तज्ज्ञांचे आवाहन**

### उत्पादन टिकवण्यासाठी हे करावे लागणार उपाय

**पाणी व्यवस्थापन :** केवळ ठिबक सिंचनावर अवलंबून न राहता, बागेत गारवा टिकवण्यासाठी काही वेळा मोकळे पाणी सोडावे. यामुळे हवेतील आर्द्रता टिकून राहते.

**आच्छादन :** जमिनीतील ओलावा टिकवण्यासाठी झाडाखाली उसाचे पाचट किंवा वाळलेल्या पालापाचोळ्याचा सहा इंची थर द्यावा. वाळवी रोखण्यासाठी त्यात लिंडेन पावडरचा वापर करावा.

**हवारोधक झाडे :** बागेच्या संरक्षणासाठी शेवरी किंवा रेनट्री यांसारख्या झाडांची लागवड करावी. यामुळे उष्ण वाऱ्यापासून बागेचे रक्षण होईल.

**खतांचा वापर :** नत्राचा दुसरा हप्ता आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करावा.

# कर्जतच्या समस्यांचे नगरपरिषदेला निवेदन

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

शहर बचाव समितीच्या माध्यमातुन अनेक प्रश्न मार्गी लागले आहेत, परंतु काही प्रश्न अद्याप सुटलेले नाहीत. त्याबाबत शहरातील नागरिकांच्या वारंवार तक्रारी येत आहेत. त्यामुळे सदरच्या प्रलंबित सम स्या सोडविण्यात याव्यात अशी मागणी करणारे निवेदन देण्यात आले आहे.

पाणी पुरवठा अनियमित, गढुळ, अशुद्ध होत आहे त्याबाबत योग्य ती दक्षता घेणे. समितीच्या पाठपुराव्याने कर्जत शहरासाठी सुरळीत पाणीपुरवठा झाला पाहिजे. यासाठी एक्सप्रेस फिडरची आम्ही मागणी केली होती. ती मान्य सुद्धा केली आहे. परंतु सदर कामामध्ये दिरंगाई होत आहे. एक्सप्रेस फिडर त्वरीत कार्यान्वित करावे. पाण्याची शुद्धता तपासण्यासाठी दर ८ दिवसानी पाणी लॅबकडे तपासणीसाठी पाठविण्यात यावे. कर्जत शहरात प्रभागात पाण्याच्या वाढीव टाक्या निर्माण करण्यात याव्यात. एकाच दाबाने सुरळीत पाणीपुरवठा करण्यात यावा. पाणीचोरीचे कनेक्शन व पाणीलिकेज याची तपासणी करून त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करावी. शहरातील सर्व पाण्याच्या टाक्या १ महिन्यात साफ करून घ्याव्यात. कचरा, जंतुनाशक फवारणी करावी. शहरात वाढीव सार्वजनिक स्वच्छतागृहे उभारण्यात यावी, अशा तब्बल ५० मागण्यांचे निवेदन सादर केले आहे.



# जनाबाई पाटील यांचे निधन

**। वाघ्रण । वार्ताहर ।**



अलिबाग तालुक्यातील वाघ्रण गावाच्या ज्येष्ठ महिला बाल सेवक सामाजीक कार्यकर्त्या जनाबाई किसन पाटील यांचे निधन झाले. त्या ८९ वर्षांच्या होत्या. निधन झालेल्या जनाबाई यांच्यावर त्याच रात्री अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे उत्तरकार्य मंगळवारी (दि.१७) होणार आहेत त्यांच्या पश्चात मुलगा, स्नुषा, नातवंडे असा परिवार आहे.

# माणगावात १९ फेब्रुवारीला महारक्तदान शिबीर

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबीर सेवाभावी संस्था माणगाव या संस्थेतर्फे के.ई.एम रुग्णालय परेल मुंबई यांच्या सौजन्याने व विशेष सहकार्याने शिवजयंती निमित्त शुक्रवारी (दि.१३) महारक्तदान शिबिराचे आयोजन सरलादेवी मंगल कार्यालय हॉल, माणगाव याठिकाणी करण्यात आले आहे.

रक्तदात्यांनी या सामाजिक उपक्रमांत उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन रक्तदान करावे असे आवाहन शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबीर सेवाभावी संस्था माणगाव यांच्यातर्फे करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घाटन सकाळी ९ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.

शिबिरात रक्तदान केलेल्या रक्तदात्यांना आकर्षक भेटवस्तू प्रमाणपत्र, रक्तदान केल्याचे ओळखपत्र तसेच विशेष कॉलेज विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी उपयुक्त पडणारे प्रमाणपत्र के.ई.एम. रुग्णालय मुंबई यांच्यातर्फे देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

# ज्येष्ठांच्या मानसिक समस्यांवर हास्याचा उतारा

## डॉ. अनिल डोंगरे यांचे मार्गदर्शन; शिवशांती स्नेहालयाचा उपक्रम संपन्न

**। रायगड । प्रतिनिधी ।**

वाढते वय आणि त्यासोबत येणाऱ्या शारीरिक व मानसिक बदलांमुळे ज्येष्ठांना भेडसावणाऱ्या समस्यांवर प्रकाश टाकण्यासाठी शिवशांती स्नेहालय वृद्धाश्रम व विरंगुळा केंद्राच्या वतीने एका विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात मनोविकार तज्ज्ञ डॉक्टर अनिल डोंगरे यांनी वाढते वय आणि मानसिक समस्या या विषयावर उपस्थित सदस्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

आपल्या व्याख्यानात डॉक्टर अनिल डोंगरे यांनी वय वाढल्यावर मानवी शरीरातील मानसिक आणि शारीरिक क्षमतेवर हळूहळू कसे परिणाम होतात, याची शास्त्रीय माहिती दिली. सेवानिवृत्तीमुळे आलेले रिकामेपण, आर्थिक चणचण, विभक्त कुटुंब पद्धतीमुळे वाढलेले एकाकीपण आणि कुटुंबातील बदललेली भूमिका यामुळे ज्येष्ठ व्यक्तींमध्ये येणाऱ्या नैराश्याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. या नैराश्यामुळे होणारा निद्रानाश, भूक कमी होणे, अपराधीपणाची भावना आणि भविष्याबाबतची टोकाची निराशा अशा अवस्थांवर मात करण्यासाठी त्यांनी नियमित व्यायाम, योगासने आणि प्रार्थना करण्यावर भर दिला. मनाला उभारी देण्यासाठी हास्य क्लबमध्ये सहभागी होणे आणि पुरेशी झोप घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. या प्रसंगी संस्थेचे सल्लागार शरद कोरडे, चारुशिला कोरडे, भारती तरे आदींसह सदस्य उपस्थित होते.



**संमेलन सर्वांसाठी विनामूल्य खुले असणार** | कवी, गजलकारांना सहभागी होण्याचे संस्थांचे आवाहन

# मार्चला पनवेलमध्ये चौथे राज्यव्यापी साहित्य संमेलन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

यंदाचे चौथे एकदिवसीय राज्यव्यापी मराठी साहित्य संमेलन पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात होण्याचे स्पष्ट संकेत देण्यात आले आहेत.

याकरिता सहभागी होऊ इच्छिणाऱ्या राज्यातील नामवंत कवी, गजलकारांनी आपल्या स्वरचित कविता, गजल २० फेब्रुवारीपर्यंत पाठवाव्यात, असे आवाहन कांतीलाल प्रतिष्ठान रायगड आणि विश्वव्यापी मराठी साहित्य, सांस्कृतिक परिषदेचे अध्यक्ष कांतीलाल कडू यांनी केले आहे. अभिजात मराठी भाषेच्या जतनाकरिता गेली अनेक वर्षे दोन्ही संस्था कांतीलाल कडू यांच्या नेतृत्वाखाली कवी संमेलने, गजल मुशायरा, चर्चासत्रांपासून मराठी भाषेचा गोडवा वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

सकाळी वारकरी दिंडीतून ज्ञानोबा-तुकोबाच्या गजरासह ग्रंथ दिंडीत टाळ, चिपळ्या, तुळशी वृंदावन डोक्यावर घेऊन पारंपरिक पद्धतीने काढण्यात येणारा पालखी सोहळा नयनरम्य असतो. तीच परंपरा कायम राखली जाईल, त्यातून पनवेल शहराचे साहित्य, संस्कृती आणि सांस्कृतिक वारसा जतन केला जात आहे. सकाळी दिंडी, उद्‌घाटन सोहळा, एक एक तासाच्या अवधीची दोन चर्चासत्रे, कवी आख्यान, गजल मुशायरा याशिवाय अन्य दोन प्रभावी कार्यक्रमांची रेलचेल संमेलनाच्या रूपरेषेत आखण्यात येणार आहे, अशी माहिती विश्वव्यापीचे उपाध्यक्ष गजलकार प्रशांत वैद्य यांनी दिली. गेल्या वर्षीपासून ज्येष्ठ कलावंत, साहित्यिकांची निवड करुन त्यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे. त्या विदुषींची निवड येत्या आठवड्यात केली जाईल. यंदापासून १५ हजार रोख रुपयांचे पारितोषिक, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप असेल. स्व. हरिश्चंद्र चांगू कडू या अवलियाच्या नावाने हा पुरस्कार देण्यात येतो. या संदर्भात निवड समितीचा निर्णय येत्या आठवड्यात घोषित करण्यात येईल, असे संस्थेचे सचिव गजलकार बंडू अंधेरे यांनी कळविले आहे. याशिवाय, राज्यव्यापी मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांची निवड, प्रमुख पाहुणे, स्वागताध्यक्ष तसेच सहभागी मान्यवरांची नावेही निश्चित केली जातील. राज्यातील मान्यवर साहित्यिक, रसिक, मराठीचे जाणकार आणि मराठी बांधवांना ही पर्वणी ठरणार असल्याने त्यांनी कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन कांतीलाल प्रतिष्ठानचे सचिव शर्वाय कडू यांनी केले आहे.

लवकरच साहित्य संमेलन नियोजन समितीची बैठक संपन्न होणार आहे, असेही कळविण्यात आले आहे. साहित्य संमेलनाकरिता व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक ९९२०१५८३३८ वर संपर्क साधावा. तसेच पत्रव्यवहार, १०७, आदित्य हौसिंग सोसायटी, गेट नं. ०१, रूम नं. ०१, प्रजापती ब्रह्मकुमारी केंद्राच्या खाली, छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ, एमसीसीएच सोसायटी पनवेल येथे करावा. कविता, गजल पाठविणाऱ्यांची निवड झाल्यावर त्यांना फोन येईल. त्या संदर्भात विचारणा करण्यासाठी आयोजकांना फोन करू नये. संमेलन सर्वांसाठी विनामूल्य खुले असणार आहे. शिवाय दुपारच्या स्नेह भोजनाचीही मोफत व्यवस्था असल्याने कुणीही साहित्यिक, रसिक सहभागी होऊ शकतो, असे कळविण्यात आले आहे.

# २४ फेब्रवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत

| माणगाव | प्रतिनिधी |

ग्रामीण कुटुंबातील मुलामुलींना दर्जेदार व्यावसायिक शिक्षणाची संधी मिळावी आणि त्यांना देश-विदेशात सन्मानाची नोकरी मिळावी, यासाठी माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे श्रीमती गीता तटकरे नर्सिंग कॉलेज आज शिक्षण क्षेत्रात आशेचा किरण ठरत आहे. या प्रतिष्ठित नर्सिंग महाविद्यालयात प्रवेशासाठी महाराष्ट्र शासनाची नर्सिंग सीईटी परीक्षा बंधनकारक असून, अर्ज भरण्याची अंतिम मुदत २४ फेब्रुवारी आहे. बारावी विज्ञान उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ही परीक्षा देऊन प्रवेश घेता येतो. सीईटी परीक्षेचा अर्ज भरण्यासाठी महाविद्यालयात मोफत मार्गदर्शन व सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, चेअरमन डॉ. गौतम राऊत आणि प्रा. महेरोश सनगे यांनी केले आहे.

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे मानिवली, ता. कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | एकुण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री.वसंत जनार्दन पाटील व इतर. | १६/३२ | ००-०७-०० | ०-०५ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. १२/०२/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता- बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र.१३९५/२०२५

श्रीम.कोमल स्वप्नील जाधव
उर्फ कोमल विलास गोळे — वादी
मुळ रा.ठाणे जि. ठाणे
सध्या रा.दिघेवाडी पो. नांदगाव
ता.सुधागड जि.रायगड

**विरूद्ध**

ग्रामपंचायत अधिकारी-ग्रामपंचायत नांदगाव — प्रतिवादी
ता.सुधागड, जि.रायगड
ता.सुधागड, जि.रायगड

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसद्वारे कळविणेत येते की, श्रीम.कोमल स्वप्नील जाधव उर्फ कोमल विलास गोळे मुळ रा.ठाणे जि. ठाणे सध्या रा. दिघेवाडी पो. नांदगाव ता. सुधागड जि. रायगड यांनी त्यांची आई श्रीम.शारदा लक्ष्मण दिघे यांचा जन्म दि. ०१/०६/१९७१ रोजी मौजे दिघेवाडी ता. सुधागड, जि. रायगड येथे झाला आहे. परंतु तिची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन तिचा जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर शारदा लक्ष्मण दिघे तिच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड-पाली
दिनांक :- ११/०२/२०२६

सही /-
**उत्तम कुमार**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत श्री.अब्दुलगणी निजामुद्दीन सिद्दीकी यांच्या मालकी हक्काच्या असून सदर मिळकतीबाबत आमचे अशिलांबरोबर खरेदी देण्याच्या हेतुने बोलणी करीत आहे. सदर मिळकतीत इतर कोणाचाही विक्री, देवाण-घेवाण, गहाण, वारसा, ताबा, खरेदीखत, बक्षीस, मृत्यूपत्र, वाटपपत्र वा इतर कोणत्याही प्रकारचा करारनामा वा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास व मिळकत विकण्यास कोणाचीही हरकत असल्यास त्याच्या पृष्टर्थ सर्व कागदोपत्री पुराव्यासोबत खालील पत्त्यावर सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत लेखी सुचित करणे आवश्यक आहे. जर अशाप्रकारची कोणतीही लेखी हरकत कोणीही उपस्थित केली नाही तर खालील नमुद केलेल्या मिळकतीशी कोणाचाही कसलाही हक्क व हितसंबंध नाही अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल व ज्याचा कोणाचा कोणत्याही प्रकारे तथाकथित हक्क हितसंबंध इ.आहे तो जाणीवपुर्वक सोडून दिला आहे. असे समजून आमचे आशिल सदर मिळकतींचा प्रस्तुतची मुदतीनंतर सदर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत हरकत असल्यास ती ग्राहय धरली जाणार नाही व आमचे अशिल सदर खालील नमुद केलेल्या मिळकतींचा खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे-केळवली, तालुका-खालापुर, जिल्हा-रायगड येथील गट नं.-१५७, क्षेत्र ०-८३-०० (हे-आर). आकार ०.२० (रू-पै) अशी जमिन मिळकत.

दिनांक :-११/०२/२०२६
स्थळ :- खोपोली

**सौ.वैशाली सुनिल कराळे**
ॲडव्होकेट.
फ्लॅट नं.५, वैभव समृद्धी
काटरंग खोपोली,
ता.-खालापूर जि.-रायगड. ४१०२०३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसने कळविण्यात येते की खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत सौ.संध्या सुदर्शन आगलावे व सौ.सुजाता अमोल भांगे यांच्या मालकी हक्काच्या असून सदर मिळकतीबाबत आमचे अशिलांबरोबर खरेदी देण्याच्या हेतुने बोलणी करीत आहे. सदर मिळकतीत इतर कोणाचाही विक्री, देवाण-घेवाण, गहाण, वारसा, ताबा, खरेदीखत, बक्षीस, मृत्यूपत्र, वाटपपत्र वा इतर कोणत्याही प्रकारचा करारनामा वा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास व मिळकत विकण्यास कोणाचीही हरकत असल्यास त्याच्या पृष्टर्थ सर्व कागदोपत्री पुराव्यासोबत खालील पत्त्यावर सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत लेखी सुचित करणे आवश्यक आहे. जर अशाप्रकारची कोणतीही लेखी हरकत कोणीही उपस्थित केली नाही तर खालील नमुद केलेल्या मिळकतीशी कोणाचाही कसलाही हक्क व हितसंबंध नाही अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल व ज्याचा कोणाचा कोणत्याही प्रकारे तथाकथित हक्क हितसंबंध इ. आहे तो जाणीवपुर्वक सोडून दिला आहे. असे समजून आमचे आशिल सदर मिळकतींचा प्रस्तुतची मुदतीनंतर सदर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत हरकत असल्यास ती ग्राहय धरली जाणार नाही व आमचे अशिल सदर खालील नमुद केलेल्या मिळकतींचा खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे-वणी तालुका- खालापुर, जिल्हा - रायगड येथील गट नं.-१५९, क्षेत्र ०-११-०० (हे-आर), आकार ०.०९ (रू-पै) अशी जमिन मिळकत.

दिनांक :-११/०२/२०२६
स्थळ :-खोपोली

**सौ. वैशाली सुनिल कराळे**
ॲडव्होकेट
फ्लॅट नं.५, वैभव समृध्दी
काटरंग, खोपोली
ता.-खालापूर, जि.- रायगड. ४१०२०३

## पोलादपूर नगरपंचायत

### ई-निविदा सूचना सन २०२५-२०२६

मुख्याधिकारी, पोलादपूर नगर पंचायत, बांधकाम विभाग, ई-निविदा प्रणालीद्वारे निविदा मागवीत आहेत. महाराष्ट्र शासनाच्या त्या त्या विभागातील नोंदणीकृत/अधिकृत कंत्राटदाराकडून निविदा सुचनेमधील नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवत आहोत. तरी सदर निविदा बाबत सर्व तपशील माहिती mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**(विनय बा.शिपाई)**
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत पोलादपूर**

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळः कार्यकारी अभियंता, मुंबई प्रदेश

**किरोल रोड : विद्याविहार (पश्चिम) : मुंबई-४०० ०८६**

ई-मेल: eemumbai@rediffmail.com — फोन: ०२२-२५१३६३०३
क्र.राप/काअमु/ईनिविदा/१३१५ — दिनांक: १०.०२.२०२६

**ई- निविदा सुचना क्रमांक ०२ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता, रा.प. मुंबई प्रदेश, किरोल रोड, विद्याविहार (प) मुंबई ८६ दूरध्वनी क्र. २५१३६३०३ हे खालील कामाकरीता अनोंदणीकृत परंतु अनुभवी व तांत्रिक/आर्थिक दृष्टया सक्षम असलेल्या ठेकेदारांकडुन ई-निविदा मागवित आहेत.

| ई- ID क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रु |
|---|---|---|
| १२७६३७७_१ | रा.प. सिंधुदुर्ग विभागातील विभागीय कार्यशाळा कणकवली इमारतीचे नुतनीकरण व वाहनतळाचे कॉक्रीटीकरण करणे. (दुसरी मागणी) | ६०७२५८९३.०० |
| १२७६३७७_२ | रा.प. सिंधुदुर्ग विभागातील देवगड आगाराचे नुतनीकरण करणे. | ३८७५४९१८.०० |
| १२७६३७७_३ | रा.प. रायगड विभागातील पेण रामवाडी आगाराच्या वाहनतळास कॉक्रीटीकरण करणे. | ३१८२३६७५.०० |
| १२७६३७७_४ | रा.प. रत्नागिरी विभागातील मंडणगड बसस्थानकाची पुनर्बाधणी करणे. | ३५००२२३८.०० |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| क्र. | महामंडळाचा टप्पा | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | निविदा डाउनलोड व विक्री व तयार करणे | १२/०२/२०२६ | ११.०० |
| २. | ऑनलाईन निविदा विक्री बंद करणे | २१/०२/२०२६ | १६.०० |
| ३. | तांत्रिक व वाणिज्य लिफाफा उघडणे, शक्य झाल्यास | २३/०२/२०२६ | ११.०० |
| ४. | देकार पुर्व बैठक | १७/०२/२०२६ | ११.०० |

**टीपः- १.** सर्व पात्र/इच्छुक निविदाकरांनी निविदा पत्रात डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या **https://mahatenders.gov.in** वर मदत घेणे आवश्यक आहे. तसेच महामंडळाच्या **www.msrtc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. **२.** इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील सदर कामांची एक अथवा सर्व ई- निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

**कार्यकारी अभियंता**
**रा.प.मुंबई प्रदेश (कुर्ला)**

## आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग

**मुख्य कार्यालय :- आदर्श भवन, श्रीबाग, ता.अलिबाग, जि. रायगड.**

**-: विशेष साधारण सभेची सूचना :-**
**(फक्त सभासदांसाठी)**

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग या संस्थेच्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ठिक १२.०० वाजता संस्थेचे मुख्य कार्यालय, 'आदर्श भवन', श्रीबाग नं.३, ता. अलिबाग, जि. रायगड येथील तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात संस्थेचे अध्यक्ष श्री.अभिजीत सुरेश पाटील यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयावर कामकाज करण्यासाठी आयोजित केली आहे. आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**-: सभेपुढील विषय :-**

विषय क्र.१:-राज्यातील नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या सुधारित आदर्श उपविधी स्विकारणेबाबत विचारविनिमय करणे व मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या संस्थेच्या पोटनियम दुरूस्तीच्या प्रस्तावाचे शब्दरचनेस मान्यता देणे.

दि. १२.०२.२०२६

सही/-
**संचालक मंडळाच्या अनुज्ञेने**
मिनाक्षी शामसुंदर पाटील
कार्यलक्षी संचालिका

**विशेष सूचना** :- वरील सभेस सकाळी ठिक १२.०० वाजता आवश्यक ती गणसंख्या पूर्ण झाली नाही तर ही सभा तहकूब केली जाईल, सदर तहकूब सभेचे कामकाज त्याच दिवशी, त्याच ठिकाणी ठिक १२.३० वाजता सुरु होईल, त्यावेळी गणसंख्या पूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

सुधारीत आदर्श उपविधी संस्थेच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत सभासदांना पाहता येतील.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल आकाश चंद्रकांत साळवी रा. हिल्टन, बी विंग, ३०४ अनिक वडाळा रोड, आय मॅक्स थेटर, भक्ती पार्क वडाळा मुंबई यांचे सुचनेवरून सर्व लोकांस कळविण्यात येते की आमचे अशिलांची नितेश काशिनाथ पाटील, हरिचंद्र एकनाथ मोकल, राजेंद्र एकनाथ मोकल, जितेंद्र एकनाथ मोकल, कृष्णा हिराजी मोकल, रविंद्र हिराजी मोकल, प्रकाश हिराजी मोकल, रघुबाई हिराजी मोकल, अक्षय प्रविण राऊत सर्व रा. बागदांडा या सर्वानी संगनमत करुन फसवणूक करुन मौजे बागदांडा, ता.अलिबाग गट नं. २४८ व २५०/१ या मिळकती विकत देण्याच्या व्यवहारात आमचे अशिलाची फसवणूक करुन त्यांना ब्लॅकमेल करुन रक्कम रु.१४,४४,०००/- इतकी रक्कम लुबाडलेली आहे व सदर इसमांनी खोटी नाटी कागदपत्रे तयार करुन आमचे अशिलांची खोटी सही करुन गंभीर स्वरुपाचा फौजदारी गुन्हा केलेला आहे. त्या सर्व व्यक्ती विरुद्ध आमचे अशिलांनी कायदेशीर कार्यवाही केली आहे त्यांना वकीलांकडून नोटीस देण्यात आलेली आहे तसेच मा. पोलीस अधिक्षक अलिबाग व वरीष्ठ पोलीस निरक्षक मांडवा सागरी पोलीस स्टेशन यांचेकडे तक्रारी दिलेल्या आहे. तरी सदर व्यक्तीनी वरील मिळकतीबाबत आमचे अशिलांचे नाव घेवून कोणा बरोबरही व्यवहार करण्यास आल्यास वा पैशाची मागणी केल्यास व्यवहार करु नये तसे सर्वास याद्वारे आमचे अशिला तर्फे सुचित करण्यात येत आहे.

अलिबाग
दिनांक :- ११/०२/२०२६

सही/-
**ॲड.आर.बी.कोसमकर**
चिरायु, ब्राम्हणआळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खालील वर्णन केलेल्या मिळकती आमचे अशिल श्री बिस्वजीत साहु यांनी त्या मिळकतीचे मालक श्री.रमेश वाळकु मसणे यांचे कडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे पोटल, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ३२ | २/ब | ०.२३.२० | १.५० |
| ३२ | ३/अ | ०.२२.०० | १.४४ |

**सर्व्हे नं. ३२/२/अ मधुन आमचे अशिल जाणे-येणेसाठी रस्ता विकत घेणार आहेत.**

तंदगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतींबाबत इतर दुसरे कोणाचा कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा कबजा कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत सक्त दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - १२-०२-२०२६

**ॲड.दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस.एल.एल.बी.
ॲडव्होकेट व नोटरी,
मो.नं.- ९५६१७१९४९४
९०११७१६००१

प्रोसेस फि

अर्जदार तर्फे वकिल
ॲड. निकेत रा. चवरकर

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात.**

निशाणी नं.
दिवाणी चौकशी अर्ज क्र. १२९/२०२५

१) श्रीमती. प्रतिक्षा परशुराम कदम
वय ५४ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. परशुराम कदम, इ/८३५, तन्मय
बिल्डिंग, जुनी पोस्ट गल्ली, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
आ.क्र. ६७५३८३९००३८५

२) श्री. अक्षय परशुराम कदम,
वय ३० वर्षे, धंदा
रा. अब्री नेस्ट रूम नं ३,
प्लॉट नं ३६, सेक्टर ६, करंजाडे, — अर्जदार
पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
आ.क्र. ६२५७३१११६६८०

३) आकांक्षा परशुराम कदम
वय २७ वर्षे, धंदा
रा. तन्मय इन्कलेव्ह ई-विंग, पहिला माळा,
रूम नं.२, जुनी पोस्टाची गल्ली,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
आ. क्र. ८३६४१६६८७५७१

**विरूद्ध,**

कोणीही नाही. …सामनेवाला

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ३ यांचे वडील कै.परशुराम बळीराम कदम हे दिनांक ०५/०७/२०१७ रोजी, परशुराम कदम, इ/८३५, तन्मेय एन्क्लेव्ह गृहनिर्माण सहकारी सोसायटी, जुनी पोस्ट गल्ली, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथे मयत झाले आहेत. विविध सरकारी कार्यालयामध्ये सरकारी कामकाजाचेवेळी मयताचा वारस दाखला मागितला जात असल्याने अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ३ यांचे वडील कै. परशुराम बळीराम कदम यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळावे म्हणून अर्जदार क्र. १ ते ३ यांनी मे. न्यायालयात खाली वर्णन केलेल्या मिळकतीबाबत अर्ज दाखल केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग नगरपरिषद हद्दीतील तालुका-अलिबाग, जिल्हा रायगड, येथील सिटी सर्व्हे नं. ६९७, ६९७/१, ६९७/२, ६९८, ६९८/१, ६९८/२, ६९८/२के ६९९, ६९९/१, ६९९/२ यामधील तन्मेय एन्क्लेव्ह गृहनिर्माण सहकारी सोसायटी मधील पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र.१०२, (असेसमेंट उताऱ्याप्रमाणे ई विंग, मालमत्ता क्र.८३५, ब्लॉक नं.२, त्याचे क्षेत्र ४३० चौ.फुट बिल्टअप ही मिळकत आहे.

तरी अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांना अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ३ यांचे वडील कै. परशुराम बळीराम कदम यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तींची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्यांचे आत किंवा दिनांक १२/०३/२०२६ पर्यंत स्वतंत्र किंवा त्यांचे वकीलांमार्फत सदरचे अर्जाकामी न्यायालयामध्ये हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार नं. १ ते ३ यांस त्यांचे मागणीप्रमाणे ते कै. परशुराम बळीराम कदम यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यांस येवून मे. कोर्टाकडून योग्य ते पुढील आदेश होतील.

आज दिनांक १०/०२/२०२६ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

कनिष्ठ लिपीक,
दिवाणी न्यायाधिश
व. स्तर अलिबाग.

कोर्टाचा शिक्का

अधिक्षक,
दिवाणी न्यायालय,
व. स्तर अलिबाग

## जाहीर सूचना

याद्वारे जनतेला जाहीरपणे सूचना देण्यात येते कि, आम्ही यात याखाली लिहिलेल्या **परिशिष्टामध्ये** अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या मालमत्तेच्या संबंधातील **मालकांच्या** अविभाजित शेअर, अधिकार, हक्क आणि हितसंबंधांची चौकशी आणि पडताळणी करीत आहोत.

मालमत्तेच्या संबंधातील किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील कोणतीही विक्री, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, बक्षिस, मृत्युपत्रीत देणगी, न्यास, वारसा, अन्य कोणतीही भाडेदारी, पोट-भाडेदारी, संमति नि परवानगी, काळजीवाहू तत्त्व, भोगवटा, कब्जा, कुटुंब व्यवस्था/तडजोड, एफएसआय/टीडीआर वापर, विकास अधिकार, भागिदारी, शेअर, प्रतिज्ञा, मार्गाधिकार, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, करार/करारनामे, भार, प्रलंबित वाद आणि/किंवा कोणतेही दायित्व आणि/किंवा लिखित आणि/किंवा कोणतीही व्यवस्था, आणि/किंवा कोणतीही बांधिलकी किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही अधिकार, हक्क, हितसंबंध, शेअर, दावा, धारणाधिकार, प्रतिभूती, हितसंबंध, वापराधिकार किंवा मागणी असणाऱ्या सर्व व्यक्तींनी / संस्थांनी तसेच अन्य गोष्टींबरोबर एखादे व्यक्तिगत, हिंदू अविभाजित कुटुंब, कंपनी, बँका आणि/किंवा वित्तीय संस्था, न्यास, पेढी, व्यक्तींची समिती किंवा व्यक्तिगत निकाय, प्रस्थापित किंवा अ-प्रस्थापित, ऋणको, धनको आणि/किंवा एखादे प्राधिकरण इत्यादींनी निम्नस्वाक्षरीकर्ता यांना या जाहिरातीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत अशा कोणत्याही अधिकार किंवा दाव्यास पाठींबा देणाऱ्या दस्तऐवजासह आणि तपशिलासह लेखी स्वरुपात सूचित करणे आवश्यक आहे. अन्यथा अशा प्रकारचा दावा, जर काही असेल तर, त्यांचा अधित्याग किंवा परित्याग करण्यात आलेला आहे किंवा ते अस्तित्वात नाहीत, असे समजण्यात येईल आणि आमचे अशिल आवश्यक व्यवहार कागदपत्रे कार्यान्वित करून आणि नोंदणी करून सदर मालमत्तेची खरेदी पूर्ण करण्यास मुक्त राहतील.

**यात यावर संदर्भित केलेले परिशिष्ट**
(सदर मालमत्तेचे वर्णन)

मौजे दवाले, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील सारणीमध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेल्या जमिनीचे ते सर्व तुकडे आणि भाग :

| अनु क्र. | गांव | गट क्र. | एकूण क्षेत्र (एच-आर-चौ.मीटर) | मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | दवाले | १९२ | ०-८०-६० | सुवर्णा दिवाकर बिडू<br>संजय दिवाकर बिडू<br>सचिन दिवाकर बिडू<br>सीमा महेश जाधव |
| २. | दवाले | २१२ | ३-११-७० | सुवर्णा दिवाकर बिडू |

आज दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६

इकॉनॉमिक लॉस प्रॅक्टिस करीता
(वकील आणि सॉलिसिटर्स),
९वा मजला, मफतलाल सेंटर,
विधान भवन मार्ग, नरिमन पॉइंट,
मुंबई - ४०००२१

सही/-
अंशुमन जगताप
(भागिदार)
anshumanjagtap@elp-in.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मनोज उदय पाटील रा. श्रीगाव ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून कायम विकत घेण्याबाबत आमच्या अशिलांनी बोलणी केलेली आहेत. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| श्रीगाव ता.अलिबाग, जि.रायगड | ४३१ | ०-४४-५०<br>पो.ख.०-०५-६०<br>एकूण ०-५०-१० | ३.४४ |

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीमधील विद्यमान मालक श्री. मनोज उदय पाटील यांच्या मालकीचे व ताबेकब्जा वहिवाटीतील ०-१५-०० हे.आर.पॉ. मिळकत हि या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख १०/०२/२०२६

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो.अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे वर्णे, ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलानी तिचे विद्यमान मालक श्री.माधवराव दिगंबर साकोळकर यांचे कडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ८ | १३ अ | ०.१०.४० | ०.०९ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही करार विक्री गहाण दान भाडेपट्टा बक्षिस वारस हक्क पोटगी लीन चार्ज ताबा वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

ठिकाण : कर्जत
दिनांक : १२/०२/२०२६

**ॲड.प्रदिप मोतीराम सुर्वे**
ए २०२ स्वप्ननगरी को. ऑप. हौ.
सोसायटी. मुद्रे खुर्द. कर्जत रायगड
फोन.नं.२२०१२६/९८५०१३५६५९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-सुरेखार, ता.अलिबाग, जि. रायगड येथील गट नं.५४, एकूण क्षेत्र ०-०४-०० हे. आर., आकार ०.५६ रू. पै. ही मिळकत या मिळकतीचे विद्यमान जयेंद्र सदानंद पेढवी, राजेंद्र सदानंद पेढवी, सुहासिनी संदीप भोईर, निखील विकास दिवकर, निकिता संदेश दिवकर, निकेश विकास दिवकर व कलावती विशाल धाके यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ११/०२/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे झिराड, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या बिनशेती जमिन मिळकती, त्या मिळकतींच्या विद्यमान कब्जेदार/मालक श्रीमती.सुनंदा विरेंद्र गुप्ता यांच्याकडून आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं./ हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | (चौरस मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| १.झिराड | ३८५/२/ड | ०-०४-५० | (४५०.००) | ४५.०० |
| २.झिराड | ३८५/२/इ | ०-०४-८० | (४८०.००) | ४८.०० |

सबब असल्यास सदरच्या मिळकतींवर अगर त्यांच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, तबदील, ट्रस्ट, वारसाहक्क, विक्रीचा करार, ताबा, इजमेंटरी हक्क यांप्रकारचा हक्क-हितसंबंध संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार, ॲडव्होकेट यांचेकडे अगर खाली नमुद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत आणून द्याव्यात अथवा पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची, कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर, सदरच्या मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या, प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील, बोजारहीत आणि खरेदी घेणेस योग्य आहेत, असे समजुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती आणि तक्रारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत, असे समजणेत येईल, हे सर्व लोकांस कळावे.

ता.१२/०२/२०२६

सही /-
**ॲड.माधवी नारायण ठाकूर.**
सी-३०१, 'क्लिफ हेवन'
को. ऑप. हा. सोसायटी,
स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाजूला,
कोर्ट रोड, अलिबाग, रायगड,
४०२ २०१.

नि. ३५/ड
वादीचे वकिल ॲड.आर.बी.कोसमकर

## जाहिर नोटीस

**अलिबाग येथिल मे. जिल्हा न्यायाधिश सो. यांचे कोर्टात**

दिवाणी अपिल क्र.१३६/२०१२

अभय सावंत — अपेलंट

**विरुद्ध**

विजय साखरे — रेस्पॉडंट

प्रति,
१) श्री.विजय बळीराम साखरे
रा.धाऊ गल्ली, लांगी यांचे घर,
हनुमान मंदिरा जवळ, तरणखोप, ता.पेण, जि.रायगड

यांसी,

अपेलंट यांनी जिल्हा न्यायाधिश न्यायालयात सि.अ.क्र.१३६/२०१२ हे दिवाणी अपिल न्यायालयात दाखल केलेले आहे. सदर अपिलाचे काम वर नमुद रेस्पॉडंट क्र.१ यांना सदर अपिलाच्याकामी हजर होण्यासाठी या न्यायालयाने नोटीस काढली असता नोटीसची बजावणी अद्याप होत नाही म्हणून मे.न्यायालयाने निशाणी ३३/ड वरील आदेशानुसार नोटीसची बजावणी '''दैनिक कृषीवल'' रायगड आवृत्ती या वृत्तपत्रामध्ये जाहिर नोटीसद्वारे प्रसिद्ध करण्याची परवानगी दिलेली आहे.

तरी या नोटीसद्वारे सदर वर उल्लेखीत रेस्पॉडंट क्र.१ यांना असे कळविण्यात येते की ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आपण स्वतः अगर वकिलांमार्फत दिनांक ११/०३/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वर नमूद मे.कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. आपण गैरहजर राहील्यास आपल्याविरुद्ध एकतर्फी हुकूम होईल व या अर्जाचे कामकाज पुढे चालू राहील.

सदरची जाहिर नोटीस आज दि.१०/०२/२०२६ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
**जिल्हा न्यायालय**
**अलिबाग-रायगड**

सही/-
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय**
**अलिबाग-रायगड.**


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# भारतीय संघाचा विक्रमी विजयरथ

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय क्रिकेट संघाने टी-२० विश्वचषक २०२६ च्या आपल्या पहिल्याच सामन्यात अमेरिकेचा धुव्वा उडवत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या विजयासह भारती संघाने एक असा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे, जो यापूर्वी या स्पर्धेच्या इतिहासात कधीही घडला नव्हता.

सूर्यकुमारच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने टी-२० विश्वचषक २०२६ ची शानदार सुरुवात केली आहे. पहिल्याच लढतीत अमेरिकेला पराभूत करून भारताने विजयी सलामी दिली. या विजयाचे वैशिष्ट्य म्हणजे, २०२४ च्या विश्वचषकापासून आतापर्यंत भारतीय संघ या स्पर्धेत अपराजित राहिला आहे. सलग विजयांची ही मालिका आता एका नव्या विक्रमात रूपांतरित झाली आहे.



**■ नऊ विजयांसह ऐतिहासिक कीर्तिमान**
**■ सलग १० वा विजय मिळवण्यासाठी सज्ज**

टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात सलग ९ सामने जिंकणारा भारत हा पहिलाच संघ ठरला आहे. यापूर्वी २०२२ आणि २०२४ च्या विश्वचषकात ऑस्ट्रेलियाने सलग ८ सामने जिंकण्याचा पराक्रम केला होता. तसेच दक्षिण आफ्रिकेनेही २०२४ च्या विश्वचषकात अंतिम फेरीपर्यंत सलग सर्व सामने जिंकले होते, परंतु अंतिम सामन्यात त्यांना भारताकडून पराभव स्वीकारावा लागला होता. आता सलग ९ विजयांसह भारतीय संघ टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक सामने जिंकणारा 'सिरमौर' ठरला आहे.

नामिबिया आणि विजयाचे 'दशक' भारतीय संघाकडे आता ही विजयी मालिका १० सामन्यांपर्यंत नेण्याची सुवर्णसंधी आहे. टी-२० विश्वचषकात सलग १० सामने जिंकणारा पहिला संघ बनण्यासाठी भारत सज्ज झाला आहे. भारताचा पुढील सामना गुरुवारी, १२ फेब्रुवारी रोजी नामिबियाविरुद्ध दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर रंगणार आहे. भारतीय संघाचा सध्याचा फॉर्म पाहता सलग १० वा विजय मिळवणे कठीण वाटत नाही.

### २०२४ मधील लय अद्याप कायम

**२०२४ मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारताने टी-२० विश्वचषक उंचावला होता. त्या वर्षी भारतीय संघाने सुरुवातीपासून अंतिम फेरीपर्यंत एकही सामना गमावला नव्हता. अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून भारताने जेतेपदावर नाव कोरले होते. त्यावेळी भारताने सलग ८ सामने जिंकले होते. आता तोच वारसा सूर्यकुमार यादवने पुढे चालवला असून, या वर्षातील पहिल्या सामन्यात अमेरिकेवर २९ धावांनी मात करून भारताने आपल्या विजयाचा सिलसिला कायम राखला आहे.**

## अभिषेक, इशानवर उपचार सुरु

**नवी दिल्ली:** भारतीय संघाने अमेरिकेला पराभूत करून टी-२० वर्ल्ड कपची दमदार सुरुवात केली. त्या लढतीत जसप्रीत बुमराह आजारी पडल्याने खेळला नव्हता; परंतु, तो आता पूर्णपणे बरा झाला आहे. मात्र, सलामीवीर अभिषेक शर्मा आजारी असून त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल केले गेले होते. तिलक वर्माने दिलेल्या माहितीनुसार अभिषेकला डिस्चार्ज मिळाला आहे; परंतु, त्याच्या खेळण्यावर अजूनही प्रश्नचिन्ह आहेच. तो नामिबियाविरुद्ध खेळेल का, याचा निर्णय आजच घेतला जाईल. अभिषेकच्या अनुपस्थितीत सॅमसनला सलामीला खेळण्याची संधी मिळू शकते. अशात भारताला सराव सत्रात आणखी एक धक्का बसला. सरावादरम्यान जसप्रीतचा यॉर्कर चेंडू त्याच्या डाव्या टाचेवर जोरात आदळला आणि फलंदाज वेदनेने विव्हळला. तो बराच वेळ मैदानावर आडवा पडून होता आणि वैद्यकिय टीमने उपचार केले.

## निवडक



### क्रीडाप्रेमींसाठी 'खो-खो'ची पर्वणी

**मुंबई :** अमर हिंद मंडळाच्या वतीने, मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने, दि. १३ ते १७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत अमर हिंद मंडळाच्या क्रीडांगणावर कै. उमेश शेणॉय यांच्या स्मरणार्थ डायनॅमिक प्रायोगिक व्यावसायिक पुरुष व महिला खो-खो स्पर्धा-२०२६ आयोजित करण्यात आली आहे. वेग, डावपेच, चपळाई आणि व्यावसायिक दर्जाचा थरार अनुभवण्यासाठी ही स्पर्धा क्रीडारसिकांसाठी मोठे आकर्षण ठरणार आहे. या प्रतिष्ठित स्पर्धाकालावधीत अमर हिंद मंडळाच्या क्रीडांगणाला 'अजित दादा पवार क्रीडा नगरी' असे नामकरण करण्यात येणार आहे. या नामकरणामुळे स्पर्धेला अधिक भव्य आणि ऐतिहासिक स्वरूप प्राप्त होणार असून, क्रीडा क्षेत्रात नव्या पर्वाची नोंद होणार आहे. सदर स्पर्धा संध्याकाळच्या सत्रात खेळविण्यात येणार असून, पुरुष गटात नामांकित व्यावसायिक संघांचा सहभाग आहे. उमेश शेणॉय यांच्या स्मृतीस अभिवादन करत आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा म्हणजे परंपरा आणि आधुनिक व्यावसायिकतेचा संगम आहे. दादरच्या क्रीडाभूमीत रंगणारा हा ङ्गडायनॅमिकफ महासंग्राम मुंबईच्या खो-खो संस्कृतीला नवे बळ देत ऐतिहासिक ठरणार आहे. स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी इच्छुकांनी निलेश सावंत (९८२१३३५७८४), रोहन चव्हाण (८७७९४९३३६४), मधुरा पेडणेकर (८८५०६५३९३८), उत्कर्षा शेणॉय-तळेकर (९९२०९७००५५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### राष्ट्रीय स्पर्धेत सिद्धीका,अर्जुनला रौप्यपदक

**खरोशी:** पेण येथील सुहित जीवन ट्रस्टच्या विद्यार्थ्यांनी स्पेशल ऑलिम्पिक नॅशनल थलेटिक्स गेम्स मध्ये दैदीप्यमान यश मिळवून महाराष्ट्राचे नाव उंचावले असल्याने सर्वत्र कौतुक होत आहे. ५ व ६ फेब्रुवारी रोजी रोहतक, हरियाणा येथील स्पेशल ऑलिम्पिक भारत आयोजित नॅशनल थलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धा अत्यंत उत्साहात पार पडल्या. या नॅशनल स्पर्धामध्ये संपूर्ण देशातील २७ राज्यांमधील ५१० दिव्यांग खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धामध्ये सुहित जीवन ट्रस्ट, पेण येथील विद्यार्थीनी सिद्धीका पाटील १०० मीटर धावणे रौप्यपदक तसेच जॅवलिंग थ्रोमध्ये रौप्यपदक पटकावले. तसेच अर्जुन पांडुरंग वारे रनिंग लाँग जंप रौप्यपदक मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. ही बाब केवळ संस्था व रायगड जिल्ह्यासाठीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी अत्यंत अभिमानाची आहे त्यामुळे अर्जुन व सिद्धिका यांच्यावर संपूर्ण महाराष्ट्रातून अभिनंदन व कौतुकांचा वर्षाव होत आहे. या यशामागे या विद्यार्थ्यांचे पालक, संस्थेचे विश्वस्त, प्रशिक्षक अमोल काईनकर तसेच हितचिंतकांचा मोलाचा सहभाग आहे.

### अन्वी स्पोर्ट्सचा विजयी जल्लोष

**मुंबई :** गावातील खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या क्रीडा गुणांना वाव मिळावा या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या श्री निनादेवी चषक २०२६ या भव्य ओव्हरआर्म क्रिकेट स्पर्धेत अन्वी स्पोर्ट्स (देवगड) संघाने विजेतेपद पटकावले.निनादेवी प्रतिष्ठान आयोजित या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा प्रभादेवी येथे नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. एकूण २४ संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. सुरुवातीपासूनच चुरशीचे सामने, खेळाडूंची दमदार फलंदाजी-गोलंदाजी आणि प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे स्पर्धेला विशेष रंगत आली. अंतिम सामन्यात अन्वी स्पोर्ट्स संघाने उत्कृष्ट संघभावना आणि संयमी खेळाच्या जोरावर विजय मिळवला. विजेत्या संघाला ५१ हजार रुपये रोख रक्कम आणि भव्य चषक प्रदान करण्यात आला. उपविजेता शौर्या इलेव्हन संघाला ३० हजार रुपये आणि चषक देऊन गौरविण्यात आले. तसेच स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज आणि मालिकावीर ठरलेल्या खेळाडूंना आकर्षक भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. श्री निनादेवी प्रतिष्ठान यांच्या वतीने खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पारितोषिक वितरण सोहळ्यास प्रतिष्ठानचे पदाधिकारी, ग्रामस्थ आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावागावातील तरुणांना क्रीडाक्षेत्रात संधी देणारी ही स्पर्धा भविष्यातही अधिक मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला.

## स्वराजने घडवला इतिहास

। उरण । प्रतिनिधी ।

जीवनात जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वास असेल तर हमखास यश मिळते, याची प्रचिती उरणच्या बाजारपूर येथे रहिवासी अवघ्या १२ वर्षीय मुलाने दिली आहे. स्वराज पाटील याने कासा खडक ते खंदेरी किल्ला हे तब्बल १८ किमी सागरी अंतर पाच तास सहा मिनिटांत पोहून पार करीत हा धाडसी पराक्रम केला. तो कमी वयात कमी वेळेत पोहून विक्रम करणारा पहिला जलतरणपटू ठरला आहे. उरणमधील मोरा जेट्टी ते मुंबई गेटवे ऑफ इंडिया हे १२ किमीचे सागरी अंतर चार तास २५ मिनिटांत याआधीही स्वराजने पोहून पूर्ण केले होते. उरण नगर परिषदेच्या जलतरण तलावात तो नियमित सराव करत. त्याने आपल्या आईकडून मिळालेला जलतरणाचा वारसा यशस्वीपणे पुढे नेला आहे. शनिवारी (दि.७) रात्री ११ वाजून ५० मिनिटांनी कासा खडक येथून स्वराजने आपल्या सागरी मोहिमेला सुरुवात केली. काळोख, समुद्रातील प्रचंड लाटा, तसेच मोठमोठी जहाजे अशा अनेक अडथळ्यांवर मात करीत त्याने अवघ्या पाच तास सहा मिनिटांत खंदेरी किल्ला गाठून इतिहास घडवला आहे. एवढ्या लहान वयात इतका मोठा सागरी पराक्रम करणारा स्वराज हा उरण तालुक्यासाठी अभिमानाचा विषय ठरला आहे.

## तायक्वाँदो स्पर्धेत अनयाला सुवर्ण

**रत्नागिरी :** जिल्हा खुली चॅलेंज तायक्वाँदो स्पर्धा छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावरील बॅडमिंटन हॉल येथे झाली. या स्पर्धेत संगमेश्वर, रत्नागिरी, लांजा, राजापूर, चिपळूण, खेड, दापोली, मंडणगड, गुहागर, तालुक्यांमधून सुमारे ६५० खेळाडू सहभागी झाले आहेत. सब ज्युनिअर गटामध्ये ४७ किलो गटात अनया वणजू हिने सुवर्णपदक प्राप्त केले. अनया हिची दुसरी स्पर्धा आहे, अनया हिने आतापर्यंत एक सुवर्णपदक व १ रौप्यपदक प्राप्त केले. अनया ही गणराज क्लब येथे प्रशांत मकवाना, यांच्याकडे प्रशिक्षण घेत आहे.

## कराटे स्पर्धेत मुरुडच्या विद्यार्थ्यांचे यश

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुंबईतील मुलुंड येथे झालेल्या एकतिसाव्या युरो-इंटरनॅशनल ओपन कराटे चॅम्पियनशीप स्पर्धेत मुरुडच्या विद्यार्थ्यांनी चांगले यश मिळवले आहे. नज अकॅडमी हायस्कूल मजगाव व सुविद्या इंग्लिश मीडियम स्कूल मुरुडचे विद्यार्थी सहभागी झाले होते भव्य यश प्राप्त केले आहेत.

माहिरा इब्राहिम मनियार-सुवर्ण व रौप्यपदक, मनाल सहीम हद्दादी रौप्य आणि कांस्यपदक, अलहान मोईउद्दीन अन्सारी सुवर्णपदक व रौप्यपदक, अर्शान हाफिज- सुवर्ण व कांस्यपदक, मरियम मजीद सिद्दीक रौप्यपदक, जैनब बशीर सिद्दीक रौप्यपदक, यासीन इब्राहिम मनियार सुवर्णपदक व रौप्यपदक, खदीजा हद्दादी दोन सुवर्णपदक, सलाह हद्दादी यांनी यश मिळवले. याबद्दल नज एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष शफी हसन तांडेल यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले. विद्यालयाचे प्रा. प्रीतम वाळंज, मनाली पाटील, मतीन हमदुले, दिलशाद दामाद, मेघा भंडारे मोईउद्दीन अन्सारी, सलमान सलीम हद्दादी, मुस्सारत सहिम हद्दादी, मिनाज इब्राहिम मनियार, असरीन मजीद सिद्दीक यांनी पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



## उडान क्रीडा महोत्सवाचे आयोजन

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुक्यातील डी. एस. कुलकर्णी फाऊंडेशन इंदापूर पुरस्कृत ट्रॅक ॲण्ड बियाँड, मुंबई कांश स्पोटींग हब एल. एल. पी,मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड प्रकाश वाघ, तालुका क्रीडा अधिकारी माणगांव राजेंद्र अतनूर, तालुका क्रीडा मार्गदर्शक संजय गमरे या सर्वांच्या सहकार्याने माणगाव तालुकास्तरीय उडान २०२६ क्रीडा महोत्सवाचे आयोजन शनिवार (दि.१४) व रविवार दि.१५ फेब्रुवारी रोजी तालुका क्रीडा संकुल माणगाव याठिकाणी करण्यात आले आहे. तरी या उडान महोत्सवाचा लाभ तालुक्यातील मुला-मुलींनी घ्यावा असे अवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

आयोजकांनी सर्व पालक आणि शाळा प्रशासनांना जास्तीत जास्त सहभागासाठी मनापासून आवाहन केले आहे. हा टॅलेंट सर्च यशस्वी करण्यात सर्वांचा पाठिंबा महत्त्वपूर्ण आहे. आपल्या मुलांसाठी स्पर्धेत सहभागी होण्याची, खेळ भावनेचे महत्त्व शिकण्याची आणि कदाचित आयुष्याची आवड शोधण्याची ही एक उत्कृष्ट संधी आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ॲथलेटिक्सला भविष्यात मार्गदर्शन आणि प्रेरणा दिली जाईल. या क्रीडा महोत्सवात धावणे,लांब उडी,स्टँडिंग बोर्ड जंप, गोळा फेक या स्पर्धांचा समावेश असून हि स्पर्धा ८ ते १७ वयोगटातील मुला-मुलींसाठी आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या माणगाव तालुक्यातील मुला - मुलींनी वयाचा पुरावा : मूळ जन्म दाखला अनिवार्य असून स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांसाठी प्रति खेळासाठी २०० रुपये प्रवेश फी ठेवण्यात आली असून प्रत्येक विद्यार्थ्याला जास्तीतजास्त २ स्पर्धा खेळता येतील.

सदर क्रीडा महोत्सवाच्या अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी मो.नं.८६०५०५९३९८ / ९८६०१७६६३/९०११३७८१३९/ ८०८७४६६५७४ /९८२००६१३९८ यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## नामिबियावर दिमाखदार विजय

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

टी-२० विश्वचषक २०२६ मधील १० व्या सामन्यात नेदरलँड्सने नामिबियाचा ७ गडी राखून पराभव केला. अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात बास डी लीडे याने ४८ चेंडूत ७२ धावांची नाबाद आक्रमक खेळी साकारत संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. या विजयासह नेदरलँड्सने गुणतालिकेत पाकिस्तानला मागे टाकत दुसरे स्थान पटकावले आहे. नेदरलँड्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करताना नामिबियाने २० षटकांत ८ बाद १५६ धावापर्यंत मजल मारली. नामिबियाकडून जेन निकोलने सर्वाधिक ४२ धावा केल्या. नेदरलँड्सतर्फे बास डी लीडे, लोगन वान बीक यांनी प्रत्येकी २ बळी घेतले, तर आर्यन दत्त आणि फ्रेड क्लासेन यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. नेदरलँडने १८ व्या षटकांत गाठले १५७ धावांचे लक्ष्य१५७ धावांचा पाठलाग करताना नेदरलँड्सची सुरुवात खराब झाली. सलामीवीर मॅक्स ओडॉड (७)वर बाद झाला. नेदरलँडने १८ व्या षटकांत १५७ धावांचे लक्ष्य गाठत ७ गडी राखून विजय मिळवला.

## ईशाला शूटिंगमध्ये दुसरे सुवर्णपदक

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

ईशा सिंगने एशियन शूटिंग चॅम्पियनशिपमध्ये दुसरे सुवर्णपदक जिंकले आहे. नवी दिल्लीतील डॉ. करणी सिंग शूटिंग रेंजमध्ये महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूलमध्ये ईशाने २३९.८ गुण मिळवले. तर पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूलमध्ये सम्राट राणाला कांस्यपदक मिळाले. अंतिम फेरीत ईशाने सुरुवातीच्या पाच शॉटनंतर सातव्या स्थानावरून पुनरागमन करत १९व्या शॉटमध्ये निर्णायक आघाडी घेतली. चायनीज तैपेईच्या चेंग येन चिंगला रौप्यपदक आणि यू वी एनला कांस्यपदक मिळाले. तर सांघिक स्पर्धेतही भारताने उत्कृष्ट खेळ दाखवला. महिला एअर पिस्तूल संघात ईशा सिंग, मनु भाकर आणि सुरुची सिंग या त्रिकुटाने १७२६ गुणांसह सुवर्णपदक जिंकले.

## रणजी ट्रॉफीत जम्मू-काश्मीरने रचला इतिहास

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

रणजी ट्रॉफी २०२५-२६ स्पर्धा आता शेवटच्या टप्प्यात आहे. ३८ संघात खेळवल्या जाणाऱ्या या स्पर्धेत ३२ संघ मुख्य स्पर्धेत सहभागी होतात. यातील आता अंतिम ४ संघ निश्चित झाले आहेत. ६ ते १० फेब्रुवारीदरम्यान या स्पर्धेतील उपांत्य फेरी पार पडली. या उपांत्य फेरीतून अंतिम ४ संघ मिळाले असून आता १५ ते १९ फेब्रुवारी दरम्यान उपांत्य फेरीचे सामने रंगणार आहेत. उपांत्य फेरीत बंगाल, जम्मू-काश्मीर, उत्तराखंड आणि कर्नाटक हे चार संघ पोहचले आहेत. उपांत्यपूर्व फेरीत मुंबई, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश आणि झारखंड यांचे आव्हान संपले. रणजी स्पर्धेतील सर्वात यशस्वी संघ असलेल्या मुंबईचेही आव्हान यंदा उपांत्यपूर्व फेरीत संपले. मुंबईतील बीकेसी ग्राऊंडवर झालेल्या उपांत्यपूर्व सामन्यात मुंबईला कर्नाटक संघाने ४ विकेट्सने पराभूत केले. त्यामुळे मुंबईचे यंदा विजेतेपदाचे स्वप्न भंगले आहे. याशिवाय मुंबई बाहेर पडल्याने महाराष्ट्रातील तिन्ही संघांचेही आव्हान संपले. महाराष्ट्र आणि विदर्भ या दोन्ही संघांचे आव्हान साखळी फेरीनंतरच संपले होते. जम्मू - काश्मीर पहिल्यांदाच उपांत्य फेरीतजम्मू-काश्मीर संघाने यंदा इतिहास घडवला आहे. रणजी ट्रॉफीमध्ये जम्मू आणि काश्मीर संघ पहिल्यांदाच उपांत्य फेरीत पोहचले आहेत. यापूर्वी त्यांना इथपर्यंत पोहचता आले नव्हते.

**पहिली सुपर ओव्हरही झाली टाय** | **अफगाणिस्तान शेवटच्या चेंडूवर पराभूत**

# आफ्रिका डबल सुपर ओव्हरमध्ये विजयी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

दक्षिण आफ्रिकेने आयसीसी टी-२० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेत दुसऱ्या सुपर ओव्हरपर्यंत पोहचलेल्या सामन्यात अफगाणिस्तानवर थरारक विजय मिळवला आहे. दक्षिण आफ्रिकेने अफगाणिस्तानला विजयासाठी १८८ धावांचं आव्हान दिले होते. अफगाणिस्तानचा डाव या विजयी धावांचा पाठलाग करताना १९.४ ओव्हरमध्ये १८७ धावांवर आटोपला. अफगाणिस्तानला ३ बॉलमध्ये २ रन्सची गरज होती. तेव्हा फझलहक फारुकी नॉन स्ट्राईक एन्डवर रन आऊट झाला. अशाप्रकारे सामना बरोबरीत सुटला. अशाप्रकारे १० व्या टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत पहिली सुपर ओव्हर होणार हे निश्चित झाले.




अफगाणिस्तानने पहिल्या सुपर ओव्हरमध्ये १७ धावा केल्या. त्यामुळे आफ्रिकेला विजयासाठी १८ धावा करायच्या होत्या. दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी शेवटच्या बॉलवर ७ धावांची गरज होती. अशात ट्रिस्टन स्टब्स याने सिक्स लगावला. स्टब्सने मारलेल्या सिक्समुळे दक्षिण आफ्रिकेच्या १७ धावा झाल्या. मुख्य सामन्यानंतर पहिली सुपर ओव्हरही टाय झाली.

जोवर सुपर ओव्हरचा निकाल लागत नाही तोवर सुपर ओव्हर होत राहणार, असा नियम आहे. त्यामुळे उभयसंघात दुसऱ्या सुपर ओव्हरला सुरुवात झाली. दक्षिण आफ्रिकेने २३ धावा केल्या. त्यामुळे अफगाणिस्तानला २४ धावांचे आव्हान मिळाले. मात्र, अफगाणिस्तानला १९ धावांपर्यंतच पोहचता आले. दक्षिण आफ्रिकेने अशाप्रकारे डबल सुपर ओव्हरमध्ये अफगाणिस्तानवर ४ धावांनी मात करत या स्पर्धेतील सलग दुसरा विजय साकारला.

अफगाणिस्तानने २४ धावांचा पाठलाग करण्यासाठी अनुभवी मोहम्मद नबी याला पाठवले. मात्र नबीने रेकॉर्ड चेज करताना निराशा केली. नबीला केशवने टाकलेल्या पहिल्या बॉलवर एकही रन घेता आली नाही. तर केशवने दुसऱ्या बॉलवर नबीला आऊट केले. त्यामुळे अफगाणिस्तानला विजयासाठी ४ बॉलमध्ये २४ रन्सची गरज होती, जे शक्य होते मात्र सोपं नाही. मात्र रहमानुल्लाह गुरुबाज याने कमाल केली.

### डबल सुपर ओव्हर

**रहमानुल्लाह याने सलग ३ बॉलमध्ये ३ सिक्स लगावले. त्यामुळे अफगाणिस्तानच्या विजयाची आशा वाढली. अफगाणी चाहत्यांमध्ये उत्साह संचारला. गुरुबाजने सलग ३ सिक्स ठोकल्याने केशव महाराजवर दबाव आला. आता अफगाणिस्तानला १ बॉल आणि ६ रन्सची गरज होती. मात्र केशवने दबावात वाईड बॉल टाकला. त्यामुळे अफगाणिस्तानाला विजयासाठी सिक्सचीच गरज होती. तर सामना पुन्हा टाय करण्यासाठी फोरची गरज होती. मात्र गुरुबाजचा अंदाज चुकला आणि तो कॅच आऊट झाला. दक्षिण आफ्रिकेने अशाप्रकारे सामना जिंकला**

## इटलीत विंटर ऑलिम्पिक सुरु

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।



विंटर ऑलिम्पिक २०२६ ची सुरुवात झाली आहे आणि सध्या मेक्सिकोच्या आई-मुलाच्या जोडीची, सारा श्लेपर (४७) आणि लासे फेडेरिको गॅक्सिओला (१८) यांची सर्वाधिक चर्चा होत आहे. विंटर ऑलिम्पिकच्या १०२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच आई आणि मुलगा जगातील सर्वात मोठ्या क्रीडा मंचावर एकत्र स्पर्धा करताना दिसतील. ही जोडी या वर्षीच्या पाच सदस्यीय मेक्सिकन संघाचा भाग आहे, जो गेम्समध्ये देशाचा आतापर्यंतचा सर्वात मोठा ऍथलीट संघ आहे. सारा श्लेपरचे हे सातवे ऑलिम्पिक आहे, जो कोणत्याही महिला अल्पाइन स्कीअरसाठी एक विक्रम आहे. १९९८ मध्ये नागानो ऑलिम्पिकमधून आपल्या प्रवासाची सुरुवात करणाऱ्या साराने ४ वेळा अमेरिका आणि ३ वेळा मेक्सिकोचे प्रतिनिधित्व केले आहे. ४७ वर्षांची सारा विंटर ऑलिम्पिक खेळांमध्ये भाग घेणारी इतिहासातील सर्वात वयस्कर महिला अल्पाइन स्कीअर आहे. तर, १८ वर्षांच्या लासेचे हे ऑलिम्पिक पदार्पण आहे. लासेचे नाव नॉर्वेजियन चॅम्पियन लासे क्यूस यांच्या नावावरून ठेवण्यात आले आहे. अमेरिकेत जन्मलेल्या साराने १९९८ ते २०१० दरम्यान अमेरिकेसाठी ऑलिम्पिकमध्ये भाग घेतला होता.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)